# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २८ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०


# अमरावतीत महायुतीचे किरण सरनाईक आघाडीवर

## अदिती पोहरे, श्रीकांत देशपांडे यांच्यात लढत






## विजयासाठी १६,१३४ मतांचा कोटा अद्याप अपूर्ण

**अमरावती/प्रतिनिधीः**-विधान परिषदेच्या अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या मतमोजणीत महायुतीत शिवसेनेचे उमेदवार किरण सरनाईक यांनी ८ हजार १६२ मते मिळवत निर्णायक आघाडी घेतली आहे. शिवसेना बंडखोर डॉ. श्रीकांत देशपांडे आणि अदिती पोहरे यांच्यात दुसऱ्या क्रमांकासाठी अटीतटीची लढत आहे. देशपांडे यांना ४ हजार ६६८, तर पोहरे यांना ४ हजार ६८८ मते मिळाली आहेत.

निवडणुकीच्या एकूण मतमोजणीत ३३ हजार ३४ मतांची मोजणी करण्यात आली. त्यापैकी ३२ हजार २६६ मते वैध, तर ७६८ मते अवैध ठरली. निवडणुकीत एका उमेदवाराला विजयी घोषित करण्यासाठी १६ हजार १३४ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला आहे. मतांच्या आकडेवारीनुसार शिक्षक भारतीचे सुरेश देवकर यांना ३२३६, विमाशीचे दिलीप कडू यांना २६७४, शिवसेना उबाठाचे दत्तात्रय लहाने यांना २१५५ आणि मराशिपच्या डॉ. संगीता शिंदे (बोंडे) यांना १९६४ मते मिळाली आहेत.

चंद्रशेखर भोयर यांना १३७५, डॉ. प्रशांत विघ्ने यांना १२६७, डॉ. अविनाश बोर्डे यांना १ हजार २६ मते मिळाली. गजानन उल्हे (पाटील) यांना ४६७, किरण चौधरी यांना १७७, तर डॉ. सुमित पवार यांना १५२ मते मिळाली. एकूण २६ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

मतमोजणीत सरनाईक यांनी आघाडी घेतली असली, तरी विजयासाठी आवश्यक असलेला १६ हजार १३४ मतांचा कोटा अद्याप कोणत्याही उमेदवाराने गाठलेला नसल्याने मतांच्या हस्तांतरणानंतरच अंतिम निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे. दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी हाती घेण्यात आली होती. बाद फेरीनंतर अंतिम निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे. बुधवारी २८ ऑक्टोबर रोजी पहाटे अंतिम निकाल समोर येईल. मात्र एकूण निकालाचा कल पाहता महायुतीचे किरण सरनाईक, महाविकास आघाडीतील कॉंग्रेस उमेदवार अदिती पोहरे आणि शिवसेना बंडखोर उमेदवार श्रीकांत देशपांडे यांच्यातच लढत होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# नागपूर पदवीधरमध्ये अभिजित वंजारी आघाडीवर

## भाजपच्या गोटात धाकधूक,नितेश कराळेंची देखील जोरदार मुसंडी



**नागपूर** - विधानपरिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या मतमोजणीत पहिल्या फेरीत कॉंग्रेसचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी आघाडी घेतल्याचे दिसून आले. रात्री नऊ वाजेपर्यंत सुमारे ८४ हजार मतपत्रिकांची मोजणी झाली होती व वंजारी यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार सुधाकर कोहळे यांच्यावर जवळपास आठशे मतांची आघाडी घेतल्याचे प्राथमिक चित्र होते. अपक्ष उमेदवार नितेश कराळे यांनीही चौदा हजारांहून अधिक मते मिळविल्याने लढतीतील चुरस कायम आहे. मतमोजणी अद्याप सुरू असल्याने अंतिम निकालासाठी प्रतीक्षा करावी लागणार असून 'एलिमिनेशन' फेरीअगोदर विजयाचा 'कोटा' पूर्ण होणार का याकडे लक्ष लागले आहे.नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीच्या प्रारंभिक फेरीत एकूण ४४५ मतदान केंद्रांवरील एकूण ७८८ मतपेट्यांत १,६५,७०५ मतपत्रिका प्राप्त झाल्या होत्या. तसेच मतमोजणीसाठी २३८ टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्या होत्या. त्यातील ३४ मतपत्रिका बाद ठरविण्यात आल्या. अशा पद्धतीने एकूण १,६५,९०९ मतपत्रिकांची मोजणी करण्यात आली. सुरुवातीला सर्व मतपत्रिकांची सरमिसळ करण्यात आली व त्यानंतर पसंतीक्रमानुसार मतमोजणीस सुरुवात झाली.

# पोलिसांनी उधळला नक्षल्यांचा डाव, मोठा शस्त्रसाठा जप्त

**गडचिरोली** : सुरक्षा दलांना धोका पोहोचवण्याच्या व घातपात घडवण्याच्या उद्देशाने माओवाद्यांनी जंगलात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा जिल्हा पोलिस दलाने मंगळवारी, २७ ऑक्टोबर रोजी उद्ध्वस्त केला. एटापल्ली तालुक्याच्या वांगेतुरी ठाण्यांतर्गत येणा-या छत्तीसगड सीमेवरील माचुवंचा जंगलात ही कारवाई करण्यात आली



असून ५ अग्निशस्त्रांसह मोठ्या प्रमाणावर स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, आंतरराज्यीय सीमावर्ती भागातील दुर्गम जंगल परिसराचा गैरफायदा घेऊन माओवाद्यांकडून शस्त्रास्त्रे व स्फोटके जमिनीमध्ये गोपनियरित्या लपवून ठेवली जात असत. नक्षल सप्ताह किंवा निवडणुकांसारख्या प्रसंगी सुरक्षा दलांवर घातपात करण्यासाठी या साहित्याचा वापर केला जाण्याचा प्लॅन होता. यासंदर्भात मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, २७ ऑक्टोबर रोजी पहाटे पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथकाच्या ४ तुकड्या व बॉम्ब शोधक व नाशक (बीडीडीएस)चे पथक शोध मोहिमेसाठी रवाना करण्यात आले होते.

# एसआयआर प्रकरणाची सुनावणी दिवाळीनंतर

**नवी दिल्ली** : एसआयआर प्रक्रियेसह निवडणूक आयोगाच्या निर्णयांना आव्हान देणा-या याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. कॉंग्रेस नेते राहुल गांधी, एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि विरोधी पक्षांतील अन्य नेत्यांनी या प्रकरणी याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवर आता दिवाळीनंतर



सुनावणी होणार असून १७ नोव्हेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.या प्रकरणात निवडणूक आयोगाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून आपल्या निर्णयांचा बचाव केला. एसआयआर संदर्भातील तिन्ही आदेश आयोगाच्या सर्व सदस्यांच्या सहमतीने घेण्यात आले होते, असे आयोगाने स्पष्ट केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याच्या आरोपांचेही आयोगाने खंडन केले. याचिकांमध्ये करण्यात आलेले आरोप निराधार असल्याचे आयोगाने म्हटले आहे. याचिकाकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजाला, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी कथितरीत्या एकतर्फी घेतलेल्या निर्णयांना आणि विशेष गहन पुनरीक्षणाच्या प्रक्रियेतील कथित अनियमिततांना आव्हान दिले आहे. निवडणूक आयोगाच्या नोंदी, मतदारयादीतून नावे वगळण्याची प्रक्रिया आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीची चौकशी करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. आयोगाच्या काही निर्णयांमुळे प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निष्पक्षतेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचा त्यांचा आरोप आहे.

# यंदाची दिवाळी फटाकेमुक्त साजरी करा :मुंबई हायकोर्ट

**मुंबई :** दिवाळीत राज्यात कानठळ्या बसवणारे फटाके सार्वजनिक ठिकाणी फोडण्यास पूर्णपणे बंदी घालण्याचे आदेश देताना यासंदर्भात व्यापक जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. निला गोखले यांच्या खंडपीठाने हे निर्देश देताना प्रदूषण रोखण्यासाठी



सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून मराठी कलाकार आणि समाजातील प्रसिद्ध व्यक्तींनी स्वत:हून पुढे येण्याचे आवाहन केले आहे.मराठी कलाकारांना आणि सेलिब्रिटींना एकत्र घेऊन ही जनजागृती मोहीम राबवली जावी मात्र या उपक्रमासाठी कलाकारांवर आणि जाहिरातबाजीवर जनतेचा पैसा खर्च करू नका, अशी सक्त ताकीद राज्य सरकारला दिली. सण आणि उत्सवांच्या काळात होणा-या ध्वनी तसेच हवेच्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने आवाज करणा-या फटाक्यांच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. या प्रकरणी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती निला गोखले यांच्या खंडपीठा समोर सोमवारी सुनावणी झाली. यावेळी खंडपिठाने प्रदूषण रोखण्यासाठी सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून मराठी कलाकार आणि समाजातील प्रसिद्ध व्यक्तींनी स्वत:हून पुढे येण्याचे आवाहन खंडपिठाने केले.

# पुस्तक प्रकाशित होताच अनेक गौप्यस्फोट होणार,

## आत्मचरित्राबाबत सोनिया गांधींचं मोठं विधान

**नवी दिल्ली :** कॉंग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचं आत्मचरित्र 'बिलॉंगिंग: अ जर्नी ऑफ लव्ह' लवकरच प्रकाशित होणार आहे. या आत्मचरित्राबाबत सोनिया गांधी यांच्याकडून हळुहळू एकेक गुपित उघड केलं जात आहे. हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर मोठे गौप्यस्फोट होतील. एवढी वर्षे अनेकजण माझी गोष्ट सांगत आले आहेत. आता माझी पाळी



आहे, असे सोनिया गांधी यांनी आत्मचरित्राबाबत एक्सवर शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे. सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या बिलॉंगिंग: अ जर्नी ऑफ लव्ह या आत्मचरित्राचं १० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रकाशन होणार आहे. एकूण ५४४ पाने असलेल्या या पुस्तकामध्ये सोनिया गांधी यांनी इटलीतील त्यांचं बालपण, १९६५ मध्ये राजीव गांधीसोबत केंब्रिजमध्ये झालेली भेट, विवाह अशा त्यांच्या जीवनातील वैयक्तिक गोष्टींसोबत इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची हत्या, राजकारणातील प्रवेश, २००४ मध्ये पंतप्रधानपदाला दिलेला नकार अशा भारतीय राजकारणात गाजलेल्या काही घटनांबाबत सविस्तर वर्णन करण्यात आहे. सोनिया गांधी यांच्या या पुस्तकाचं भारतातील प्रकाशन हार्परकॉलिन्सच्यावतीने करण्यात आले आहे.

# भीमाशंकर जंगलात ३४ हजार नव्हे, ९० हजार झाडांची कत्तल होणार

## महाराष्ट्रात २३ ठिकाणी वृक्षतोड, विजय कुंभार यांच्या दाव्याने खळबळ

**रायगड/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधक आणि पर्यावरणप्रेमी आक्रमक झाले आहेत. भीमाशंकर जंगलात केवळ ३४ हजार झाडांची नव्हे, तर ९० हजार झाडांची कत्तल होणार आहे, असा दावा आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. तसेच भीमाशंकरप्रमाणे राज्यात २३ प्रकल्पांसाठी २३ ठिकाणी लाखो झाडांची कत्तल होणार असल्याचा खळबळजनक दावाही विजय कुंभार यांनी केला आहे. विजय



कुंभारांनी कागदपत्रे एक्सवर टाकून मोठा गौप्यस्फोट केला आहे. भीमाशंकरची वृक्षतोडच्या बदल्यात टोरंट कोयना धरण परिसरातील दोन गावांमध्ये वृक्ष लागवड करणार, असं म्हटलं आहे. पण प्रत्यक्षात अजून एक ही झाड लावलं नाही, उलट कंपनीने त्या बदल्यात ३ कोटी ८४ लाख रुपये देत, वृक्ष लागवड करण्याऐवजी हात वर केलेत, असा दावा ही विजय कुंभारांनी केला. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साईडोंगर-१ परिसरात प्रस्तावित असलेला टॉरंट पॉवरचा पंप-स्टोरेज हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्प हा सुमारे ३००० मेगावॅट क्षमतेचा आणि अंदाजे १३,५०० कोटी रुपयांचा जलविद्युत व ऊर्जा साठवण प्रकल्प आहे. हा एक 'पंप-स्टोरेज हायड्रोइलेक्ट्रिक' प्रकल्प आहे, ज्याचा मुख्य उद्देश वीजनिर्मिती आणि अतिरिक्त ऊर्जा साठवण करणे हा आहे. या प्रकल्पाची क्षमता ३००० मेगावॅट असून प्रकल्पाचा अंदाजे खर्च १३,५०० कोटी रुपये आहे. हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साईडोंगर-१ परिसरात उभारला जात असून, कंपनीच्या दाव्यानुसार हे स्थल भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर आहे.

# अधिकाऱ्यांच्या बदल्या ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करा

## निवडणूक आयोगाचे पाच राज्यांना कडक आदेश

**नवी दिल्ली** : देशातील पाच राज्यांमध्ये आगामी २०२७ मध्ये पार पडणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पूर्वतयारीला केंद्रीय निवडणूक आयोगाने (ECI) आतापासूनच वेग दिला आहे. गोवा, मणिपूर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या पाच राज्यांमधील निवडणुकीशी थेट संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नवीन नियुक्त्यांबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने अत्यंत कडक आणि सविस्तर आदेश जारी केले आहेत.संबंधित पाचही राज्यांचे मुख्य सचिव (Chief Secretaries) आणि मुख्य निवडणूक अधिकारी (CEO) यांना पाठवलेल्या पत्रात, अधिकाऱ्यांच्या बदल्यांची ही सर्व प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून त्याचा अनुपालन अहवाल (Compliance Report) ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आयोगाकडे सादर करण्याचे थेट निर्देश देण्यात आले आहेत.



निवडणूक आयोगाने जारी केलेल्या पत्रानुसार, या पाच राज्यांतील विद्यमान विधानसभांचा कार्यकाळ पुढीलप्रमाणे संपत आहे:

**मणिपूरः** १३ मार्च २०२७

**गोवाः** १४ मार्च २०२७

**पंजाबः** १६ मार्च २०२७

उत्तराखंडः २८ मार्च २०२७

**उत्तर प्रदेशः** २२ मे २०२७

ECI Officer Transfer Criteria : 'या' अधिकाऱ्यांची होणार बदली

पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, निवडणुकीच्या कामाशी थेट जोडलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला खालील परिस्थितीत सध्याच्या महसूल जिल्ह्यात (Revenue District) कायम ठेवले जाणार नाही,

- जर संबंधित अधिकारी हा त्याच जिल्ह्याचा गृहजिल्हा (Home District) रहिवासी असेल गेल्या ४ वर्षांच्या कालावधीत त्या जिल्ह्यात ३ वर्षे पूर्ण केली असल्यास, अथवा गोवा, मणिपूर, पंजाब आणि उत्तराखंडसाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत आणि उत्तर प्रदेशसाठी ३१ मे २०२७ पर्यंत ३ वर्षे पूर्ण होणार असल्यास. या ३ वर्षांची मोजणी करताना जिल्ह्यातील पदोन्नतीचा कालावधी ग्राह्य धरला जाईल. मात्र, 'राज्य मुख्यालय' येथील सेवेचा कालावधी (जरी ते त्याच जिल्ह्यात असले तरी) यात मोजला जाणार नाही. तसेच बदली होणाऱ्या अधिकाऱ्यांना राज्य मुख्यालयात नियुक्ती देता येईल.

**No Re-appointment Rules : जुन्या मतदारसंघात पुनर्नियुक्तीवर बंदी**

आयोगाने आपल्या आदेशात विशेषतः बजावले आहे की, जिल्हा निवडणूक अधिकारी निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक (PI/PSI) किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना मागील विधानसभा निवडणुकीत किंवा त्यानंतर पार पडलेल्या कोणत्याही पोटनिवडणुकीत ज्या मतदारसंघ किंवा जिल्ह्यात नेमण्यात आले होते, तिथे पुन्हा पोस्टिंग दिली जाऊ नये.

# अन्नधान्य कडाडणार

**नवी दिल्ली** : एल निनोमुळे हवामानात होणारे प्रतिकूल बदल, खते आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे २०२७ मध्ये जागतिक अन्नधान्याच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. याचे परिणाम येत्या काही महिन्यांत अधिक स्पष्टपणे दिसून येतील, मात्र अन्नधान्यावरील पूर्ण परिणाम जाणवण्यासाठी काही काळ लागेल, असा निष्कर्ष एस अँड पी ग्लोबल या आंतरराष्ट्रीय संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टमध्ये नोंदवण्यात आला आहे.अत्यंत तीव्र एल निनोमुळे प्रमुख पीक उत्पादक क्षेत्रांतील कृषी उत्पादनांवर संकट येऊ शकते, असा इशाराही या रिपोर्टमध्ये देण्यात आला आहे. अतिशय तीव्र स्वरूपाचा एल निनो २०२६ च्या अखेरच्या टप्प्यात सर्वोच्च पातळीवर असेल.

यामुळे २०२७ मध्ये आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील प्रमुख शेतीप्रधान देशांमध्ये भीषण दुष्काळ किंवा अतिवृष्टीसारख्या संकटांची मालिका सुरू होऊ शकते.

# गद्दार खासदार खटला; ८ डिसेंबरला निकाली?

**नवी दिल्ली :** शिवसेनेशी बंडखोरी केलेल्या सहा गद्दार खासदारांसंबंधी खटला निकाली काढण्याची तयारी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दर्शवली. शिवसेनेने दाखल केलेल्या खटल्याच्या सुनावणीवेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावतीने न्यायालयात कोणीही हजर राहिले नाही. त्यावर ज्येष्ठ विधीज्ञ कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी जोरदार आक्षेप घेतला. त्याची गंभीर दखल घेतानाच न्यायालयाने शिवसेनेची याचिका अंतिमत: निकाली काढण्याचे संकेत दिले आणि पुढील सुनावणी ८ डिसेंबरला घेण्याचे निश्चित केले. शिवसेनेशी बंडखोरी केलेल्या सहा गद्दार खासदारांच्या शिंदे गटातील विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी बेकायदेशीर मंजुरी दिल्याचा दावा करीत शिवसेनेचे लोकसभेतील गटनेते अरविंद सावंत यांनी सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मंगळवारी न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्या शिवसेनेतर्फे ज्येष्ठ विधीज्ञ कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी बाजू मांडली. सुनावणीच्या सुरुवातीलाच खंडपीठाने लोकसभाध्यक्षांच्या हजेरीबाबत विचारणा केली. न्यायालयाने मागील सुनावणीवेळी लोकसभाध्यक्षांसह सहाही गद्दार खासदार व इतर प्रतिवादींना नोटीस बजावली होती आणि उत्तर मागवले होते.ज्येष्ठ विधीज्ञ सिब्बल यांनी लोकसभाध्यक्षांच्या हजेरीसाठी आणखी किती महिने प्रतीक्षा करायची, असा सवाल उपस्थित केला. प्रतिवाद्यांना जुलैमध्ये नोटीस जारी केली होती आणि आता ऑक्टोबर महिनाखेर आली आहे, याकडे सिब्बल यांनी लक्ष वेधले. त्यांच्या युक्तीवादाची न्यायालयाने गंभीर दखल घेतली आणि याचिका अंतिमत: निकाली काढण्याचे संकेत देत पुढील सुनावणीची तारीख ८ डिसेंबर निश्चित केली.शिवसेनेच्या मशाल चिन्हावर निवडून आलेल्या खासदारांनी दोन वर्षांतच मतदारांचा विश्वासघात करीत गद्दारी केली. या गद्दार खासदारांनी त्यांच्या शिंदे गटातील विलिनीकरणासाठी केलेली मागणी लोकसभा अध्यक्ष बिर्ला यांनी बेकायदेशीररित्या मंजूर केली, असा दावा अरविंद सावंत यांनी रिट याचिकेत केला आहे. त्यामुळे निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.







जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आजपासून गुरुकुलमध्ये पालखी पदयात्रा शिबिर महोत्सव

## -विविध ठिकाणांहून पालख्यांचे आगमन




**गुरुकुंज मोझरी/ प्रतिनिधीः-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या स्मृतिदिनानिमित्त श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी येथे दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ दरम्यान आयोजित ग्रामगीता तत्त्वज्ञान आचार महायज्ञ व पालखी पदयात्रा शिबिर महोत्सवाला बुधवारपासून प्रारंभ होत आहे. राष्ट्रसंतांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या महाराष्ट्रातील विविध गावांतील पालख्या गुरुकुंज मोझरीत दाखल होणार असून, राष्ट्रसंतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गुरुदेव सेवक व भाविक या महोत्सवात सहभागी होणार आहेत. पूज्य गीताचार्य तुकाराम दादा यांच्या विचारप्रेरणेतून श्री गुरुदेव सेवा मंडळ अड्याळ टेकडी, चमक, आष्टी, मांगलगाव, दापोरी खुर्द, सातर गाव, झोडगाव, खैरी, लहान आर्वी, तळेगाव मोहना, भुंगाव, भोकर, हिवरा लाहे, धामणगाव गढी, सालोराखुर्द, राजुरवाडी, वाठोडा, बेलज, तुळजापूर यांसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून पालख्या या महोत्सवात सहभागी होणार आहेत. बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता भुवैकुंठ आत्मानुसंधान, अड्याळ टेकडी येथील पालखीचे गुरुकुंज मोझरी येथे आगमन होईल. श्री भानुदास भाजीपाले गुरुजी, नरेंद्रजी ढाले व गुरुदेव सेवकांच्या हस्ते पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत सामुदायिक प्रार्थना होईल. प्रार्थनेच्या महत्त्वावर नामदेवराव गव्हाळे गुरुजी मार्गदर्शन करतील. यावेळी शिरजगाव मोझरी येथून शिदोरी महाप्रसादाची सेवा देण्यात येणार आहे. रात्री ८ ते ९ या वेळेत श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुलातील बाल कीर्तनकार आर्यन सुधीर निस्ताने व विवेक गहाणे यांचे प्रबोधन होईल. रात्री ९ ते ११ या वेळेत शिरजगाव मोझरी येथील श्रीकृष्ण महाराज झगेकर, गौरखेडा येथील नामदेव महाराज माकोडे व तळेगाव मोहना येथील श्रीकृष्ण महाराज आखरे यांचे राष्ट्रीय कीर्तन होणार आहे. या तीन दिवसीय महोत्सवात रक्तदान व देहदान जनजागृती शिबिर, विविध शिबिरे व संमेलने, भजन-प्रबोधन तसेच सप्तखंजिरीच्या माध्यमातून वैचारिक प्रबोधनाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंतांचे ग्रामविकास, मानवता, सर्वधर्मसमभाव, सेवाभाव व समाजप्रबोधनाचे विचार जनमानसात रुजविण्यासोबतच ते आचरणात आणण्याचा संकल्प या महोत्सवातून करण्यात येणार आहे. या महोत्सवात गुरुदेव सेवक, युवक-युवती, नागरिक आणि राष्ट्रसंतांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पालखी पदयात्रा शिबिर महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खोट्या दिव्यांग प्रमाणपत्रावर नोकरी मिळवणाऱ्यांवर कारवाई करा

## -प्रहार सामाजिक संघटनेची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेत खोट्या दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी प्रहार सामाजिक संघटनेच्या वतीने आज मंगळवार २७ ऑक्टोंबर रोजी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनानुसार, महानगरपालिकेत बनावट दिव्यांग प्रमाण पत्राच्या आधारे नोकरी मिळवणारे काही कर्मचारी आहेत. त्यांच्या प्रमाणपत्रांची सखोल चौकशी करण्यात यावी. या प्रकरणाची दखल घेऊन केलेल्या कारवाईचा अहवाल उपलब्ध करून द्यावा.दिव्यांग प्रमाणपत्र व युडीआयडी कार्डची सक्षम वैद्यकीय प्राधिकरणामार्फत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. नियुक्तीच्या वेळी सादर करण्यात आलेले प्रमाणपत्र, आदेश, निकष व अभिलेखांची तपासणी करावी. दोषी आढळणाऱ्यांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा, कारवाईत दिरंगाई झाल्यास त्याचे स्पष्ट उत्तर द्यावे, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.यावेळी प्रहारचे छोटू महाराज वसू, बंटी रामटेके यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वीजेचे तार चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## ३ आरोपी ताब्यात, २.५२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** महा वितरणच्या देवगाव येथील साईटवरून ॲल्युमिनियम चे विजेच्या तारा चोरणाऱ्या एका सराईत आंतरजिल्हा टोळीचा तळेगाव दशासर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी वर्धा येथील टोळीतील दोन मुख्य चोरट्यांसह चोरीचा माल खरेदी करणाऱ्या एका भंगार विक्रेता अटक केली आहे. राकेश रामदास राऊत (वय ३१) , गजानन पुंडलिकराव अर्जुनकर (वय ३६, दोघे राहणार खडकपुरा, नाचणगाव, देवली वर्धा) व रियाज खान फैयाज खान (वय ३२,इंदिरा,नगर ,पुलगाव) असे अटक आरोपींचे नावे आहे. त्यांच्याकडून ६० किलोग्रॅम ॲल्युमिनियम तार, रोख १ लाख, गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटार सायकल आणि तार कापण्याचा कटर असा एकूण २ लाख ५२ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. माहितीनुसार रिलायबल एंटरप्रायजेस कंपनीकडून देवगाव परिसरात विजेचे खांब आणि लाईन टाकण्याचे काम सुरू होते. याच दरम्यान अज्ञात चोरट्यांनी ३३ खांबांवरून सुमारे १७०० मीटर लांबीची ॲल्युमिनियम तार कापून चोरून नेली होती. चोरीला गेलेल्या तारेची किंमत सुमारे २ लाख ४२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारावर ,वर्धा जिल्ह्यातील नाचणगाव येथील गजानन पुंडलिकराव अर्जुनकर याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.चौकशीत गजाननने आपला साथीदार रोकेश रामदास राऊत याच्यासोबत मिळून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींनी खुलासा केला की, त्यांनी चोरीची तार पुलगाव निवासी भंगार विक्रेता रियाज खान फैय्याज खान याला केवळ २६ हजार ८२० रुपयांमध्ये विकली होती. यानंतर पोलिसांनी तात्काळ तिन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून लाखोचे मुद्देमाल जप्त करण्यात आले पोलीस अधीक्षक निकेतन कदम अप्पर अधीक्षक दत्ता तोटेवार उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक निरीक्षक आणि तलेगावचे ठाणेदार किरण ओटे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक स्वाप्निल रणखांब, युवराज मानमोठे, रमेश टाले, विनोद राठोड, संदीप चव्हाण, यशवंत काळे निखिल साव यांनी कारवाई मध्ये सहभाग केला.

करजगाव, ता. चांदूर बाजार; ह.मु. मुगलाईपुरा, परतवाडा) याच्या घराची झडती घेतली. घराच्या मागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत विक्रीसाठी मांस, वजनकाटा, वजनाचे गोटे, लोखंडी सुरी आणि लाकडी ठोकळा आढळून आला.

पंचांसमक्ष मांसाचे वजन केले असता ते ८० किलो भरले. पोलिसांनी अंदाजे १६ हजार रुपये किमतीचे मांस, एक हजार रुपये किमतीचा लोखंडी तराजू व एक किलो वजनाचा गोटा, तसेच अंदाजे ५०० रुपये किमतीची लोखंडी सुरी आणि अन्य साहित्य जप्त केले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १७ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७६१/२०२६ नोंदविण्यात आला असून, महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियमाच्या कलम ५, ५(क), ९ आणि ९(अ) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सलीम शेख करीत आहेत.

ही कारवाई परतवाड्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक सलीम शेख, पोलीस अंमलदार सचिन होले, सुधीर राऊत, शुभम शर्मा, सचिन कोकणे, घनश्याम किरोले आणि महिला पोलीस अंमलदार वैशाली पवार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

पाणी नदीपात्रात सोडण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे आंदोलन मागे घेऊन पाणी सोडण्यात आले नाही तर दि.२५ ऑक्टोबरला पुन्हा त्याच ठिकाणी आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला होता.शेवटी उमेश शहाणे यांच्या आंदोलनापुढे प्रशासन नरमले व आजपासून उमेश शहाणे यांच्या हस्ते विधीवत जलपूजन व नारळ फोडून शेतकऱ्यांसाठी पाण्याचे आवर्तन सुरू झाले. यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख उमेश शहाणे,कुलदीप गौरखेडे, कनिष्ठ अभियंता अचलपूर जलसंपदा विभागाचे कनिष्ठ अभियंता,रोशन जयसिंगपूरे युवासेना तालुकाप्रमुख चांदूरबाजार,निलेश पोहकार,सचिन निंभेकर, मेघ सुरोसे,अमित देशमुख,गोकुळ राऊत, रुपेश लुंगे यासह गाव खेड्यातील शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

### चांदूर बाजारात गांजा तस्कराला

ठाण्याचे पथक गस्तीवर असताना पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ गांजाची अवैध विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून छापा टाकला. यावेळी अजगर शहा उर्फ छोटू मोहम्मद शहा हा आढळून आला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे २२० ग्रॅम गांजा, ज्याची अंदाजे किंमत ३ हजार ३०० रुपये, तसेच गांजा विक्रीचे ४६० रुपये मिळून आले. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला. प्राथमिक चौकशीत संबंधित गांजा अमरावती येथून आणल्याचे आरोपीने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात चांदूर बाजार पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) व २०(ब)(ii)(अ) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई चांदूर बाजारचे पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक संजीव खंदारे, पोलीस अंमलदार रविंद्र बावणे, आशीष राऊत आणि जितेश सावरकर यांच्या पथकाने केली.

## १ व १० वरिल उर्वरित

### महायुतीचे किरण सरनाईक

सुमारे २८ हजार मतांची मोजणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दुसऱ्या फेरीच्या आकडेवारी नुसार, किरण सरनाईक यांना ७२३७ मते मिळाली असून त्यांनी आघाडी कायम ठेवली आहे. श्रीकांत देशपांडे ४१९५ यांना मते मिळाल्याने ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर काँग्रेसच्या आदिती पोहरे यांना ३५८४ मते मिळाली आहेत. इतर उमेदवारांनाही काही मते मिळाली. यामध्ये वेध १३७०५ तर अवैध मते २९५ आहेत. मतमोजणीच्या पुढील टप्प्यांमध्ये चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ही निवडणूक पसंती क्रमानुसार होत असल्याने केवळ पहिल्या पसंतीच्या मतांवरून अंतिम निकालाचा निष्कर्ष काढणे घाईचे ठरू शकते. त्यामुळे पहिल्या पसंतीच्या मतांनंतर दुसऱ्या पसंतीच्या मतांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

**भाजपामधील बंडखोर माघारले-** महायुतीचे किरण सरनाईक यांच्या विरोधात बंडखोरी करणारे इतर उमेदवार मतमोजणीत माघारले आहेत. भाजपच्या बंडखोर उमेदवार आणि खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे यांना १४८६ मते मिळाली आहेत. तर भाजपचे दुसरे बंडखोर उमेदवार चंद्रशेखर भोयर यांना १०५५ मते मिळाली आहेत. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे उमेदवार दिलीप कडू यांना ८५७ तर नुटा समर्थित प्रा. डॉ. प्रशांत विघे यांना ५१२ मते प्राप्त झाली आहेत.

**पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त-** लोकशाही भवन येथे मतमोजणी प्रक्रिया सुरू असून या ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. रात्री उशिरापर्यंत मतमोजणी सुरू राहणार असून बुधवारी २८ ऑक्टोबर रोजी निकाल येण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडे जाणारा मार्ग एका दिशेने सुरू ठेवण्यात आला आहे. रात्री आठनंतर हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णतः बंद केला जाईल. मतमोजणी प्रक्रिया दरम्यान पोलीस आयुक्त राकेश ओला आणि जिल्हाधिकारी येरेकर यांनी लोकशाही भवन परिसरात भेट देऊन आढावा घेतला आणि सुरक्षा व्यवस्था पाहिली. यावेळी डीसीपी यशवंत सोळंके, श्याम घुगे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

### ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक, दोघे

गावी एकाच दुचाकीने जात होते. यावेळी एमएच १४ एलक्स १३२० क्रमांकाची पर्पल कंपनीची ट्रॅव्हल्स ही नागपूर वरून अमरावतीच्या दिशेने जात होती. याच दरम्यान महामार्ग ओलाडून वरखेड फाट्याकडे आपल्या दुचाकीने जात असताना ट्रॅव्हल्सची जबरदस्त अशी धडक दुचाकीला बसली.यात घटनास्थळीच निखिल बोके व कैलास कळंबे यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.ट्रॅव्हल्ससह चालकाला ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

मृतक कैलास कळंबे यांची पत्नी ही आठ महिण्याची गर्भवती असून पुढील महिण्यातच पत्नीच्या प्रसुतीची तारीख होती. कुटुंबात लवकरच आंनदाचे वातावरण येणार होते, अशातच पतीच्या निधनाची माहिती कुटुंबाला मिळाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतक कळंबे यांच्या पच्छात आई, वडिल, एक मुलगी तर निखिल बोके यांच्या पश्चात आई, वडिल आहेत.

### अमरावती बाजार समितीवर

कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने चौकशीचे आदेश दिले होते. चौकशी अहवालात काही त्रुटी आढळल्याने शासनाने संचालक मंडळ बरखास्त करून त्या ठिकाणी प्रशासकाची नियुक्ती केली होती. प्रशासक नियुक्तीच्या विरोधात संचालक मंडळाने हायकोर्टात धाव घेतली होती. त्यांचे म्हणणे आहे की, आमचा ५ वर्षांचा कार्यकाळ अजूनही बाकी आहे.आम्हाला कोणतीही नोटीस न देता किंवा बाजू मांडण्याची संधी न देता थेट प्रशासक लावणे हे बेकायदेशीर आहे.ही कारवाई राजकीय दबावातून आणि सूडबुद्धीने करण्यात आली आहे.त्यामुळे प्रशासकाची नियुक्ती रद्द करून आम्हाला पुन्हा कामकाज करू द्यावे, अशी मागणी संचालकांनी याचिकेतून केली होती. या याचिकेवर नागपूर खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी शासनाच्या वतीने सरकारी वकिलांनी बाजू मांडताना सांगितले की, बाजार समितीच्या कारभारात गंभीर अनियमितता आढळल्या असून शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासक नियुक्ती करणे आवश्यक होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने संचालक मंडळाला कोणताही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला. कोर्टाने स्पष्ट शब्दात सांगितले की, 'सध्या तरी प्रशासकच कामकाज सांभाळतील. प्रशासकाच्या नियुक्तीला आम्ही स्थगिती देणार नाही.' या प्रकरणाची पुढील सविस्तर सुनावणी पुढील महिन्यात ठेवण्यात आली आहे. तोपर्यंत बाजार समितीचा संपूर्ण कारभार प्रशासकाच्याच हाती राहणार आहे. या निर्णयानंतर सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.बाजार समितीवर प्रशासक कायम राहिल्याने सध्या तरी निवडणुकीची शक्यता मावळली आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या सुनावणी कडे आता सर्व संचालक, व्यापारी आणि शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. या निर्णयामुळे बाजार समितीतील मनमानी कारभाराला आळा बसेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे, तर संचालक मंडळाने आम्ही सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देऊ, असा पवित्रा घेतला आहे.

### चांदूर रेल्वेत जुगार अड्डयावर

अनुषंगाने २६ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदूर रेल्वे उपविभागात गस्तीवर असताना मारवाडी लाइन परिसरातील बजरंगबली मंदिराजवळ असलेल्या टिनाच्या शेडमध्ये जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. तेथे आठ जण गोलाकार बसून ५२ पत्त्यांच्या सहाय्याने पैशांची बाजी लावत 'एक्का बादशा' नावाचा हारजीतचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी आठही जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ३३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगारासाठी वापरलेली रोख रक्कम व साहित्य यासह तीन दुचाकी वाहने जप्त केली. यामध्ये हिरव्या रंगाची यामाहा दुचाकी (एमएच २७ बीवाय ६०४७) किंमत ७० हजार रुपये, काळ्या रंगाची पॅशन प्रो दुचाकी (एमएच २७ सीएम ५९०३) किंमत ६० हजार रुपये आणि काळ्या रंगाची टीव्हीएस फिनिक्स दुचाकी किंमत ४० हजार रुपये, असा वाहनांचा एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल आहे. रोख रक्कम व इतर साहित्य मिळून एकूण २ लाख ३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत चंदन उर्फ भल्ला सुरेश मारोटे (वय ४१, रा. मारवाडी लाइन), अरुण शहा सज्जार शहा (वय ४२, रा. चांदुरवाडी), अमोल श्रीराम राऊत (वय २७, रा. खडकपुरा), प्रवीण सुरेश ठाकरे (वय ४६, रा. गांधी चौक), महेश मोरेश्वर इंगळे (वय ४६, रा. गोदावरी नगर), अब्दुल फरहान अ. फिरोज (वय २१, रा. डांगरीपुरा), मो. आसीफ नूर मोहम्मद (वय ३०, रा. काजीपुरा) आणि मो. रफीक मो. आसीफ (वय ४३, रा. शिवाजीनगर), सर्व रा. चांदूर रेल्वे, यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली.

### परतवाड्यात ८० किलो गोमांस

डी.बी. पथकासह गस्तीवर असताना मुगलाईपुरा परिसरात गोमांसाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंच आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रियाज अहमद शेख इब्राहीम (वय ५२, रा. मूळ

### अचलपूरात देवडी परिसरातील

निवेदन व्यापाऱ्यांनी अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने,अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांना दिले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की , देवडी परिसरातील मुख्य रस्त्यावर सदैव उडणाऱ्या धुळीमुळे व्यापारी वर्गासह सामान्य माणसाचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे व्यापारी वर्ग मास्क लावून काम करीत आहे. याचा परिमाण म्हणून ग्राहकांची सुद्धा संख्या कमी होत आहे .यामुळे आगामी दिवाळी सणाच्या निमित्ताने ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी व्यापारी वर्गाकडून करण्यात आली आहे.

अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून देवडी रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचा कामाच्या प्रक्रियेला वेग दिला आहे. त्यापूर्वी तात्पुरता स्वरूपात या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी व्यापारी वर्गाकडून करण्यात आली आहे. निवेदन देतांना यावेळी प्रफुल विखार ,पंकज अग्रवाल , रोहित शर्मा,राहुल अग्रवाल ,आतिश सुंडेवाले, राम खंडेलवाल आदी व्यापारी वर्ग उपस्थितीत होते.

### अमरावतीत राष्ट्रीय जंतनाशक

शाळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाला अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, शहरी आरोग्य केंद्र हमालपुरा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी मुरके, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाठबागे तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत नालसे यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेच्या माध्यमातून बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या उपक्रमाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही विभागांनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्यामुळे शालेय स्तरावर आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यास मदत होत आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी मनोगत करतांना सांगीतले की, राष्ट्रीय जंतनाशक मोहीम ही विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मोहीम आहे. बालकांचे आरोग्य उत्तम राहावे, त्यांची शारीरिक व बौद्धिक वाढ योग्य प्रकारे व्हावी आणि त्यांना निरोगी जीवन जगता यावे, यासाठी अशा आरोग्यविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असेल, तर त्यांची शैक्षणिक प्रगतीही अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते. त्यामुळे बालकांच्या आरोग्य संवर्धनाला प्राधान्य देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक किरण नालिंदे, वैशाली बुटे, किरण शेंडे, रुबिना शेख, शिरीष फसाटे, श्याम गोंगे, जितेंद्र चवरे, पुष्पा कोरडे, सोनाली चापके, आरोग्य सेविका आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षा दिवे यांनी केले.

### युवासेनेचे जिल्हाप्रमुख उमेश

शेतकऱ्यांसह नदी काठावरील गावातील नागरिकांना पशुधन आणि वन्यजीवांना दिलासा मिळणार आहे. अचलपूर मध्यम व लघुसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता उमप यांनी जारी केलेल्या पत्रानुसार चारघड लघुसिंचन प्रकल्पाच्या मुख्य कालव्यावरील अतिरिक्त जलप्रवाह मार्गातून जवळच्या नाल्याद्वारे चारघड नदीपात्रात पाणी सोडण्यात आल्यामुळे १७ ते १८ गावातील नागरिक शेतकरी सुजलाम सुफलाम होणार आहे.

हे अतिरिक्त सोडण्यात आलेले पाणी ऊतखेड, खोपडा,लाडकी,निंभी मार्गे थेट नयावाठोडा येथील अखेरच्या टोकापर्यंत पाण्याचे आवर्तन होणार आहे. गेल्या कित्येक वर्षानंतर यावर्षी भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारगड धरणातील पाणी चारगड नदीपात्रात सोडून नदी पुन्हा प्रवाहित करण्यात यावी.या मुख्य मागणीसाठी अनेक वेळा प्रशासनाला निवेदने देण्यात आली होती.

दि.१९ ऑक्टोबर रोजी आंदोलनकर्त्यांना चारगड प्रकल्पातील

### प्रतिबंधित ७२५ किलो प्लास्टिक

प्रतिबंधित प्लास्टिक कॅरिबॅगचा साठा आढळून आल्याने महानगरपालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण ७२५ किलो प्रतिबंधित प्लास्टिक कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या असून संबंधितांवर ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या प्लास्टिक मालाची अंदाजे किंमत एक लाख रुपये असून संबंधितांवर ५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. या मोहिमेत प्लास्टिक बंदी नोडल अधिकारी ए. के. गोहर, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, मेघराज ढेनवाल, अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित बीटप्यून सहभागी झाले होते. प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर, साठवणूक व विक्री रोखण्यासाठी महानगरपालिकेकडून तपासणी आणि कारवाईची मोहीम राबविण्यात येत असून, शहर स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी नागरिक आणि व्यावसायिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### ॲड. निलेश हेलोंडे जिल्ह्याच्या

येथे आगमन व मुक्काम.

शुक्रवार ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता चिखलदरा येथे वन विभागाचे चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी २ वाजता तहसिलदार, चिखलदरा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. दुपारी ३ वाजता अमरावतीकडे प्रयाण करतील. दुपारी ५ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे आगमन व कार्यालयीन कामकाज सांयकाळी ६.३० वाजता अमरावतीवरून काटोलकडे प्रयाण करतील.

### डाक विभागाची आंतरराष्ट्रीय

पाठवताना संबंधित देशाच्या सीमाशुल्क नियमांनुसार आवश्यक घोषणापत्रे आणि कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. कोणत्याही देशात पार्सल बुकिंग करण्यापूर्वी ग्राहकांनी त्या देशातील आयात नियमांची सविस्तर माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहेत.

या दिवाळीत भौगोलिक अंतर विसरून परदेशातील प्रियजनांपर्यंत घरच्या फराळाची गोड चव पोहोचवण्यासाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### दहा वर्षांपासून फरार फसवणुकीच्या

कर्मचाऱ्यांना दिले होते. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना त्यांना फरार आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली. चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ३२१/२०१६ मधील आरोपी प्रवीण देशमुख हा राजुरा परिसरात असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार, पथकाने राजुरा परिसरात शोधमोहीम राबवून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. भारतीय दंड विधानाच्या कलम ४२० व ३४ अन्वये दाखल असलेल्या या गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आली. गेल्या दहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पोलीस अंमलदार श्यामकुमार गावंडे, रविंद्र वऱ्हाडे आणि वाहनचालक संजय प्रधान यांचा समावेश होता.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## भाजपाचे शासन हे स्वातंत्र्यावर हल्ला करणारे आहे - ॲड. बाळासाहेब आंबेडकर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक उलेमाले लेआऊट येथे दि.२६ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे.

पण या दुष्काळात शासन फक्त घोषणा करते.दिवाळी पर्यंत पाच रुपये देणार.परंतु शेतकऱ्यांना म्हणावं तुम्ही फक्त वाट पहा शासन काही मदत देणार नाही.

एवढेच काय तर आम्ही आर एस एस प्रमुख,भाजप प्रमुख यांच्या घरापुढे आम्हाला



पाणी व जेवणाची सोय करा.यासाठी सर्वांनी तयारी करावी.तुम्ही अशांना निवडून देता की त्याला शासनात साधे प्रश्नही मांडता येत नाही.तर तो काय विकास करणार,आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणत छोटी छोटी राज्ये निर्माण झाली तर विकास होतो.परंतु अकोला जिल्ह्यातून वाशीम जिल्हा वेगळा झाला २८ वर्ष लोटली पण उलट वाशीम जिल्हा हा आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळखला जात आहे.म्हणू मतदारांनो जागृत व्हा.मतदान हे स्वातंत्र्याचे निशाण असून न सरकार हे स्वातंत्र्यावर हल्ला करणारे आहे.

यावेळी प्रा.अंजलीताई आंबेडकर, सुजातदादा आंबेडकर, राजेंद्र पातोडे,माजी आमदार खतीब, पश्चिम चे जिल्हाध्यक्ष दत्तराव धांडे, पूर्व चे जिल्हाध्यक्ष विलास खिल्लारे यांनीही मार्गदर्शन केले कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष सिद्धार्थ भगत होते.तर प्रास्ताविक शाळीग्राम पठाडे यांनी केले.सुत्रसंचालन मुकुंद वानखेडे तर आभार प्रदर्शन हर्षल इंगोले यांनी केले.कार्यक्रमाला जिल्ह्यातून बहूसंख्येने उपस्थिती होती.

## रेल डाक सेवा काउंटरवर आता रात्रीही होणार पार्सल बुकिंग !

**अकोला :** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आपल्या प्रियजनांना भेटवस्तू, मिठाई आणि पारंपरिक दिवाळी फराळ पाठवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी भारतीय टपाल विभागाने एक मोठा दिलासा दिला आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सणाच्या काळात सुलभ सेवा देण्यासाठी अकोला रेल्वे स्टेशन परिसरातील 'अकोला रेल डाक सेवा' (आरएमएस) काउंटरवर विशेष रात्रीकालीन पार्सल बुकिंग सुविधा सुरू करण्यात आली आहे. दिवाळीच्या या आनंददायी काळात अकोला आणि परिसरातील सर्व नागरिकांनी टपाल विभागाच्या या विस्तारित बुकिंग सुविधेचा आणि विश्वासार्ह सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन रेल डाक सेवा (नागपूर) चे अधीक्षक गणेश बा. आंभोरे तसेच अकोला रेल डाक सेवा यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

## कर्जमाफीच्या यादीत नाव, केवायसीही पूर्ण; तरी शेतकरी कर्जमाफीपासून वंचित !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या लाभार्थी यादीत नाव समाविष्ट होऊनही तसेच आवश्यक केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही स्टेट बँक ऑफ इंडिया, मसला पेन शाखेकडून अद्याप कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याची तक्रार रिसोड तालुक्यातील दापुरी व केशवनगर येथील तीन शेतकऱ्यांनी केली आहे. याप्रकरणी ज्ञानेश्वर सरनाईक, शामसुंदर खोटे आणि गजानन लोखंडे यांनी २६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन तातडीने न्याय देण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, तिन्ही शेतकऱ्यांची नावे कर्जमाफी योजनेच्या पहिल्या यादीत समाविष्ट झाली आहेत. तसेच ज्ञानेश्वर सरनाईक यांनी २७ जुलै, गजानन लोखंडे यांनी २८ जुलै,



तर शामसुंदर खोटे यांनी २९ जुलै २०२६ रोजी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. असे असतानाही संबंधित बँकेकडून त्यांच्या कर्ज खात्यांना अद्याप कर्जमाफीचा लाभ देण्यात आलेला नाही. यासंदर्भात शेतकऱ्यांनी अनेकदा मसला पेन येथील स्टेट बँकेच्या शाखा व्यवस्थापकांची भेट घेऊन विचारणा केली. मात्र, कर्जमाफी अद्याप का झाली नाही, याबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर मिळाले. जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा करण्याचा सल्लाही बँकेकडून देण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले आहे. आधीच अपुऱ्या पावसामुळे शेतीतील पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून कर्जमाफी मंजूर होऊनही प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने नव्याने पीककर्ज घेण्याचा मार्गही अडल्याची व्यथा या शेतकऱ्यांनी मांडली आहे. शासनाच्या योजनेत पात्र ठरूनही बँकेच्या स्तरावर लाभ रखडत असल्याने आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे संबंधित बँकेला तातडीने आवश्यक आदेश देऊन इतर पात्र शेतकऱ्यांप्रमाणे आपलीही कर्जमाफी मंजूर करावी आणि प्रलंबित लाभ तत्काळ खात्यात जमा करावा, अशी मागणी ज्ञानेश्वर सरनाईक, शामसुंदर खोटे आणि गजानन लोखंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## उ.प्रे वाराणसीच्या वंदे मातरम राष्ट्रीय शिबिरात प्रदिप पट्टेबहादूर यांचा डंका



■ प्रतिनिधी | वाशिम ■

उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे युवा कार्यक्रम एव खेल मंत्रालय भारत सरकार मेरा युवा भारत केंद्र, वाराणसी यांच्या वतीने संत अतुलानंद कॉन्व्हेंट स्कूल कॅम्पसमध्ये १५ ते २१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान आयोजित सात दिवसीय निवासी 'वंदे मातरम् राष्ट्रीय शिबिर-२०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.या शिबिरात वाशिम जिल्ह्यातील युवा स्वयंसेवक प्रदिप पट्टेबहादूर, यांनी महाराष्ट्राच्या पारंपरिक वासुदेव लोकनृत्याचे प्रभावी सादरीकरण करून सहा राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी सहकलाकार श्री.सरस्वती समाजकार्य महाविद्याल वाशिम विद्यार्थिनी आकांक्षा गायकवाड, ऋषिकेश चौधरी (मानोरा)यांचे या सादरीकरणाला विशेष सहकार्य लाभले.ष्सांस्कृतिक कार्यक्रमात प्रदीप पट्टेबहादूर यांनी वासुदेवाची पारंपरिक वेशभूषा परिधान करून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन परराज्यात घडविले. त्यांच्या सादरीकरणातून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा वारसा राष्ट्रीय स्तरावर पोहोचला. या यशामध्ये महाराष्ट्रातून सहभागी कलाकारांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गट ग्रा.पं.जांब येथे जिल्हाधिकारी यांची भेट

### संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा योजनेची पाहणी; पाइपलाइन गळती रोखण्यावर भर

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

तालुक्यातील गट ग्रामपंचायत जांब येथे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी भेट देऊन पाणीपुरवठा योजनेची पाहणी केली. यावर्षी अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे आगामी काळात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, पाण्याचे योग्य नियोजन आणि उपलब्ध पाण्याची बचत करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरली.

गावातील पाणीपुरवठा योजनेची सद्यस्थिती, पाइपलाइनमधून होणारी पाण्याची गळती, पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल आणि उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन या बाबींची यावेळी पाहणी करण्यात आली. पाइपलाइनमधील गळती तातडीने शोधून तिची दुरुस्ती करणे, पाण्याचा अपव्यय रोखणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने



वापर करणे याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास भविष्यात गावाला पाणीटंचाईच्या गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे आतापासूनच पाणीपुरवठ्याचे प्रभावी नियोजन करणे, पाण्याचे योग्य वितरण सुनिश्चित करणे आणि पाणी बचतीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या भेटीदरम्यान पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, गटविकास अधिकारी सारिका कारले, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर, नायब तहसीलदार रवी राठोड आणि पोलीस निरीक्षक किशोर शेळके उपस्थित होते. यावेळी गट ग्रामपंचायत जांबच्या सरपंच सुनीता खिराडे, ग्रामपंचायत सचिव सीमा सुर्वे, पाणीपुरवठा समितीचे सौरभ दादा सपकाळ, रामेश्वर गांजरे, धनंजय आव्हाळे, पुरुषोत्तम भुजाडे, पंकज येवले, सुनील सातपुते, योगिता दहापुते यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व गावातील नागरिक उपस्थित होते.संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाणीपुरवठा योजनेतील त्रुटी दूर करणे, पाइपलाइन गळती रोखणे आणि उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे, या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांच्या या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## बदनामीच्या भीतीतून बापानेच केला मुलीचा खून

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

समाजात बदनामी होत असल्याच्या कारणावरून पित्यानेच स्वतःच्या ३५ वर्षीय विवाहित मुलीचा शेल्याने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना मालेगाव तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथे २० ऑक्टोबर रोजी घडली. घटनेनंतर तब्बल सहा दिवसांनी अर्थात आज २६ ऑक्टोबर रोजी या प्रकरणाचे बिंग फुटले असून, मृत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी पित्याविरुद्ध मालेगाव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनीषा उमेश नायकवाल (वय ३५, मूळ रा. कोरेगाव, ता. सेनगाव, जि. हिंगोली, हल्ली मुक्काम ब्राह्मणवाडा) हिचे एका युवकावर प्रेम होते. त्यामुळे ती आपल्या पतीला सोडून त्या युवकासोबत निघून गेली होती. या प्रकारामुळे समाजात कुटुंबाची बदनामी होत असल्याचा संशय आणि राग मनात धरून वडील संतोष मारोती गोटे (वय ५२, रा. ब्राह्मणवाडा) यांनी दसऱ्याच्या दिवशी, २० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घरातच मनीषा हिचा शेल्याने गळा आवळून खून केला. घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या मृत मुलीच्या आई वर्षा संतोष गोटे (वय ४५) या प्रचंड घाबरल्यामुळे त्यांनी सुरुवातीला याबाबत कोणालाही माहिती दिली नाही. दरम्यान, २६ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी या प्रकरणाबाबत संशयावरून वर्षा गोटे यांच्याकडे विचारपूस केली. पोलिसांनी योग्य संरक्षणाची हमी दिल्यानंतर त्यांनी घडलेला सर्व प्रकार सांगितला आणि मालेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली.

## कोलार येथील सत्संगाला राज्यस्तरीय ध्यानयोग तज्ज्ञ प्रा. स्वातीताई जाधव यांची हजेरी!



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील कोलार येथील श्रीराम मंदिरात राज्यस्तरीय ध्यानयोग शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. या शिबिरात ध्यानयोगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि दैनंदिन जीवनात ध्यानसाधनेचा अवलंब कसा करावा, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या धावपळीच्या जीवनात वाढता मानसिक ताण, चिंता आणि आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी ध्यानयोग उपयुक्त ठरतो. नियमित ध्यानसाधनेमुळे मन:शांती, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होते. तसेच निरोगी जीवनशैलीसाठी ध्यानयोगाचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमात विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, ध्यानयोगाचे मार्गदर्शक सौ. प्रा. स्वातीताई जाधव आणि साधक उपस्थित होते. उपस्थितांना ध्यानयोगाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. ध्यानयोगाच्या माध्यमातून समाजात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेशही देण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरविंद इंगोले पाटील, सत्संग चार्या गुरुदेव जिजकार काका, रामरावजी पाटील, ध्यान योगक अनिरुद्ध पिंपळे, ठाकरे सर, भास्कडे सर, मिटकरी सर, डॉ अविनाश लोथे, चंद्रशेखर भड, गणेश जोशी, सावकार नेमाने, श्याम खोड, सुभाष पाटील, पंकज ठाकरे इत्यादीसह सत्संग मंडळींची उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांनी ध्यानयोगाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी नियमित ध्यानसाधना करून निरोगी आणि आनंदी जीवन जगावे, असे आवाहन केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी पोषण व सुदृढ आरोग्य जनजागृती प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने भारत माध्यमिक शाळेत किशोरवयीन मुला-मुलींसाठी 'पोषण, संतुलित आहार व सुदृढ आरोग्य' या विषयावर जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम दि. २३ ऑक्टोबर आयोजित करण्यात आला. यावेळी 'विकसित भारत संकल्प यात्रा' अंतर्गत रोजी आयोजित रांगोळी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करून त्यांच्या कलागुणांचा गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे विश्वस्त ॲड. नकुलदादा देशमुख आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी गृहविज्ञान विभागाच्या कार्यक्रम सहाय्यक तथा विभागप्रमुख शुभांगी वाटाणे यांनी किशोरावस्थेतील पोषणविषयक गरजा, संतुलित आहाराचे महत्त्व आणि आरोग्यदायी जीवनशैली याविषयी शास्त्रीय मार्गदर्शन केले. किशोरावस्थेत शरीराची झपाट्याने वाढ होत असल्याने ऊर्जा, प्रथिने, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वांची गरज वाढते. त्यामुळे आहारात डाळी, कडधान्ये, दूध व दुग्धजन्य पदार्थ, हिरव्या पालेभाज्या, हंगामी फळे आणि विविध पौष्टिक अन्नघटकांचा समावेश करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच रक्तक्षय प्रतिबंध, जंक फूड व अतिरिक्त साखरेचे मर्यादित सेवन, नियमित शारीरिक व्यायाम, पुरेशी झोप, वैयक्तिक स्वच्छता आणि सुरक्षित पिण्याचे पाणी यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

## संस्कृतीतील बदलांनाच लोक प्रगती समजतात! डॉ. किरण कुलकर्णी यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

संस्कृती म्हणजे केवळ परंपरा नव्हे, तर विचार, आचार, मूल्ये आणि जीवनशैली यांचा समुच्चय आहे. काळानुसार संस्कृतीत बदल होत असतात; मात्र प्रत्येक बदलाला प्रगती समजणे योग्य नाही. भौतिक सुखाच्या हव्यासातून वाढणारा चंगळवाद आणि बदलता जीवनदृष्टिकोन यामुळे संस्कृतीचे मूळ स्वरूप हरवण्याची भीती आहे, असे प्रतिपादन मुंबई येथील मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

कै. नानासाहेब दहीहांडेकर प्रांगणात सुरू असलेल्या शरद व्याख्यानमालेत 'पश्चिम विदर्भ संस्कृतीच्या झरोख्यातून वर्तमान' या विषयावर ते बोलत होते.



व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे अध्यक्ष प्रमोद दहीहांडेकर आणि डॉ. राम गुंजाटे यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी सौ. कुलकर्णी यांचे स्वागत आमदार सईताई डहाके यांनी, तर उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांचे स्वागत अनिरुद्ध सावजी यांनी केले. सौ. सीमा तांबोळकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

### वऱ्हाडी भाषा ही संस्कृतीचा आत्मा!

पश्चिम विदर्भाच्या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेचा आढावा घेताना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, वऱ्हाडी भाषा ही या संस्कृतीचा आत्मा असून, विविध जिल्ह्यांमध्ये तिचा गोडवा आणि वेगळेपण अनुभवायला मिळते. येथील लोकपरंपरा, प्रथा आणि लोककलांनी प्रादेशिक संस्कृती समृद्ध केली आहे. सातपुडा पर्वतरांगेतील मेळघाट परिसरात राहणाऱ्या कोरकू आणि गोंड या आदिवासी जमातींचेही या सांस्कृतिक समृद्धीत महत्त्वपूर्ण योगदान आहे.

## मायक्रो फायनान्स व बँकांच्या कर्जाला स्थगिती देऊन व्याजमाफी द्या : विवेक गवळी



**मालेगाव :** तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बचत गट तसेच मायक्रो फायनान्स आणि बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या वसुलीला तात्पुरती स्थगिती देण्यात यावी तसेच दुष्काळी काळातील कर्जावरील व्याज माफ करण्यात यावे अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख ओबीसी सेल वाशिम विवेक बबनराव गवळी यांनी विनंती अर्जाने केली आहे

तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांसमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे महिला बचत गटातील सदस्य तसेच कर्ज घेतलेल्या पुरुष व महिलांना नियमित उत्पन्न नसल्याने कर्जाचे हप्ते भरणे कठीण झाले आहे.अशा परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपन्या तसेच बँकांशी संबंधित कर्मचारी कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी महिला व नागरिकांकडे वारंवार तगादा लावत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे हप्ते थकीत राहिल्यास सक्तीची वसुली तसेच मानसिक त्रास दिला जात असल्याने दुष्काळी परिस्थितीत कर्जदारांची अडचण आणखी वाढत असल्याचे गवळी यांनी म्हटले आहे

दुष्काळी परिस्थितीचा विचार करून संबंधित विभागाने मायक्रो फायनान्स कंपन्या व बँकांना कर्जवसुली थांबविण्याचे आदेश द्यावेत तसेच दुष्काळी कालावधीतील कर्जाच्या व्याजावर माफी किंवा सवलत देण्यात यावी.

## शिक्षक सहकारी पतसंस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करा!

### आदर्श बहुजन शिक्षक संघाचे जिल्हा उपनिबंधकांना निवेदन; प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याचीही मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या आगामी निवडणुकीचा कार्यक्रम वेळेत जाहीर करावा, तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी संस्थेला निर्देश द्यावेत, अशी मागणी आदर्श बहुजन शिक्षक संघ (इब्टा), वाशिमच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांना निवेदन सादर करण्यात आले.

वाशिम प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून, विद्यमान संचालक मंडळाची मुदत ८ मार्च २०२७ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीचा कार्यक्रम वेळेत जाहीर करून निवडणूक प्रक्रिया नियोजित वेळेत पूर्ण करावी, अशी मागणी संघटनेने केली. यापूर्वी संस्थेची निवडणूक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी पार पडली होती. त्यानंतर २४ डिसेंबर २०२२ रोजी



वृत्तपत्रांमध्ये निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर सर्व सभासदांच्या हितासाठी निवडणूक प्रक्रियेला वेळेत सुरुवात होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी संस्थेला पत्र देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या मागणीसंदर्भात जिल्हा उपनिबंधकांनी संबंधित लिपिकाला पत्र काढण्याच्या सूचना दिल्या असून, लवकरच पत्र निर्गमित करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, दुष्काळी परिस्थिती किंवा अन्य कारणांचा आधार घेऊन निवडणूक पुढे ढकलण्याचा प्रयत्न झाल्यास सभासदांच्या हिताचा विचार करून नियमानुसार योग्य निर्णय घ्यावा. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासक नियुक्त करण्याबाबतही विचार करावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

यावेळी आदर्श बहुजन शिक्षक संघाचे राज्य संघटक गजाननराव गायकवाड, राज्य उपाध्यक्ष विजय सोनोने, विभागीय अध्यक्ष दीपक जावळे, जिल्हाध्यक्ष महेंद्र खडसे, वाशिम तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण कडसर, प्रसिद्धिप्रमुख दिगंबर साबळे, सचिव अशोक खिराडे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## खरगेंची जीभ घसरली

पंतप्रधान हे लोकशाही मार्गाने निवडून आलेले देशाचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे या पदाच्या घटनात्मक मर्यादेचा आणि अधिकारांचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. संविधानानुसार हे पद देशाच्या राजकारणात आणि प्रशासनात अत्यंत महत्वाचे मानले जाते. त्यामुळे या पदाचा सन्मान राखणे हे देशवासीयांचे कर्तव्य आहे. लोकशाहीत धोरणांवर किंवा निर्णयांवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला असतो. पण ती टीका राजकीय किंवा वैयक्तिक अपमानास्पद पातळीवर न नेता मुद्द्यांवर असायला हवी. हेच भान विसरत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काढलेले अनुद्गार शरमेने मान खाली जावी असेच आहेत. बिहारमधील पाटणा येथे कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेतून जाणार नाहीत, असे एका उपस्थिताने सुनावल्यावर खरगे यांनी 'मोदी का बाप भी जाएगा' असे उत्तर दिले. खरगे यांच्या या वक्तव्याबद्दल देशभरात संतापाची लाट उसळली असून त्याचा सर्व थरातून निषेध व्यक्त केला जात आहे. या प्रकारातून केवळ खरगे यांनी आपलीच संस्कृती दाखवली असे नाही तर काँग्रेसचीही पातळी दिसून आली आणि ती समस्त देशवासीयांच्या टीकेची धनी झाली आहे. सरकारच्या कामाचा हिशेब मागायला निघालेली चर्चा नेत्यांच्या कुटुंबापर्यंत का पोहोचते? एका कार्यकर्त्याच्या प्रतिक्रियेने रोजगार, महागाई आणि मतदानाच्या हक्काची चर्चा मागे पडावी, इतकी राजकीय भाषा स्वस्त झाली आहे काय? राजकारणाची भाषा अशी तिखट, तिरसट आणि तुच्छतावादी का होत चालली आहे आणि तेही जगातील बलाढ्य लोकशाही असलेल्या देशाच्या पंतप्रधानांबाबत? या सगळ्यात आपण ज्या कार्यकर्त्याच्या प्रतिक्रियेवरून हे बोललो तो भाजपचा नव्हे तर आपल्याच काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता आहे, याचाही विसर खरगे यांना पडला. पाटण्यातील या वादाने महाराष्ट्रासमोरही प्रश्न उपस्थित केला आहे. कारण हे केवळ खरगे यांचेच एकमेव उदाहरण नाही तर महाराष्ट्राच्या राजकारणातही सध्या विरोधी पक्षांच्या नेत्यांची अशीच घसरण पहावयास मिळत आहे आणि महाराष्ट्रातील विरोधकांचे राजकारण कसे दिवसेंदिवस खालावत चालले आहे याची प्रचिती येते. काही महिन्यांपूर्वी उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी संभाव्य बंडखोर खासदारांविषयी शिवीगाळ केली होती. इतक्यावरच ते थांबले नाहीत नंतर ती महाराष्ट्रातील नेहमीची भाषा असल्याचे समर्थन केले. पक्षफुटीच्या शक्यतेवर त्यांना संताप असू शकतो; पण स्वतःच्या शिवीगाळीला महाराष्ट्राची भाषिक परंपरा म्हणणे, हा त्या परंपरेवर अन्याय आहे. त्यानंतर मुंबईत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांविषयी काँग्रेसने वापरलेल्या 'गूंगी गुड़िया' शब्दप्रयोगाचे समर्थन केले. बीडमधील कायदा सुव्यवस्थेविषयी पत्रकाराच्या प्रश्नाला पवारांनी उत्तर न दिल्याचा प्रसंग त्या टीकेमागे होता. ही टीका राजकीय असून व्यक्तिगत नसल्याचा सपकाळांचा बचाव होता. त्या मौनाचा जाब जरूर विचारा; पण त्यासाठी एका स्त्री नेत्याला बाहुली ठरवण्याची गरज काय? पाटणा येथे काढलेले उद्गार जरी खरगे यांच्या तोंडून निघाले असले तरी त्यांचे बोलविते धनी कोण आहेत हे उघड आहे. राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्या धोरणानुसार आणि त्यांची खुशामतगिरी करण्यासाठी खरगे यांनी हे वक्तव्य केले असावे, हे सांगण्यासाठी राजकीय तत्ववेत्याची गरज नाही. आणि हे सारे कशामुळे घडत असावे हेही स्पष्ट आहे. वर्षानुवर्षे निरंकुश सत्ता भोगण्याची सवय लागलेल्या कॉंग्रेस नेतृत्वाला सध्या नैराश्याने पछाडले आहे. सत्तेशिवाय राहणे म्हणजे पाण्यातून बाहेर काढलेल्या माशासारखी त्यांची अवस्था झाली आहे आणि त्यातूनच असे प्रकार घडत आहेत. वास्तविक सत्ता असतानाच्या काळात घेतलेल्या चुकीच्या निर्णयाचा कॉंग्रेस नेत्यांना पश्चाताप व्हायला हवा. पण तितकेही शहाणपण त्यांच्याकडे नाही. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या झंजावाती नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार ज्या वेगाने घोडदौड करत आहे ते पाहता पुढचे कैक दशके कॉंग्रेस सत्तेत येऊ शकत नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. याच सगळ्यातून आलेली हतबद्धता असे वादग्रस्त वक्तव्य करण्यास भाग पाडते आहे. नेत्याची भाषा ही त्याच्या स्वभावाची खाजगी बाब नसते. कार्यकर्त्यांना विरोधकांशी कसे वागावे, याची शिकवण त्यातून मिळते; समाजाला त्याच्या विचारांच्या गुणवत्तेचा अंदाज येतो. असहमत व्यक्तीचे म्हणणे ऐकून त्याला उत्तर देण्यासाठी संयम आणि आत्मविश्वास लागतो. शब्द निवडताना दाखवलेली शिस्त ही नेतृत्वाच्या राजकीय संस्कृतीची जाहीर ओळख असते. राजकारण्यांची भाषा केवळ संवादाचे साधन नसते तर ते प्रभाव पाडण्याचे, मत प्रभावित करण्याचे एक प्रभावी हत्यार असते. समर्थकांच्या टाळ्या मिळाल्या तरी कुठे थांबायचे, हे ज्याला कळत नाही, त्याच्या राजकीय परिपक्वतेवर प्रश्न उभे राहणे साहजिक आहे, पाटण्यातील वाद असो किंवा महाराष्ट्रातील शाब्दिक चकमकी; कसोटी एकच आहे. मतदाराला शेवटी आपल्या आयुष्यात काय बदलले आणि पुढे काय बदलणार, याचे उत्तर हवे असते. सरकारने कामगिरीचा हिशेब द्यावा; विरोधकांनी त्या हिशेबातील त्रुटी पुराव्यांसह दाखवाव्यात. लोकशाहीची हीच तर गंमत आणि शक्ती आहे. राजकारणाची खरी ताकद दुसऱ्याला किती खाली ओढले यात नसते. जनतेसमोर आपले विचार मांडताना किती ताठ उभे राहता येते, यात ती असते. अशाच चुका कॉंग्रेसला येत्या निवडणुकांमध्ये महागात पडणार आहेत. अशा बेताल वक्तव्यांना कसे उत्तर द्यायचे याचा निर्णय जनताच घेणार आहे.

# दुष्काळात स्थलांतरित दुर्लक्षितच

**महाराष्ट्राच्या दुष्काळ निवारण धोरणात स्थलांतरित कामगार दुर्लक्षित राहिला आहे. दुष्काळ निवारणाची व्याप्ती केवळ गावात राहिलेल्या नागरिकांपुरती मर्यादित न राहता, रोजगाराच्या शोधात स्थलांतर केलेल्या कामगार कुटुंबांपर्यंतही पोहोचली पाहिजे.**



महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट गडद होत असताना राज्याच्या दुष्काळ निवारण धोरणात एका महत्वाच्या, परंतु अनेकदा दुक्षित राहणाऱ्या समुदायाचा विचार होणे आवश्यक आहे. तो म्हणजे हंगामीयतांतरित कामगार आणि त्यांची कुटुंबे राज्यातील अनेक ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शेतीतील अनिश्चितता, अपुरा स्थानिक रोजगार आणि कर्जबाजारीपणा यामुळे अनेक कुटुंबांना उपजीविकेसाठी गाव सोडावे लागते. मात्र, गाव सोडल्यानंतरही या कामगारांची फरफर संपत नाही. वीटभट्टधा, ऊसतोड आणि बांधकाम क्षेत्रांत रोजगार मिळत असला, तरी अनेक कामगारांना शोषणकारी कामाची ड परिस्थिती, असुरक्षित रोजगार आणि सामाजिक सुरक्षेच्या जागने शोषणावर आधारित हंगामी स्थलांतराची ही व्यावर्षानुवर्षे काय असून, अनेक ग्रामीण आणि आदिवाली ती जगण्याची अपरिहार्यता बनाकेळीच लक्ष दिले नाही, तर आधी आणिजिकदृष्ट्य असुरक्षित असलेल्या कामगाराच्या अहवणी अधिक तीव्र होऊन त्यांच्या कुटुंबांची असुरक्षितता वाढू शकते.

**प्रमुख उपाययोजना**

-राज्यातील हंगामी स्थलांतरितांची संख्या आणि त्यांची बहुआयामी असुरक्षितता लक्षात घेता, राज्याच्या दुष्काळ निवारणात त्यांचा स्वतंत्र लक्षित समूह म्हणूत समावेश करावा दुष्काळाचे आकलन आणि मदतीचे नियोजन प्रामुख्याने मूळ गावातील लोकसंख्येवर आधारित असल्याने स्थलांतरित किया व्यांतराच्या बरठ्यावर असलेल्या कुटुंबांच्या गरजा दुर्लक्षित राहत आहेत. त्यामुळे कामाविका असुरक्षा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक संरक्षणासाठी विशेष तरतुदी कराव्यात, स्थलांतरित कुटुंबे गावाबाहेर आहेत म्हणून मदतीपासून वंचित राहू नयेत.

-राज्यात हंगामी स्थलांतरित कामगारांची संख्या स्थलांतराचे व्यख्य आणि त्यांच्या गरजांविषयी विश्वसनीय आकडेवारीचा अभाव आहे. परिणामी, धोरणात्मक नियोजनात त्यांचे प्रश्न अन्य राहतात दुष्काळप्रवण जिल्लामध्ये ग्रामपंचायत स्तरावर संभाव्य मालांतरित कुटुंबांचे सर्वेक्षण करून स्थलांतराचा कालावधी आणि मुलांची संख्या नोंदवावी, व्यतिरितांची मोजणी आणि नोंदणी ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया न राहता, त्यांच्यापर्यंत मदत व सामाजिक सुरक्षा पोहोचविण्याचा आधार काली पाहिजे.

-दुष्काळग्रस्त गावांमध्ये रोजगार हमीची कामे वेळेत सुरु करून मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून द्यावा. जलसंधारण, मृदसंधारण आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य द्यावे, जेणेकरून सक्तीचे आणि तणावपूर्ण स्थलांतर कमी होण्यास मदत होईल. नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 'मुळवाट स्थलांतर नियंत्रण कक्षा'सारख्या उपक्रमांचा विस्तार इतर जिल्ह्यांतही करावा. मात्र, उद्दिष्ट केवळ स्थलांतर रोखणे नसून, उपजीविकेअभावी होणारे सक्तीचे स्थलांतर कमी करणे आणि इच्छेनुसार सुरक्षितपणे स्थलांतर करण्याचा पर्याय अबाधित ठेवणे हे असावे.

-'एक देश, एक शिधापत्रिका' योजनेअंतर्गत स्थलांतरित कुटुंबांना कामाच्या ठिकाणी रेशन मिळत असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर आरोग्य, पोषण, शिक्षण आणि कामगार कल्याणाच्या योजनांचा लाभही स्थलांतरितांना गंतव्यस्थळी मिळण्यासाठी पोर्टेबिलिटी सुनिश्चित करावी. कल्याणकारी योजनांचा लाभ हा कामगारांच्या स्थलांतरामुळे खंडित होता कामा नये.

-वीटभट्ट्या, ऊसतोडीची ठिकाणे आणि बांधकाम क्षेत्रांत कुटुंबांसोबत स्थलांतर करणारी मुले शिक्षण, पोषण आणि बालसंरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत असुरक्षित असतात. गंतव्यस्थळी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देतानाच मूळ गाव आणि गंतव्यस्थळांवरील शाळांमध्ये समन्वय निर्माण करावा लागेल. प्रत्येक मुलाला 'शिक्षण हमी कार्ड' मिळाले असून त्याच्या शैक्षणिक प्रगतीची नोंद ठेवली जाते, याची खात्री करावी. गंतव्यस्थळी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने शिक्षण सहाय्यता केंद्रे सुरू करणे, जिल्हा परिषद किंवा अनुदानित शाळांमध्ये मुलांचे समावेशन करणे आणि उपचारात्मक अध्यापनाची व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे.

-स्थलांतरित गर्भवती महिला, स्तनदा माता, महिला कामगार आणि बालकांना आरोग्य, पोषण व बालकल्याण सेवा मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२१-२२ मध्ये विकसित केलेली 'महा-एमटीएस' प्रणाली राज्यभर प्रभावीपणे कार्यान्वित करावी. मात्र, ही प्रणाली केवळ नोंदणीपुरती मर्यादित न ठेवता स्थलांतरित कुटुंबांना प्रत्यक्ष नवांशी जोडणे आणि लाभ मिळाल्याची खात्री करणे नावश्यक आहे. स्त्रोत व गंतव्य जिल्ह्यांतील यंत्रणांमध्ये माहितीचे सुरक्षित आदानप्रदान करून आरोग्य, पोषण आणि बालसंरक्षण सेवांची सातत्यपूर्ण उपलब्धता सुनिश्चित करावी. स्थलांतरामुळे महिला आणि बालकांच्या आरोग्य व पोषण सेवांमध्ये खंड पडू नये, यासाठी महा-एमटीएसला विभागीय समन्वय आणि सेवा वितरणाची प्रभावी यंत्रणा बनवावे.

-स्थलांतरित कामगारांच्या मूळ गावातील आणि ते कामासाठी जात असलेल्या जिल्ह्यांतील प्रशासनादरम्यान प्रभावी समन्वय यंत्रणा उभारावी. राज्यांतर्गत स्थलांतरासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून संपर्क अधिकारी नेमून माहितीची नियमित देवाणघेवाण आणि तक्रार निवारणाची व्यवस्था विकसित करावी. यामुळे रोजगार, रेशन, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेशी संबंधित प्रश्नांवर वेळेत कार्यवाही करता येईल. आंतरराज्यीय स्थलांतरासाठीही संबंधित राज्यांमध्ये समन्वय यंत्रणा विकसित करावी.

-प्रत्येक दुष्काळप्रवण आणि स्थलांतरित कामगारांच्या गंतव्य जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्थलांतरविषयक टास्क फोर्स स्थापन करावे. यामध्ये कामगार, ग्रामविकास, रोजगार हमी, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालविकास, आरोग्य, शिक्षण आणि आदिवासी विकास विभागांचा समावेश असावा.

दुष्काळ निवारणाची व्याप्ती केवळ गावात राहिलेल्या नागरिकांपुरती मर्यादित न राहता, रोजगाराच्या शोधात स्थलांतर केलेल्या कामगार कुटुंबांपर्यंतही पोहोचली पाहिजे. स्थानिक रोजगार हमीबरोबरच आणि आपल्या स्थलांतरित कामगारांची सामाजिक आणि इतर सुरक्षेला दुष्काळ निवारण धोरणात स्थान देऊन, कोणतेही कामगार कुटुंब शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत.

**डॉ. कुलदीप सिंग राजपूत**
मो. ९८५०४७३७२७

# प्रकाश आंबेडकर यांचे शेतकऱ्यांप्रती वादग्रस्त विधान... जरा चुकलंच!

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शेतकऱ्यांना 'नालायक' म्हटल्याची चर्चा आहे. मनातून आलेल्या रागाच्या त्वेषातून जरी ते बोलले असले, तरी असे विधान चुकीचे आणि शेतकऱ्यांच्या मनावर घाव करणारे आहे. देशाचे आर्थिक धोरण आजही बहुतांश अशिक्षित शेतकऱ्यांना समजलेले नाही. त्यामुळे तो भरकटत राहिला. निरर्थक प्रतिनिधींना तो आमदार-खासदार म्हणून सभागृहात निवडून पाठवतो आणि नंतर हात चोळत बसतो. कारण राजकारण जाती-धर्मातून चालले असल्यामुळे सर्व समाज आर्थिक धोरणावर एकत्र येत नाही. आणि हा समाज एकत्र येऊ नये, म्हणूनच पुढारी शेतकऱ्यांच्या नावावर एकत्र बसत नाहीत. 'सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण' हीच खरी नेत्यांची गोम आहे.

सर्व जातीच्या नेत्यांनी कोणते दिवे लावले? जर दिवे लावले असते, तर आज शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ का आली असती? हे निरर्थक राजकारणी सरकारच्या तिजोरीवर बसलेले नागोबा आहेत. ही सर्व जातीव्यवस्थेवर भटकलेली राजकारणी मंडळीच याला जबाबदार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक धोरण, महात्मा फुले यांची शेतकऱ्यांप्रती मांडणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची 'शेतकऱ्यांच्या पिकाच्या देठाला हात लागणार नाही' ही भूमिका नेते फक्त स्टेजवर बोलतात, कृतीतून मात्र शून्य आहे. कारण शेतकरी सुखी होऊ द्यायचा नाही, हेच या पुढाऱ्यांना करायचे आहे. जर शेतकऱ्यांच्या दुरवस्थेवर स्टेजवरून घणाघाती हल्ला करतात, तर मग ती व्यवस्था दुरुस्त करण्यासाठी सर्व शेतकरी नेते एकत्र का येत नाहीत? हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे.



**शेतकरी संघटनेचा वारसा आणि आजची दिशा**

शेतकऱ्यांची कहाणी गेल्या ३० वर्षांपासून शरद जोशी यांच्या विचारधारेने १९८० ते २०१० पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात क्रांती घडवली होती. या व्यवस्थेला केंद्र आणि राज्य सरकारचे धोरण जबाबदार आहे, हे प्रत्येक वेळी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले आहे शेतकऱ्यांना जी मदत केली जाते, ती तुटपुंजी असते. निवडून येण्याच्या आणि राजकारण चालवण्याच्या उद्देशाने ती केवळ दिशाभूल करणारी असते, ती शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाची नसते. शेतकरी कायमस्वरूपी दुरुस्त झाला पाहिजे, अशी ती व्यवस्थाच नसते. गेल्या अनेक वर्षांपासून कीर्तनकार, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, शेतकरी नेते, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे गुरुदेव प्रेमी सेवक, कवी-लेखक यांनी ग्रामीण व्यवस्थेची भूमिका कित्येकदा मांडली आहे. स्टेजवर शेतकऱ्यांचे दुःख मांडतात आणि निवडणुकीत मात्र ज्या व्यवस्थेमुळे शेतकरी आत्महत्या करतो, त्याच व्यवस्थेला मतदान करतात.

यासाठी कमीत कमी शेतकरी विचारवंत, केंद्रातील आर्थिक धोरण समजणारे शेतकरीनिष्ठ कार्यकर्ते जर ३०-४० आमदार म्हणून सभागृहात आणि १०-२० खासदार केंद्रात गेले असते, तर काहीतरी बदल घडला असता. त्याशिवाय हा बदल शक्य दिसत नाही. शेतकऱ्यांसाठीचे आयात-निर्यातीचे धोरण आणि शेतकरी विरोधी कायदे कधीही दुरुस्त होणार नाहीत.

**शेतकरी क्रांतीचे उमेदवार हवेत**

यासाठी शेतकरी क्रांतीचे उमेदवारच आमदार-खासदार म्हणून सभागृहात पाठवणे गरजेचे आहे. शेतकरी हा निवडणुकीत आर्थिक लालसेपायी लगेच दिशाभूल होतो. कारण तो तुटपुंज्या व्यवस्थेत जगत आहे. चालू वर्षी तर तो दुष्काळाशी सामना करत प्रपंच भागवत आहे. अशा वेळी प्रकाश आंबेडकर साहेबांनी शेतकऱ्यांना 'नालायक' म्हणणे चुकीचे आहे. शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी ही भूमिका कित्येकदा समजून सांगूनही, न ऐकलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी कधीच 'नालायक' म्हटले नाही. शेतकरी चुकीची भूमिका घेत आहे, एवढेच ते बोलले.

आजही शेतकरी नेत्याच्याच मागे फिरत असतो. त्याला हे कळत नाही की, जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयावर मोर्चे नेऊन हे शेतकरी विरोधी कायदे दुरुस्त होणार आहेत का? असे मोर्चे म्हणजे त्या आमदार-खासदाराच्या दुकानात किती माल आहे हे दाखवणे आहे. मी किती बहुसंख्य जनतेचा लीडर आहे, ही फक्त त्या नेत्यांची प्रसिद्धी असते. शेतकरी आजही या बावळट विचारातून दुरुस्त झालेला नाही.या देशातील आर्थिक धोरण समजून घेणारे प्रत्येक खेड्यात, गावात किती शेतकरी नेते आणि कार्यकर्ते आहेत? ही संख्या अतिशय कमी आहे, म्हणून ही अर्थव्यवस्था बदलणे कठीण जात आहे. शेतकऱ्यांची चूक एवढीच आहे की, त्यांनी शेतकरी संघटनेचे उमेदवार बहुसंख्येने निवडून सभागृहात पाठवले नाहीत. फक्त एक-दोन नेते पाठवून हे जमणार नाही, कारण ते एक-दोन नेते कुठेतरी सेटल होतात, त्यांचा सभागृहात एकत्र गट तयार होत नाही. हीच त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक आहे.

१९८०-९० च्या दशकात जेव्हा शेतकरी आंदोलन पेटले होते, तेव्हाच जाती-धर्माचे नेतेही त्यावर तुटून पडले होते. सामान्य माणसाला जात-धर्म जवळचा वाटला आणि आर्थिक धोरण समजून घेण्याची गरज वाटली नाही. त्यांनी फक्त देवदर्शन केले. कारण समाजाला शेतकरी धोरणापेक्षा आपली जात महत्त्वाची वाटली. त्याचेच परिणाम शेतकरी आजही भोगत आहे. पुढेही असेच चालले तर त्यांची पुढील पिढीही बळी पडणार आहे. कारण नवीन तरुणांना शेतीमालाला भाव मिळत नसल्यामुळे शेतीत जगण्याची आशा दिसत नाही. म्हणून शहरात बेरोजगारी वाढली आहे आणि या बेरोजगारांचाही राजकारणात वापर केला जातो.

**आरपीआय आणि शेतकरी संघटना एकत्र का आल्या नाहीत?**

कोणताही नेता एखाद्या वेळी त्वेषाने बोलला, म्हणजे जनतेला त्या गोष्टीचा विचार करायला भाग पाडते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा ही शेतकरी संघटनेच्या लोकांनी खऱ्या अर्थाने समाजात रुजवली आहे, कारण ते आर्थिक धोरण डॉ. बाबासाहेबांच्या विचारधारेशी सुसंगत होते. मग निवडणुका येतात तेव्हा आरपीआयचे सर्व नेते आणि शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी एकत्र येऊन या आमदार-खासदारकीच्या निवडणुका का लढवल्या नाहीत? आर्थिक धोरणाचे आमदार-खासदार का तयार केले नाहीत?हेच शेतकऱ्यांचे दुर्भाग्य आहे. जाती-धर्माचे राजकारण करणारे अनेक नेते याला जबाबदार आहेत. प्रकाश आंबेडकर सुद्धा याला जबाबदार आहेत.

जर त्यांनीच त्याकाळी शेतकरी संघटना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (म्हणजेच शेतकरी-शेतमजूर ही आर्थिक धोरणाची लढाई म्हणून) एकत्र भूमिका घेतली असती, तर या देशात निश्चितच निवडणुकीतून बदल झाला असता. कारण जेव्हा शेतीतील पिकातून दोन पैसे शेतकऱ्याजवळ वाचतील, तेव्हाच तो पैसा मजुरापर्यंत जाईल. मजुरांनाही त्या पैशाचा फायदा झाला असता. आर्थिक धोरणाच्या विचारधारेतून जर एकत्र निवडणुका लढवल्या असत्या, तर शेतकऱ्यांना 'नालायक' म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आज आली नसती, एवढे मात्र खरे.

**- धनंजय पाटील काकडे**
मो. ९८९०३६८०५८

## नवीन भुसावळ-नागपूर आंतरशहरी रेल्वेची मागणी

संवाद

कोविड-१९ महामारीच्या काळात बंद करण्यात आलेली नागपूर-भुसावळ-नागपूर प्रवासी रेल्वे अद्याप सुरू झालेली नाही, ज्यामुळे हजारो प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. जर रेल्वे सध्याची प्रवासी रेल्वे पुन्हा सुरू करू शकत नसेल, तर तिच्या जागी एक नवीन आंतरशहरी एक्सप्रेस सुरू केली पाहिजे.ही रेल्वे विदर्भ आणि खानदेशची जीवनरेखा आहे. अकोला, वर्धा, बडनेरा, शेगाव, मलकापूर आणि जळगाव येथील विद्यार्थी, कर्मचारी, व्यावसायिक आणि मजूर दररोज या मार्गावरून प्रवास करतात. प्रवासी रेल्वे बंद असल्याने त्यांना महागड्या बस आणि एक्सप्रेस गाड्यांवर अवलंबून राहावे लागत आहे.नागपूर ते भुसावळ सकाळी ६ वाजता आणि भुसावळ ते नागपूर सायंकाळी ४:३० वाजता जनरल आणि चेअर कारसह आंतरशहरी रेल्वे चालवण्याचा प्रस्ताव आहे. रेल्वे वंदे भारतसारख्या प्रीमियम गाड्या चालवते, परंतु सामान्य प्रवाशासाठी एक परवडणारी दैनंदिन रेल्वे देखील आवश्यक आहे. प्रशासनाला यावर तात्काळ निर्णय घेण्याची विनंती आहे.

**राजेश पी,कारिया**
**राधे नगर,अकोला (महा)**

## १०० टक्के इथेनॉल इंधन, निर्णय अत्यंत स्वागतार्ह!

केंद्र सरकारने केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मध्ये सुधारणा करून ई१०० (१०० टक्के इथेनॉल) इंधनाला नियामक मान्यता देण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे विविध प्रमाणात इथेनॉल आणि पेट्रोल वापरू शकणाऱ्या 'फ्लेक्स-फ्युएल' इंजिन वाहनांच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला असून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी तो महत्त्वाचा ठरणार आहे. आज आपला देश कच्च्या तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करतो. ई१०० इंधनाच्या वापरामुळे ही आयात लक्षणीयरीत्या कमी होऊन देशाची मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथेनॉल हे प्रामुख्याने ऊस आणि धान्य अशा शेती उत्पादनांपासून बनवले जात असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल आणि शेतकऱ्यांना हक्काचे पैसे मिळतील. पारंपारिक इंधनाच्या तुलनेत इथेनॉलमुळे वायुप्रदूषण खूप कमी होत असल्याने शहरांमधील हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. आज जगातील ६० पेक्षा जास्त देशांमध्ये इथेनॉलचा वापर वाहतुकीचे इंधन म्हणून केला जात असून अनेक देशांनी पेट्रोलमध्ये ठराविक प्रमाणात इथेनॉल मिसळणे कायदेशीररित्या बंधनकारक केले आहे.

**प्रदीप मोरे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# अखेर पाचव्या दिवशी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश!

## नऊ मागण्या मान्य एका मागणीवर निर्णयासाठी बँकेची दोन दिवसांची मुदत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २७ :** शेतकऱ्यांच्या कर्जप्रश्नांवरून आणि बँकेच्या कथित अनियमित कारभाराविरोधात सुरू असलेल्या 'अर्ज द्या, कर्ज घ्या' आंदोलनापुढे अखेर पाचव्या दिवशी बँक प्रशासनाला चर्चेसाठी यावे लागले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या वतीने फुलसावंगी येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेसमोर सुरू असलेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांच्या नऊ मागण्या मान्य करण्यात आल्या, तर एका मागणीवर निर्णय घेण्यासाठी बँक प्रशासनाने दोन दिवसांची मुदत मागितली.

मात्र, कथित अनियमिततेच्या चौकशीतून दोषींवर प्रत्यक्ष कारवाई कधी होणार, हा प्रश्न कायम आहे. कॉ.अँड. डी. बी. नाईक यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या



आंदोलनस्थळी सोमवारी सायंकाळी सहा वाजता अमरावती विभागाचे रिजनल मॅनेजर विनय वैस, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे, शाखा व्यवस्थापक मोहन पांडे आणि कृषी वित्त अधिकारी भूषण पाटील यांनी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. कर्जाचे ६७ हजारांवरून ९२ हजार रुपये कसे?असा सवाल उपस्थित होत असताना यावेळी एका शेतकऱ्याच्या ६७ हजार रुपयांच्या कर्जाचे पुनर्गठन करून ते ९२ हजार रुपये करण्यात आल्याचा मुद्दा चर्चेत आला. वाढीव २५ हजार रुपये शेतकऱ्याच्या खात्यातून परस्पर काढल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन रिजनल मॅनेजर विनय वैस यांनी दिले. दगडथर येथील निलेश विजय जाधव यांचा २० मार्च २०२४ रोजी मृत्यू झाला होता. मात्र, त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन १२ ऑक्टोबर २०२४ रोजी झाल्याचे आंदोलकांनी निदर्शनास आणले. मृत्यूनंतर कर्ज पुनर्गठन कसे झाले, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

### कोरे धनादेश परत, आता कारवाईकडे लक्ष

**पीककर्जासाठी शेतकऱ्यांकडून प्रत्येकी पाच कोरे धनादेश घेतल्याचा मुद्दाही उपस्थित झाला. हे धनादेश सोमवारी संबंधित शेतकऱ्यांना परत करण्यात आले. कर्जप्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक किंवा प्रशासकीय अडवणूक होऊ नये, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनामुळे मागण्यांवर चर्चा होऊन काही निर्णय झाले असले, तरी केवळ आश्वासनांवर प्रश्न सुटणार नाहीत. चौकशीचा निष्कर्ष, दोषींवरील कारवाई आणि शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची ठोस कार्यवाही याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी देविदास मोहकर, दीपक राव देशमुख, बापूराव जाधव, रामू मोरे, धरणीधर डांगे, पुष्पाबाई मोरे, सुंदराबाई कुरकुटे, समीर खान, शोभाबाई पवार, मंगलाबाई जाधव, दत्ता कोरेवाड, नारायण रणमले, पुरासिंग राठोड, दत्ता राठोड यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.**

# विहिरीत उडी घेऊन ४७ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या

## घरचा करता पुरुष गेल्याने गावात हळहळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २७ :** फुलसावंगी परिसरातून एक अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. शेतात दैनंदिन काम आटोपल्यानंतर एका ४७ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

जगजीवन भीकाजी डोंगरे वय ४७ वर्षे, रा. फुलसावंगी असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या अचानक घडलेल्या दुर्घटनेमुळे परिसरात व गावात हळहळ व्यक्त होत आहे. जगजीवन डोंगरे हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात दैनंदिन कामासाठी गेले होते. शेतातील काम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपल्या एकुलत्या एका मुलाला गुराढोरांना चारा



टाकण्यासाठी पलीकडे पाठवले. मुलगा निघून गेल्यानंतर त्यांनी स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन जीवन संपवले. या टोकाच्या निर्णयामागचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, त्याबाबत पोलीस तपास करत आहेत. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तातडीने धाव घेत विहिरीतून मृतदेह बाहेर काढला. व घटनास्थळा वर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मृत जगजीवन डोंगरे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. कुटुंबाचा एकमेव करता पुरुष व आधार अचानक अशा प्रकारे निघून गेल्यामुळे पत्नी व चिमुकल्या मुलांचा हंबरडा फोडून सुरू असलेला रोष आणि विदारक परिस्थिती पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले. या प्रकरणी मयताचे नातेवाईक दीपकराव रामजी नजरधने वय ५० वर्षे, रा. महागाव यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी नोंद केली आहे. सदर घटनेचा पुढील तपास महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस शिपाई कैलास मुखाडे करीत आहेत.

## थोडक्यात

### बंजारा मौखिक साहित्यावरील संशोधनासाठी एकनाथ राठोड यांना पीएच.डी.

**डॉक्टरेट,संत सेवालाल महाराज व सामकी मातेच्या परंपरेचा अभ्यास**

**यवतमाळ :** बंजारा समाजाच्या मौखिक साहित्य, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण करणारे संशोधक एकनाथ चंद्रकला बळीराम राठोड यांना मुंबई विद्यापीठाने इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे. प्रा. डॉ. संतोष धर्मा राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन पूर्ण केले.



"Constructing the Hagiographies of Saint Sevalal Maharaj and Samki Mata Through Banjara Oral Literature: A Study" हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. २०२१ पासून त्यांनी पोहरागडसह विविध भागांत क्षेत्रीय अभ्यास करून ज्येष्ठ नागरिक, भजन गायक आणि महिलांच्या मुलाखती घेतल्या. लोकगीते, भजने आणि मौखिक कथांच्या संकलनातून संत सेवालाल महाराज व सामकी मातेच्या जीवनचरित्रातील सामाजिक मूल्ये आणि स्त्रीशक्तीचे योगदान अधोरेखित केले. अंतिम मौखिक परीक्षेत बाह्य परीक्षकांनी या संशोधनाचे कौतुक करून पुस्तक प्रकाशनाची अपेक्षा व्यक्त केली. या यशाबद्दल राठोड यांचे अभिनंदन होत आहे.



### किसना ज्वेलरीच्या शुभारंभाला सामाजिक उपक्रमांची जोड!

**स्वच्छता, वृक्षारोपण अन् रक्तदानातून सामाजिक बांधिलकी**

**यवतमाळ :** दागिन्यांच्या व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देत किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीच्या महाराष्ट्रातील १२ व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन २४ ऑक्टोबर रोजी यवतमाळातील केदारेश्वर महादेव मंदिर रोडवर झाले. हरि कृष्णा ग्रुपचे संस्थापक घनश्याम ढोलकिया यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शोरूमच्या शुभारंभाचे औचित्य साधून कंपनीने केवळ व्यावसायिक सोहळ्यापुरते मर्यादित न राहता गरजूंना अन्नवितरण, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिर असे सामाजिक उपक्रम राबविले. या उपक्रमांतून सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात आला.

महाराष्ट्र ही कंपनीसाठी महत्त्वाची बाजारपेठ असून, 'हर घर किसना' संकल्पनेतून अधिकाधिक ग्राहकांपर्यंत हिऱ्यांचे दागिने पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे घनश्याम ढोलकिया यांनी सांगितले.

यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग शाह, शोरूमचे भागीदार विजय बी. हेडा आणि कृष्णा हेडा उपस्थित होते. नव्या शोरूममध्ये सोन्या-हिऱ्यांच्या दागिन्यांची विविध श्रेणी उपलब्ध असून, उद्घाटनानिमित्त विशेष सवलतींची घोषणाही करण्यात आली.

# हिंदू समाजाच्या संघटनातून राष्ट्राच्या परमवैभवाचे ध्येय!

## वणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा १०१ वा विजयादशमी उत्सव उत्साहात.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** हिंदू समाजातील सज्जनशक्ती संघटित करून राष्ट्रनिर्मितीला बळ देणे, ही काळाची गरज आहे. शारीरिक सामर्थ्यासोबत चारित्र्य, संयम आणि बौद्धिक प्रगल्भतेची जोड मिळाल्यासच राष्ट्राला परमवैभवाप्रत नेता येईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहशारीरिक प्रमुख पंजाबराव अव्हाडे यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०१ व्या वर्षानिमित्त शनिवारी, २४ ऑक्टोबर रोजी वणीतील एसपीएम विद्यालयाच्या प्रांगणात विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून अव्हाडे बोलत होते. अध्यक्षस्थानी अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रतीक कावडे होते. व्यासपीठावर




तालुका संघचालक हरिहर भागवत आणि नगर संघचालक किरण बुजोने उपस्थित होते. 'राष्ट्रप्रथम' विचाराची रुजवण आवश्यक हिंदुत्व ही भारतीय जीवनपद्धतीची ओळख असून, सांस्कृतिक मूल्यांचे जतन आणि राष्ट्रनिष्ठेची भावना समाजाच्या प्रत्येक स्तरात रुजणे आवश्यक आहे, असे अव्हाडे यांनी सांगितले. शाखेच्या माध्यमातून व्यक्तिनिर्माणाचे कार्य सुरू असून, स्वयंसेवक हीच संघाची खरी ताकद आहे. पंचपरिवर्तनाची सुरुवात प्रत्येक स्वयंसेवकाच्या घरातून झाली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कावडे यांनी शरीराप्रमाणेच समाजाचे स्वास्थ्यही महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. समाजातील परस्पर सामंजस्य कमकुवत झाल्यास सामाजिक स्वास्थ्य बिघडते, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शस्त्रपूजन, युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके आणि सामूहिक कवायत झाली. स्वयंसेवक व नागरिकांच्या उपस्थितीत उत्सव उत्साहात पार पडला.

# दुष्काळाच्या संकटात गरजूंच्या मदतीसाठी ए यु स्मॉल फायनान्स बँकेचा पुढाकार!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २७ :** पुसद विधानसभा क्षेत्रात येत असलेल्या काळी दौ. येथे यवतमाळ जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर काळी दौलत खान येथे ए यू स्मॉल फायनान्स बँकेच्या वतीने अन्नदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. दुष्काळाच्या परिस्थितीत गोरगरीब, गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर विविध अडचणी निर्माण होत असताना सामाजिक बांधिलकी जपत ए यू स्मॉल फायनान्स बँकेने अन्नदान शिबिराच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना मदत केली.

अशा उपक्रमांमुळे संकटाच्या काळात गरजूंना दिलासा मिळण्यासोबतच समाजात



माणुसकी, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ होते. या अन्नदान शिबिराचा अनेक गरजू कुटुंबांना लाभ मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे एयू फायनान्स बँकेच्या कार्याचे ग्रामस्थांनी स्वागत केले. दुष्काळाच्या काळात विविध संस्था आणि सामाजिक घटकांनी पुढाकार घेऊन गरजू नागरिकांना मदत करावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. व यासामाजिक उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हंसराज मोरे होते. यावेळी गावाचे पोलीस पाटील प्रकाश दवणे, एयू फायनान्स बँकेच्या आर.एम. स्मिता दराडे, डी.एम. चंदू, मॅनेजर सुनील चव्हाण यांच्यासह बँकेचे कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रभाग क्रं.१५ राजविहार मधील नाल्याचे अवैध बांधकाम थांबवून कारवाईची मागणी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २७ :** नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रं. १५ मधील राज विहार लागून असलेल्या तसेच वासवी नगरकडे जाणाऱ्या रोड लगत संजय नगर लेआउट मधील नैसर्गिक असलेल्या मोठ्या नाल्याचे जेसिबीव्दारे होत असलेले खोलीकरण व विनापरवाना अवैध बांधकाम थांबवून तात्काळ संबंधित प्लॉट धारक व ठेकेदार यांचेविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत रिपाइं आठवले पक्षाच्या वतीने मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

पुढे निवेदनात म्हटले आहे की प्रभाग क्रमांक १५ मधील राजविहार ले-आउट तसेच वासवीनगर रोड लगत असलेल्या संजय नगर लेआउट मधील उत्तरेकडून पूर्वेकडे मध्यभागातून वाहणाऱ्या नैसर्गिकरीत्या असलेल्या मोठ्या नाल्याचे जेसीबीद्वारे खोलीकरण करून तसेच कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी न



घेता संबंधित खाजगी बांधकाम धारक व ठेकेदार हे करत आहेत. हा नाला ज्या परिसरातून गेल्या अनेक वर्षापासून वाहत असून त्या नाल्याचा नैसर्गिक मार्ग बदलून वेगळ्या पद्धतीने संबंधित नाल्याचे बांधकाम अवैधरीत्या विनापरवाना संबंधित ठेकेदार व बांधकाम धारकांकडून करण्यात येत आहे. या नैसर्गिक नाल्याला वळवून दुसऱ्या मार्गाने नाला बांधकाम होत असल्यामुळे खालील असलेले राजविहार, लक्ष्मीनारायण नगर, मंगलमूर्ती नगर, महावीर नगर,पवन नगर या नगरातील नागरिकांच्या घरात पावसाळ्यातील पाणी जाऊन अतोनात नुकसान होणार असल्याचे परिसरातील नागरिकाकडून ओरड सुरू आहे, त्यामुळे या नगरातील नाल्याचे सुरू असलेले विनापरवानगी अवैध बांधकाम तात्काळ थांबून सदर खाजगी लेआऊट धारक व ठेकेदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणात पुढील कोणत्या प्रकारे नगरपरिषद भूमिका घेतली याकडे नगरातील लोकांची लक्ष लागले आहे.

# विनोबा ॲपच्या 'पोस्ट ऑफ द मंथ' पुरस्काराने बोम्मावार व लक्षशेट्टीवार सन्मानित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २७ :** विनोबा ॲपच्या वतीने सप्टेंबर २०२६ महिन्यासाठी देण्यात येणाऱ्या 'पोस्ट ऑफ द मंथ' तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्काराने पांढरकवडा पंचायत समिती अंतर्गत कार्यरत पदवीधर शिक्षक पवन अशोक बोम्मावार आणि उपशिक्षिका अनुराधा लक्षशेट्टीवार यांना सन्मानित करण्यात आले.

पवन बोम्मावार हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वाढोणा बु. केंद्र धारणा येथे, तर अनुराधा लक्षशेट्टीवार या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कवठा केंद्र पाटणबोरी येथे कार्यरत आहेत. हा पुरस्कार गटविकास अधिकारी श्री. मुंडे, गटशिक्षणाधिकारी राजू मेश्राम, कक्ष अधिकारी श्री. वनकर आणि विनोबा शैक्षणिक




उपक्रमाचे तालुका समन्वयक वैभव जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विनोबा ॲपच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रम, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार दिला जातो. या सन्मानामुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळत असून, शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्यास प्रेरणा मिळत आहे. या यशाबद्दल पवन बोम्मावार आणि अनुराधा लक्षशेट्टीवार यांचे शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेतात आग लावणाऱ्याचा शोध घ्या!

## कोपरा जानकर च्या शेतकऱ्यांचे पोलिसांना निवेदन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २७ :** बाभूळगावपासून चार किलोमीटर अंतरावरील कोपरा जानकर येथील शेतात आग लावून कुटार व शेती साहित्य जाळल्याच्या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेतील अज्ञात आरोपीचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी बाभूळगाव पोलिसांकडे निवेदनाद्वारे केली आहे. गरज पडल्यास श्वानपथकाची मदत घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मागील आठवड्यात शेतकरी मोबीन अली कोपरेकर यांच्या शेतातील जनावरांचे कुटार आणि



शेती साहित्य अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याची घटना घडली. त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागलेल्या शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. भविष्यात अशा घटना आपल्या शेतातही घडू शकतात, या भीतीने शेतकरी जागून पिकांचे संरक्षण करीत आहेत. आधीच नापिकी, पावसाचा खंड आणि पिकांची खालावलेली स्थिती यामुळे शेतकरी संकटात आहेत. त्यातच या परिसरात वाघ व बिबट्याचा वावर असल्याने शेतात जाणेही धोकादायक बनले आहे. बेंबळा प्रकल्पाच्या भिंतीलगत शेती असल्याने वन्यप्राण्यांचा धोका अधिक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांनी निवेदन दिले. शेतात आग लावण्यामागील व्यक्तीचा शोध घेऊन पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करावा, अशी मागणी तेजराज मंगळे, प्रवीण वाईकर, सुरेंद्र कावलकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी संघाने पुढाकार घ्यावा!

## अन्नदात्याच्या आर्थिक संकटाकडे दुर्लक्ष नको – डॉ. विजयराव माने

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २७ :** शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असताना अन्न पिकविणारा अन्नदाता आर्थिक संकटांच्या विळख्यात अडकलेला आहे.

ही परिस्थिती बदलण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या संघटनात्मक सामर्थ्याचा उपयोग शेतकऱ्यांना स्वावलंबी, समृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी करावा, असे परखड आवाहन डॉ. विजयराव माने यांनी केले. विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गोसेवा गतिविधी विदर्भ प्रांताचे सहसंयोजक रमेश पुंडलिकराव मंडाळे



प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. शेतीसाठी तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक सुविधा उपलब्ध होत असतानाही शेतकऱ्यांना संकटांचा सामना करावा लागतो, ही चिंतेची बाब असल्याचे माने यांनी नमूद केले. शेतमालाला रास्त भाव मिळाल्यास शेतीची गुणवत्ता सुधारेल आणि समाजाला विषमुक्त अन्न मिळण्याचा मार्ग सुकर होईल. संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अन्नदात्याला मदतीचा हात देणे, हीच सणांची खरी सार्थकता असल्याचेही त्यांनी सांगितले. रमेश मंडाळे यांनी संघाची स्थापना, डॉ. हेडगेवार यांचे विचार, सामाजिक समरसता, शिस्त आणि राष्ट्रीय एकात्मतेवर मार्गदर्शन केले. जातिभेद दूर करून समाजात परस्परविश्वास निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिरुद्ध मुक्कावार यांनी केले. शहर संघचालक संजय फटाले यांच्यासह संघाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# वणीतील मटका जुगारावर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** शहरातील भाजी मंडी परिसरात सुरू असलेल्या मटका जुगारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.या कारवाईत सैय्यद जाफर उर्फ बबलू सैय्यद नन्नू आणि शेख फारुख शेख फरीद यांची झडती घेण्यात आली. त्यांच्याकडून मटका जुगारा शी संबंधित साहित्य आणि ३१ हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.भाजी मंडी परिसरात मटका जुगार सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती.या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी दोघांकडे मटका पट्टीचे साहित्य आणि रोख रक्कम आढळून आली. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक दत्ता पेंडकर,पोलीस उपनिरीक्षक धनराज हाके, किशोर आडे आणि सलीम शेख यांचा समावेश होता.

शहरातील अवैध जुगाराच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असून, भाजी मंडी परिसरातील या कारवाईमुळे अवैध मटका जुगाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### तलवारबाजी स्पर्धेत विराज गोलाईतची राज्यस्तरावर निवड

**अंजनगाव सुर्जी**-क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती तसेच अमरावती जिल्हा फेन्सिंग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत सीताबाई संगई कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी विराज संतोष गोलाईत, याची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विराजने विभागस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरावर खेळण्याचा मान मिळविला. त्याच्या या निवडीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाच्या उपलब्धीची भर पडली आहे. विराजला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक विशाल भेलांडे यांचे प्रशिक्षण तर शारीरिक शिक्षण शिक्षक हेमंत माकोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव अजय संगई व प्रसन्न संगई, ज्येष्ठ सदस्य मुकुंद संगई, अशोक संगई, अविनाश संगई, आशिष संगई, विनय संगई, अनुप संगई तसेच संस्थेच्या संचालक मंडळाने विराजचे अभिनंदन केले.



### रामनगर येथे आरोग्य तपासणी शिबीर

**चांदुर रेल्वे**- नारिशक्ती शारदा देवी उत्सव मंडळ रामनगर चांदूर रेल्वे येथे 'आपला दवाखाना' तील डॉक्टरच्या टिमने परीसरातील महिला व पुरुष आरोग्य शिबिरात तपासणी करण्यात केली. सदर आरोग्य शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांची रक्तदाब तपासणी, रक्तातील शर्करा (शुगर) तपासणी व सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळून आलेल्या आरोग्यविषयक समस्यांनुसार लाभार्थ्यांना आवश्यक औषधोपचार तसेच मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रुती मनोहर, डॉ. त्रिवेणी चांदणे, उमेर शेख व आकांक्षा नेपाहाडे यांनी उपस्थित राहून आरोग्य सेवा दिली.सदर आरोग्य शिबिरामध्ये एकूण १११ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. नागरिकांनी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आरोग्य सेवांचा लाभ घेतला.तसेच आवश्यकते नुसार औषधे व उपचार करून आरोग्य विषय मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी नारीशक्ती शारदा उत्सव मंडळ रामनगर येथे मंडळ च्या अध्यक्षा नगरसेविका कीर्ती इमले, उपाध्यक्ष नीता कडू, सचिव पद्माताई अर्जापुरे तसेच मंडळांच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या अघोले, पिंगळे, केणे, कुंभरे, अग्रवाल, पुतळे, कावलकर, जिचकार व मोठ्या संख्येने मंडळाच्या सदस्या उपस्थित होत्या.

### 'सुरक्षित अन्नधान्य उत्पादन' यावर व्याख्यान

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्यावतीने नैसर्गिक सूक्ष्मजीव व चयापचयाद्वारे सुरक्षित व निरोगी अन्ननिर्मिती या विषयावर तांत्रिक सत्र संपन्न झाले. विभागाचे माजी विद्यार्थी तथा फार्मलॅब येरंडा ग्रीसोल्यूशन्स, वाशीम चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.शाश्वत शेतीमध्ये जैविक विज्ञानाचा वापर या विषयावर डॉ. चव्हाण यांनी जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव आणि नैसर्गिक चयापचय घटक हे रासायनिक खते व कीटकनाशकांना सुरक्षित आणि पर्यावरणपुरक असा उत्तम पर्याय असून ग्रामीण महाराष्ट्रात ॲग्रो बायोटेक उद्योग उभारताना येणारी आव्हाने, सूक्ष्मजीव उत्पादनांची निर्मिती व प्रमाण वाढविणे, शासकीय नियमावलींची पूर्तता आणि जैविक उत्पादनांचे विपणन यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे डॉ. चव्हाण यांनी निरसन केले.

# मेळघाटातील दुर्गम भागात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करा

**मेळघाट/वार्ताहर**

येथील दुर्गम आणि आदिवासीबहुल भागांमध्ये आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे, ग्रामीण रुग्णालयांमधील सुविधांचा अभाव दूर करणे आणि आरोग्य यंत्रणेतील प्रशासकीय समस्यांचे निराकरण करणे, या मागण्यांना पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे मुंबई येथील अभियान संचालक संजय काटकर यांनी धारणी परिसराचा दौरा करून विविध आरोग्य संस्थांच्या कामकाजाची पाहणी केली. दौऱ्यादरम्यान त्यांनी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मेळघाटातील आरोग्य सेवांची सद्यस्थिती जाणून घेतली. आयुक्त संजय काटकर यांनी



नागरिकांच्या समस्यांवर आरोग्य आयुक्त संजय काटकर यांचे लक्ष

लवादा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तसेच उतावली येथील महात्मा गांधी ट्रायबल हॉस्पिटल (महान) येथे भेट देऊन पाहणी केली. या वेळी संबंधित आरोग्य संस्थांमधील सुविधा, आरोग्य सेवांचे कामकाज आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत माहिती घेण्यात आली.चूर्णी ग्रामीण रुग्णालयातील सुविधांचा अभाव आणि प्रशासकीय अनियमिततेबाबतचा मुद्दाही या दौऱ्याच्या निमित्ताने पुढे आला. चिखलदरा तालुक्यातील कोटमी येथील रहिवासी रवि बैठकर यांनी रुग्णालयात कार्यरत प्रशासकीय अनियमितता तसेच आरोग्य सेवांमधील कमतरतांकडे आयुक्तांचे लक्ष वेधले. यासंदर्भात त्यांनी निवेदन सादर करून संबंधित प्रकरणांची चौकशी करावी आणि आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी केली. या दौऱ्यादरम्यान १०२ रुग्णवाहिका चालकांनीही आपल्या विविध समस्या आयुक्तांसमोर मांडल्या. रुग्णवाहिकांच्या दुरुस्तीसाठी स्थानिक पातळीवर व्यवस्था करण्यात यावी, वाहनांच्या देखभालीतील अडचणी दूर कराव्यात आणि अतिरिक्त कामाच्या मोबदल्यात योग्य मानधन द्यावे, अशा मागण्या त्यांनी केल्या. युवा स्वाभिमान पार्टीचे धारणी तालुकाध्यक्ष राजकुमार मालवीय यांनी मेळघाटातील आरोग्यविषयक समस्या आयुक्त संजय काटकर यांच्या निदर्शनास आणून दिल्या. आरोग्य आयुक्तांच्या या दौऱ्यामुळे मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेशी संबंधित प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आले आहेत. संबंधित विभागाने गांभीर्याने विचार करून आवश्यक पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मतदार यादीतून नाव वगळण्याच्या मुद्द्यावर गावागावी जाणार काँग्रेस

## एसआयआरच्या विरोधात काढणार पदयात्रा, राष्ट्रीय निरीक्षक शाकीर सनदी यांची पत्रकार परिषदेत माहिती

**अमरावती/का.प्र.**

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणला घेऊन काँग्रेसने आता गाव- गावात जनजागृती अभियान राबविण्याची तयारी केली आहे. पक्ष जिल्ह्याच्या ग्रामीण भागात नुक्कड सभा आणि पदयात्रांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचणार आहे. अशी माहिती मालटेकडी परिसरातील काँग्रेस भवन मध्ये झालेल्या पत्रकार परिषद मध्ये पार्टीचे राष्ट्रीय निरीक्षक शाकीर सनदी यांनी दिली.



एसआयआर प्रक्रिये दरम्यान मोठ्या संख्येने मतदारांची नावे यादी तून वगळली जात आहेत. पक्ष या मुद्यावरून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत लोकांना मतदार यादीत आपले नाव तपासण्यासाठी आणि नाव वगळले गेल्यास निर्धारित प्रक्रियेनुसार आक्षेप नोंदवण्यासाठी जागरूक करणार आहे. मतदारांची नावे हटविण्याची मोहीम सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर होणाऱ्या चुकां मुळेही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आह,असेही शाकीर सनदी यांनी सांगितले.

सनदी यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर एखाद्या मतदाराचे नाव यादीतून वगळले गेले तर त्याला पुन्हा नाव नोंदवण्यासाठी आक्षेप आणि इतर निर्धारित प्रक्रियांमधून जावे लागते. त्यांनी निवडणूक आयोगाचे अध्यक्ष ज्ञानेश कुमार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे मतदार यादीतून वगळण्याच्या मुद्द्यावरही भाष्य केले.काँग्रेसचे प्रस्तावित अभियान केवळ एसआय आरच्या विरोधापुरते मर्यादित राहणार नाही.पक्ष पदाधिकाऱ्यांच्या मते, नुक्कड सभा आणि पदयात्रांद्वारे लोकांना मतदार यादीत आपले नाव तपासणे, तपशीलात त्रुटी असल्यास ती दुरुस्त करणे आणि नाव गायब आढळल्यास नियमानुसार आक्षेप नोंदवण्याची माहिती दिली जाणार आहे. पक्षाचे मत आहे की, मतदार यादीत नाव असणे हे मतदानाच्या अधिकाराचा वापर करण्या साठी आवश्यक आहे. त्यामुळे पुनरिक्षण प्रक्रिये दरम्यान नागरिकांनी सतर्क राहिले पाहिजे. काँग्रेस येत्या दिवसांत जिल्ह्यातील विविध गावांमध्ये हे अभियान पुढे नेणार आहे. पत्रकार परिषदेत खासदार बळवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, ॲड. दिलीप एडतकर यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## दर्यापूर तालुक्यात तीव्र चारा टंचाई

# चारा माफिया व कारखान्यांवर कठोर कारवाईची मागणी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्याच्या दर्यापूर तालुक्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळजन्य परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी आणि पशुपालक आपले मूक पशुधन वाचवण्यासाठी हतबल झाले असतानाच, दुसरीकडे जिल्ह्यातून होणारी चाऱ्याची अवैध वाहतूक आणि गहू कारखान्यांमध्ये होणारा चाऱ्याचा गैरवापर यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) प्रदीप वडतकर यांनी जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन देऊन तात्काळ कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



सध्या स्थानिक पातळीवर चाऱ्याचा तीव्र तुटवडा असताना, व्यापारी मोठ्या प्रमाणावर चारा खरेदी करून तो जिल्ह्याबाहेर नेत आहेत. विशेष म्हणजे, अत्यंत संतापजनक बाब म्हणजे हा मौल्यवान चारा गहू (ब्रिकेट्स/पेलेट्स) बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये सर्रास जाळण्यासाठी व प्रक्रियेसाठी वापरला जात आहे. मूक जनावरांच्या तोंडातील घास हिरावून कारखान्यांच्या नफ्यासाठी चाऱ्याचा होणारा हा दुरुपयोग थांबवण्यासाठी तात्काळ बंदी हुकूम जारी करावा. गहू कारखान्यांमध्ये साठा करून ठेवलेला संपूर्ण चारा प्रशासकीय यंत्रणेमार्फत ताबडतोब जप्त करण्यात यावा आणि तो दुष्काळग्रस्त भागातील भूक्युत जनावरांसाठी राखीव ठेवण्यात यावा.दुष्काळात आपले पशुधन जगवण्यासाठी शेतकरी व दूध उत्पादक स्वतःच्या वाहनांनी (ट्रॅक्टर, पिकअप इ.) कायदेशीररीत्या चारा आणत आहेत. मात्र, प्रशासकीय स्पष्टतेच्या अभावी रस्त२त या गाड्यांना अडवून नाहक त्रास दिला जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील दुग्धव्यवसाय धोक्यात आला असून, कायदेशीर चारा वाहतूक करणाऱ्या वाहनांना कोणतीही अडचण निर्माण करू नये, असे स्पष्ट निर्देश महसूल प्रशासनाला द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.प्रशासन या गंभीर समस्येची दखल घेऊन तातडीने काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील शेतकरी व पशुपालक बांधवांचे लक्ष लागले आहे.

### अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमास अटक

**बेलोरा/वार्ताहर**

पोलीस अधिक्षक सा, अमरावती ग्रामीण यांनी जिल्हयात ऑपरेशन कवच अंतर्गत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने ठाणेदार दिल्या होत्या. त्यानुसार २६ रोजी चांदुर बाजार हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, पशु वैध्यकिय दवाखाना जवळ चांदुर बाजार येथे छोटु नावाचा इसम अवैधरित्या गांजा बाळगुन विकी करीत आहे. त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता आरोपी अजगर शहा उर्फ छोटू मोहम्मद शहा, वय ४३, रा. ताज नगर चांदूर बाजार याच्या ताब्यातून २२० ग्राम गांजा कि



अं ३३०० रू व गांजा विक्रीचे ४६० रू असा एकुन ३७६०/- रू चा माल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतम कदम (भापोसे), अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड (मपोसे),माधव गरूड उपविभागीय पोलीस अधीकारी, पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांचे नेतृत्वात पोलीस सपोनी संजिव खंदारे अंमलदार रविंद्र बावणे, आशीष राउत, जितेश सावरकर यांचे पथकाने पार पाडली.

# कोजागिरीला रंगली 'चांदण्यातील गज़ल'

**अमरावती/का.प्र.**

उत्तरोत्तर बहरत गेलेली गज़लरत्न डॉ. राजेश उमाळे यांची सुरेल गायकी.... बुलढाण्याच्या जाणकार रसिकांची उत्स्फूर्त दाद...वाद्यवृंदाची समर्पण साथ आणि नितीन भट यांचे सुश्राव्य निवेदन... असा सुरेख योग कोजागिरीच्या निमित्याने गेल्या शनिवारी बुलढाण्याच्या एडेड हायस्कूलच्या प्रांगणात जुळून आला. निमित्त होते; मराठी गज़लेवर निस्सीम प्रेम करणाऱ्या मित्रांगण परिवाराने आयोजित केलेल्या 'चांदण्यातील गज़ल' या मैफिलीचे. श्रवणीय गज़लगायकी आणि सोबतीला गरमागरम दुधाचा प्याला अशी अडीच तासांची मेजवानी रसिकांनी अनुभवली.

'सदाचार संकल्प संकल्पना दे' या ए. के. शेख यांच्या लेखणीतून अवतरलेल्या प्रार्थनेने मैफिलीला प्रारंभ झाला. सुरेश भट यांची 'हे तुझे अशावेळी लाजणे बरे नाही', संगीता जोशी यांची 'आयुष्य तेच आहे', वैभव जोशी यांची 'एक होकार दे', डी. एन. गांगण यांची 'केली शिकार माझी माझ्याच सद्गुणांनी' आणि गौरव आठवले यांच्या 'ज्योत पेटण्या दिव्यास वात पाहिजे' अशा स्वरचित हुकुमी गज़ला सादर करून डॉ. राजेश उमाळे यांनी रसिकांची मने जिंकली. इलाही जमादार यांच्या



'क्या कर लोगे नाम समझकर' या हिंदी गज़लनेही मैफिलीत मजा आणली. रसिकांच्या आग्रहास्तव शेतकऱ्यांचे दुःख अधोरेखित करणाऱ्या शरद गावंडे लिखित 'सुटला अजून कोठे मातीस या सुवास' ही भावविभोर रचना डॉ. उमाळे यांनी सादर केली. जगजीत सिंग यांच्या काही रसिकप्रिय गज़लांची झलक असलेला गज़लकोडाला रसिकांनी दमदार दाद दिली. नितीन देशमुख यांच्या 'केले हजार वादे अन् पक्षपात केला' या गजलेने विशेष दाद घेतली तर बुलढाण्याचे गज़लकार विशाल मोहिते यांच्या आईवरील शेराने मैफलीला मातृत्वाचा रंग दिला. नितीन भट यांचे 'श्वास हा रेशमी वाटे नवा नवा' हे 'गणू' चित्रपटातील अवॉर्डविनर गीत यावेळी राजेश उमाळे यांनी सादर करून रसिकांची मने जिंकली. तबल्यावर शीतल मांडवगडे, सिंथसायझरवर सागर काळे तर व्हायोलिनवर हरीश लांडगे यांनी साथ केली. बुलढाणा अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, बुलढाणा एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त डॉ. प्रमोद देशपांडे, एआरडी परिवाराचे राजेश देशलहरा आणि आंतरराष्ट्रीय शायर डॉ. गणेश गायकवाड या मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर माँ जिजाऊ अर्बन बँकेचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे यांचा शेतकऱ्याला भरीव आर्थिक मदत केल्याबद्दल 'मित्रांगण' परिवाराच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला. संचालन चंद्रशेखर जोशी प्रास्ताविक डॉ. आशिष खासबागे तर आभार अभिजीत निंबाळकर यांनी मानले. अतिथींचे स्वागत आनंद संचेती,डॉ. राजेश्वर उबरहंडे, कमलेश कोठारी, मनोज बुरड, रणजीतसिंग राजपूत,विकी चव्हाण, रितेश खडके, जैन,सुनिता प्रकाश जोशी यांनी केले.

## महावितरणच्या अभियंत्यांनी जपली सामाजिक बांधिलकी!

# राज्यातील ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेचे धडे

**अमरावती/का.प्र.**

एरवी राज्याला प्रकाशमय ठेवण्यासाठी रात्रंदिवस राबणाऱ्या महावितरणच्या अभियंत्यांनी यंदा संवेदनशीलतेने सामाजिक बांधिलकी जपत भावी पिढीच्या विद्युत सुरक्षेचा नवा अध्याय लिहिला. विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचतीबाबत जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने गेल्या पंधरवड्यात या अभियंत्यांनी राज्यातील तब्बल २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जाऊन सुमारे ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांचे सादरीकरण व थेट संवादाद्वारे प्रबोधन केले. या विशेष उपक्रमादरम्यान शैक्षणिक संकुलांमध्ये विद्युत सुरक्षेचे पोस्टर्स, फ्लेक्स आणि माहितीपत्रकांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्युत यंत्रणेविषयी योग्य माहिती



नसल्याने राज्यात लहान मुले आणि विद्यार्थ्यांचे विद्युत अपघात होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून महावितरणकडून यंदा अभियंता दिन व गणेशोत्सवाचे औचित्य साधून विद्युत सुरक्षा व हरित ऊर्जा प्रबोधन अभियान राबविण्यात आले. यामध्ये विद्युत सुरक्षेचे चित्रमय सादरीकरण, माहितीपत्रके आणि विविध प्रात्यक्षिके यासह विजेची निर्मिती व तिचा प्रवास कसा होतो यासह ऊर्जा बचत आणि 'विकसित भारत २०४७' या ध्येयासाठी भावी पिढीला हरित ऊर्जेचे महत्त्व समजून सांगण्यात आले.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक राजेंद्र पवार आणि कार्यकारी संचालक परेश भागवत यांच्या पुढाकाराने या अभियानाचे आयोजन करण्यात आले.राज्यभरातील २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ६ लाख १९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत महावितरणच्या अभियंत्यांनी अत्यंत सोप्या भाषेत, रंजक प्रसंगांतून आणि चित्रांच्या माध्यमातून 'विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व ऊर्जा बचत' या विषयांवर प्रबोधन केले. या सादरीकरणानंतर बहुतांश शाळांमध्ये विजेचा प्रवास, विद्युत सुरक्षा आणि हरित ऊर्जेबाबत प्रश्नोत्तरांचे तास रंगले. तसेच अनेक शाळांमध्ये विद्युत सुरक्षेच्या विषयांवर चित्रांमध्ये रंग भरण्याची स्पर्धा घेण्यात आली. अभियानातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे, पुणे येथील 'द पुना स्कूल अँड होम फॉर द ब्लाईंड' या शाळेमध्ये अभियंत्यांनी विद्युत अपघाताबाबत अंध विद्यार्थ्यांना आवाज, स्पर्श आणि गंधाद्वारे संभाव्य विद्युत अपघाताचा धोका कसा ओळखावा याचे अत्यंत संवेदनशीलतेने प्रात्यक्षिक दिले. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनीही जळगाव येथे विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. राज्यभरात राबवण्यात आलेल्या या अभियानात कोकण प्रादेशिक विभागात सर्वाधिक ९४६ शाळांमध्ये २ लाख १४ हजार विद्यार्थ्यांना, नागपूर प्रादेशिक विभागात ८९९ शाळांमध्ये १ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांना, पुणे प्रादेशिक विभागात ८२७ शाळांमध्ये १ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांना आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात २४२ शाळांमध्ये ६५ हजार विद्यार्थ्यांना थेट संवादाच्या माध्यमातून विद्युत सुरक्षेचे व हरित ऊर्जेची माहिती दिली.

# धन हे गरिबांचे रक्त...



‘एकाच्या महालात फुलतात बागा.. दुसऱ्यास धड नाही राहण्यास जागा’ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनातील ओळ सामाजिक विषमतेच्या अंगाला हात लावते. जागतिक वातावरणाचा आढावा घेतांना साम्राज्य उलथापालथ करणारी मानसिकता वाढीस लागली याचे प्रदर्शन दूरदर्शन ते भ्रमणध्वनीवर झळकत आहे. शासन व शोषणकर्त्या विरोधात स्वातंत्र्याची जाणीव असणारे पुढे येऊन स्वातंत्र्याची चळवळ जगभर सुरू आहे. हे समाजमाध्यमांच्या आधारे मत प्रदर्शनातून प्रगट होणारी भावना प्रगत विज्ञानाच्या संसाधनांचे उपकार आहे. मात्र याच संसाधनांचा वापर करून शोषण करणारी यंत्रणा कुण्या एक चालकाच्या हात असली तर त्याचा विरोध व्हायला निसर्ग नियमानुसार तपासता येते.

उदा.ज्या जागेवर खड्डा केला जातो, त्याच जागेवर ढीग ही निर्माण होतो.त्यामुळे ज्याने तंत्रज्ञानाचा वापर लाभाच्या लोभाने केला तर त्याने शोषणाचे दारे उघडे केले आणि त्यातूनच क्रांतीचे वारे वाहू लागलीत.जवळपास संपूर्ण युरोप खंडात चालू असलेले साम्राज्य विरोधी आंदोलने आणि भारतातील गुदमरत असलेली जनता ही विस्फोटाच्या दिशेने असल्याचे नुकतेच ‘आंदोलन’ निमित्ताने आपण अनुभवत आहे.यासर्व घटनेकडे लक्ष लावले तर यांच्या मूळाशी माणसाच्या अस्तित्वातून मानवी समजुतीच्या संबंधाचा आधार नष्ट झाल्याचे स्पष्ट होते.कारण माणूस मानव देहात आहे,पण ध्येयात नाही.कारण देह ही मानवी वृत्तीला प्रगट किंवा प्रदर्शित करणारी वस्तू आहे.त्या वस्तूत जाणीव नावाचा घटक व त्यांचे मानवी आणि अमानवी घटनांचा परिणाम प्रमाणित करतो.

त्यामुळे त्याच्या मानवी व अमानवी जाणिवेला त्याने केलेल्या व्यवहार आणि संबंधित परिसरातील विहार या वर्तनशैलीतून दिसून येते.व्यवहार हा आदान प्रदानाचा भाग आहे.जेथे मोबदल्यात वस्तू किंवा गरज पुरतीच पुरवठा केल्या जातो.मानवी जाणिवेतून ‘संबंधात’होणारे वर्तन हे पुरुषाचे पुरुषाशी,स्त्रीशी किंवा स्त्रीचे स्त्रीशी कसे असतात. यासाठी आपण कुटुंब आणि समाज या क्षेत्रातून तपासू शकतो.त्यामुळे त्याची तपासण्याची यंत्रणा किंवा परिमापे हे सुद्धा मानवी केंद्रीय आहे की अमानवी आहे,याचा परिणाम प्रमाणित झाल्यावर जाणवतोच.त्यामुळेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ’प्रथम पाया मानव वर्तन...’ अशी जाणीवपूर्वक प्रतिक्रिया ग्रामगीतेत नोंदवताना मानवाच्या सर्वांगाचा अभ्यास मांडताना समजून येतो.

विषमतेच्या अंगाने ‘भेद लयाला जाओ जगाचा!’ शांती अखंडित रहो! अशी भजनातून मांडणी करताना धन हे गरिबांचे रक्त!असे जाणोनी वागोत श्रीमंत !श्रम ही गावाची दौलत! म्हणोनी व्हावा मान तिचा!!

ही सूचना किंवा विनंती अथवा उपदेश किंवा निसर्गनियमांची ओळख समजून घेऊ! तरी त्याचा विचार हा मानवी शोषण व्यवस्थेचे मूल्यांकन करणारे मूळ आहे.कारण आज सुरू असलेली श्रीमंतीची रेलचेल देशातील उद्योजक,त्यांच्या मार्फत सुरू असणारी शासन यंत्रणा विकासाचा नावाने होत असलेले नैसर्गिक संसाधनांची तोडफोड,जंगल तोड,जल प्रदूषण,जनावरांचे हत्याकांड,तस्करी,पोषणासाठी आहार म्हणून होत असलेला व्यापार करणारी यंत्रणा आपण बघतो आहे.

एकीकडे श्रीमंत होण्याची शर्यत या पृथ्वीग्रहाचे शोषण करताना गरिबी नावाची दरी वाढत आहे. यामागे मानवी संवेदना ह्या धन संचय,संसाधनांचा अतिरेकी वापर करण्यासाठी होत आहे.ज्या मानवी संवेदना नसून अमानवी जोपासना आहे असे दिसून येते.त्यामुळे त्या घटनेचे परिणाम आंदोलन,उठाव, क्रांती या मार्गाने व्यक्त होतात.यासाठी आम्ही इतिहासाचे अध्ययन करून काय सावधता ठेऊ शकतो हा प्रत्येकाच्या जबाबदारीचा भाग आहे.मात्र या सर्व घटनेचा आढावा घेताना संत उपाधित असलेल्या मानवाच्या विचाराची सखोलता अनुभवताना त्यांच्या साहित्याचा आणि त्यांच्या सहवासाचा नीट अभ्यास करावा.ह्यासाठी ‘नीट’ मुळे झालेल्या उद्रेकाची कारणे जुन्या– नव्या पिढीला समजून येईल.

धनाढ्य होण्यासाठी संविधानाच्या चौकटीत असणारे विधिमंडळ,कार्यकारी प्रशासन,न्यायपालीका व बातमीदाता(पत्रकारिता) या चतुरस्तंभाचा वापर सर्वांनी सर्रास सुरू केला आणि ज्यांच्यावर केला त्या जनतेच्या अधिकाराचे दमन व्हायला सुरूवात झाली.त्याच दमनातून उठाव सुरू झाला की क्रांती,बदल निश्चित घडून येतो.म्हणून ‘गाव करे ते राव ना करे’ ही ग्रामीण म्हण असो की धन हे गरिबांचे रक्त ऐसे समजोनी वागोत श्रीमंत... अशी ग्रामगीतेतील ओळ असो अर्थ तिचा होणाऱ्या परिणामाची जाणिव करून देणारा आहे.म्हणून ‘समजणेवाले को इशारा काफी’

नुकताच कुंभमेळा उद्घाटन सोहळा ३१ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असल्याच्या न्यूज प्रसारित होत आहे.त्याच दिवशी राष्ट्र संत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाचा समारोपीय सोहळा आहे.भीमाशंकर हे पुणे जिल्ह्यातील पौराणिक शिवमंदिर असलेले पवित्र तीर्थक्षेत्र आहे.ज्या परिसरात घनदाट जंगल असलेल्या सहाशे एकर जागेतील वृक्ष तोड करणारा श्रीमंत उद्योग थाटण्यात काही श्रमिक व यंत्रणा याचा वापर करीत आहे.कुंभमेळा उभारण्यासाठी शतकोणशतके वर्षाची हजारो झाडे तोडून आडवी केली.त्या संवेदना मानवी की अमानवी आहे याचे उत्तर निसर्ग दुष्काळाचे रूप घेऊन देत आहे.

दूरदर्शीपणा असणाऱ्या संत महापुरुषाच्या विचाराची किंवा त्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेण्याची जबाबदारी शहाण्यांनी घ्यावी म्हणून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाची प्रणाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी निर्माण करून ठेवली.त्यासाठी त्या ’सेवा’मंडळावर प्रत्येकाचे लक्ष आहे का? नसेल तर पुण्यतिथी निम्मिताने लाखो ’जनता जनार्दन’ च्या संख्येचा विचार व्हावा अन्यथा देव बाजारचा भाजीपाला होऊन जाईल.त्यामुळे श्रीमंताच्या श्रीमंतीचे रहस्य सुद्धा समजून घेण्याची गरज आहे.संविधानातील प्रत्येक विधान आम्ही भारताचे लोक म्हणून वापरताना ग्रामगीतेतील ओळी सुद्धा मानवी जीवनाच्या जबाबदारीची स्पष्टता करतात.राव व रंक ही रँक फक्त समजून घ्यावे एवढाच प्रयत्न सुरू असलेल्या पुण्यतिथी महोत्सव निमित्ताने विचारात आहे.

**कबीर फादर.**
**मो.७७९८६४५५६५**

---

## शहरीकरणाची काळी बाजू: गंज बासोदा आणि प्रशासकीय अंधार

**म**ध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या गंज बासोदा येथील गायत्री नगर, प्रभाग क्रमांक ६ मधील एका तीन मजली बांधकामावर घडलेली घटना याच सामाजिक आणि प्रशासकीय बेपर्वाईचे अतिशय विदारक चित्र डोळ्यांसमोर उभे करते. हातावर पोट असणारे प्रभूलाल गुप्ता, वय सुमारे ६० ते ६५ वर्षे, या ज्येष्ठ बांधकाम मजुराचा झालेला मृत्यू केवळ एका व्यक्तीचा अंत नसून तो आपल्या ढासळलेल्या नागरी व्यवस्थेचे भीषण प्रतीक आहे. संबंधित इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर नेहमीप्रमाणे बांधकामाचे कष्टाचे काम सुरू असताना, नैसर्गिक सवयीनुसार तंबाखू अथवा गुटखा थुंकण्यासाठी प्रभूलाल छतावरून अथवा गॅलरीच्या कठड्यावरून खाली झुकले. नेमक्या याच क्षणी इमारतीच्या अगदी जवळून गेलेल्या ११००० व्होल्टच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीचा अतिशय प्रचंड आणि विध्वंसक धक्का त्यांना बसला. हा झटका इतका तीव्र होता की विजेच्या ठिणग्यांनी क्षणात आगीचे रूप धारण केले, संपूर्ण शरीर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि अत्यंत असह्य वेदनांमध्ये त्यांचा घटनास्थळावरच होरपळून जागीच मृत्यू झाला. ही थरकाप उडवणारी घटना २३ ऑक्टोबर २०२६ रोजी शुक्रवारच्या दिवशी दुपारी सुमारे १ च्या सुमारास घडली. या अमानुष दुर्घटनेचे भयावह वास्तव २४ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध स्थानिक वृत्तवाहिन्या, समाजमाध्यमे आणि वृत्तपत्रांमध्ये सविस्तरपणे प्रसिद्ध झाल्यानंतर संपूर्ण परिसरात प्रचंड हळहळ, भीती आणि तीव्र संतापाची लाट पसरली.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि वस्तुनिष्ठ छाननी केली असता, ही घटना केवळ एक अनपेक्षित अपघात नसून प्रशासकीय व्यवस्थेने संगनमताने केलेला हा अक्षम्य गुन्हा असल्याचे स्पष्ट होते. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे नियम स्पष्टपणे सांगतात की उच्च दाबाच्या तारांच्या नजीक बांधकाम करताना सुरक्षित अंतर ठेवणे अत्यावश्यक आहे आणि जर एखादा नागरिक अथवा व्यावसायिक या नियमांचे उल्लंघन करून बांधकाम करत असेल, तर वीज वितरण कंपनीने तात्काळ त्या बांधकामाचा वीजपुरवठा खंडित करून कायदेशीर कारवाई केली पाहिजे. मात्र प्रत्यक्षात महावितरण अथवा स्थानिक वीज कंपन्या अशा अनधिकृत बांधकामांकडे पूर्णपणे डोळेझाक करतात. दुसरीकडे, नगर परिषदेचे नगररचना आणि बांधकाम तपासणी विभाग कार्यालयात बसूनच नकाशांना मंजुरी देतात, बांधकामाच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याचे साधे कष्टही घेत नाहीत. घरमालक, खाजगी कंत्राटदार, विद्युत मंडळ आणि स्थानिक पालिका अधिकारी या साऱ्यांच्या परस्पर दुर्लक्षामुळे अशा प्रकारची अत्यंत धोकादायक बांधकामे उभी राहतात, आणि जेव्हा दुर्घटना घडते, तेव्हा प्रत्येक विभाग दुसऱ्यावर जबाबदारी ढकलून मोकळा होतो.

या घटनेचा दुसरा अत्यंत संवेदनशील आणि वेदनादायी पैलू म्हणजे असंघटित क्षेत्रातील बांधकाम मजुरांचे पूर्णतः बेवारस असणारे अस्तित्व. आपल्या देशात कोट्यवधी कष्टकरी रोजंदारीवर बांधकाम क्षेत्रात राबत आहेत, परंतु त्यांच्यासाठी ना सुरक्षा साधने उपलब्ध असतात, ना कोणत्याही प्रकारचे विमा संरक्षण. तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यावर काम करताना मजुरांना सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असणारे सुरक्षा बेल्ट, जाळ्या, सुरक्षित पादत्राणे अथवा धोक्याची पूर्वसूचना



देणारे साधे फलकही कंत्राटदारांकडून लावले जात नाहीत. कामाच्या ठिकाणी उच्च दाबाची वीजवाहिनी आहे, तिच्या विशिष्ट अंतरापर्यंत जाणेही प्राणघातक ठरू शकते, याचे कोणतेही मूलभूत सुरक्षा प्रशिक्षण किंवा जाणीव या मजुरांना नसते. नफेखोरीच्या या क्रूर शर्यतीत गरिबांचा जीव हा सर्वांत स्वस्त आणि सहज दुर्लक्षित करता येणारा घटक बनला आहे.

गंज बासोदा येथील ही हृदयद्रावक दुर्घटना संपूर्ण समाजाला आणि व्यवस्थेला अंतर्मुख करणारी आहे. भविष्यात अशा भयानक आणि वेदनादायी दुर्घटनांची पुनरावृत्ती रोखायची असेल, तर केवळ शोक व्यक्त करून अथवा जुजबी चौकशी करून भागणार नाही. उच्च दाबाच्या तारांखाली किंवा त्यांना अगदी लागून उभ्या राहिलेल्या सर्व इमारतींचे युद्धपातळीवर कठोर सुरक्षा परीक्षण करणे, मानवी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या घरमालकांवर आणि दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर थेट सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करणे आणि बांधकाम मजुरांच्या सुरक्षिततेचे निकष सक्तीने राबवणे ही काळाची तातडीची गरज बनली आहे. जोपर्यंत कष्टाचा घाम गाळणाऱ्या सर्वसामान्य हातांना सुरक्षित कामाचे वातावरण आणि सन्मानाने जगण्याचा हक्क मिळत नाही, तोपर्यंत तथाकथित आधुनिक नागरी विकासाच्या गप्पा केवळ पोकळ आणि अर्थहीन ठरतील.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा,मो.९५६१५९४३०६

---

## वैरण : काळजाची साठवण

**कणगीतले धान्य घरातल्या माणसांसाठी, तर बनीममधला कडबा दावणीच्या जिवांसाठी ! दोन्हींचे मोल सारखंच होते. पण दुष्काळ पडला, की या सगळ्या नियोजनाची कसोटी लागायची.**

**प**हाटेच्या निवांत वेळी कुठल्यातरी गोठ्यातून रिकाम्या चरवीत पडणाऱ्या दुधाच्या धारा ‘सुई... सुई...’ अशा मंजुळ आवाजाने गावगाड्याच्या दिवसाची सुरुवात होते. मध्येच वासराचे हंबरणे, गाई-म्हशींच्या गळ्यातल्या घंट्यांची किनकिण, मालकाचा हळुवार हकारा आणि दुधाने भरत जाणाऱ्या चरवीचा गंभीर आवाज... या सगळ्यांतून गोठ्यात जणू सुरांची मैफलच रंगायची. घारोष्ण, निरसे दूध भरलेली चरवी हातात घेऊन कुणबीण घराकडे निघायची, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडून वाहत असायचे. दूध काढून झाले की वासरांचाही वाटा ठरलेला असायचा. त्यांच्या पाठीवरून मायेने फिरणारा हात केवळ स्पर्श नव्हता, तर वर्षानुवर्षं जपल्या गेलेल्या ऋणानुबंधांची साक्ष होती.

कुणब्याचा संसार म्हणजे केवळ घरातल्या माणसांचे कुटुंब नव्हते. त्याच्या कुटुंबकबिल्यात दावणीला बांधलेली जनावरे आणि रानाची राखण करणारी कुत्रीही होती. गाई-म्हशींचं बाळंतपण घरातल्या लेकीच्या बाळंतपणाइतक्याच काळजीने केले जायचे. गरम पाण्याने अंघोळ घालणे, पोटाला मऊ खाद्य मिळावे म्हणून घुगऱ्या देणे, कुणाची नजर लागू नये म्हणून अंगावर पिठाचा पांढरा पट्टा ओढणे... या सगळ्यांतून जनावरांविषयीची माया व्यक्त व्हायची. गाईला पारडू किंवा म्हशीला वगार झाले की घरात आनंदाला पारावार उरत नसे. दावण भरलेली असणं म्हणजे कुणब्याच्या घरात नांदणारी समृद्धी! गळ्यातल्या घंट्यांची किनकिण त्याची जणू ओळखच होती.

या समृद्धीमागे मायेबरोबरच एक मोठी जबाबदारी होती. जनावरांच्या वर्षभराच्या चाऱ्याची बेगमी करावी लागायची. कडबा, गुळी, तणिस यांसारख्या वैरणीबरोबरच पेंड आणि चंदीलाही महत्त्व होते. घाण्यावर तेल गाळल्यानंतर उरलेल्या अवशेषांपासून तयार झालेली पेंड जनावरांना खुराक म्हणून दिली जायची. घरातल्या धान्याची निवड करताना बाजूला राहिलेले हलक्या दर्जाचे धान्यही वाया पऊ दिले जात नसे. ते एकत्र करून गिरणीवरून रडून आणले जायचे. ही चंदी जनावरांना खाऊ घातली जायची. प्रत्येक दाण्याचा उपयोग करून घेणारी आणि प्रत्येक मुक्या जिवाची काळजी वाहणारी कुणब्याची वृत्तीच यातून दिसायची.

रब्बी हंगामात ज्वारीची काढणी झाली की रानात राशी होण्याची लगबग सुरू व्हायची. मळणीनंतर धान्य घरात यायचे आणि वर्षभराच्या भाकरीची बेगमी व्हायची. कणगी ज्वारीने भरली की कुणब्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसायचे. पण कणसे काढून झाल्यावर मागे उरलेल्या घाटांकडेही त्याचे तितकंच लक्ष असायचे. या घाटांच्या पेंड्या बांधून एकावर एक रचल्या जायच्या आणि कडब्याची उंचच उंच बनीम उभी राहायची. धान्याच्या राशीबरोबर कडब्याच्या पेंड्यांचीही मोजदाद व्हायची. कणगीतले धान्य घरातल्या माणसांसाठी, तर बनीममधला कडबा दावणीच्या जिवांसाठी! दोन्हींचं मोल सारखंच होतं. पण दुष्काळ पडला की या सगळ्या नियोजनाची कसोटी लागायची. १९७२ च्या दुष्काळाच्या गोष्टी आजोबांच्या मांडीवर बसून ऐकलेल्या. भुकेने व्याकूळ झालेली माणसे दिवसभर तोंडात चिंचोके धरायची, पाण्यासाठी मैलोनमैल केलेली पायपीट आणि रानातल्या रानभाज्या खाऊन दिवस काढणारी कुटुंबे... हे सांगताना आजोबांच्या डोळ्यांत दाटणारी वेदना आजही आठवते. त्या काळात चाऱ्याअभावी जनावरे विकावी लागल्याच्या गोष्टीही ऐकल्या होत्या. लेकरांसारखे जपलेल्या जनावरांना नाईलाजाने विकण्याची वेळ येणे, ही कुणब्यासाठी किती मोठी वेदना असेल!

**बनीम : मुक्या जिवाची भाकर**

माणूस आपली भूक बोलून दाखवू शकतो; पण मुका जीव काय सांगणार? त्याच्या डोळ्यांतली व्याकुळता आणि चाऱ्याच्या शोधात इकडेतिकडे वळणारी मान एवढंच त्याचे बोलणे. आजही पाऊस कमी पडला की शेतकऱ्याला पिकांबरोबरच पशुधनाची चिंता सतावते. चारा संपत आला की कणगी आणि बनीम दोन्हींकडे पाहताना त्याचे काळीज धास्तावते. धान्य विकत घेण्याची वेळ येणे आणि जनावरांसाठी चारा विकत घेण्याची वेळ येणे, या दोन्ही संकटांचा भार त्याला सोसावा लागतो. कधीकाळी परसात उभी असलेली कडब्याची बनीम कुणब्याच्या समृद्धीची साक्ष द्यायची. आज मात्र अनेक ठिकाणी पाऊस कमी पडल्याने वैरणीची चिंता पुन्हा गडद होत आहे. धान्याची कणगी भरलेली असावी, दावणीतली जनावरे तृप्त असावीत आणि गोठ्यात त्यांच्या घंट्यांची किनकिण ऐकू यावी, हीच कुणब्याची साधी अपेक्षा असते. त्याच्या जगण्याचा आनंद मोठ्या संपत्तीत नसतो; तो असतो भरलेल्या कणगीत, उभ्या असलेल्या बनीममध्ये आणि पोटभर चारा खाऊन शांतपणे रवंथ करणाऱ्या मुक्या जिवांच्या समाधानात. कारण कुणब्याच्या दृष्टीने वैरण ही केवळ जनावरांच्या पोटाची सोय नसते; ती त्याच्या काळजाने जपलेली साठवण असते. दुष्काळात धान्याचा प्रत्येक दाणा मोलाचा होतो, तसाच वैरणीचा प्रत्येक घासही अमूल्य ठरतो. माणसांची भूक भागवताना मुक्या जिवांची भूक विसरता कामा नये, एवढाच या मातीने आपल्याला दिलेला मोलाचा धडा!

**अनिता यलमाटे**

---

## जल बचतीचे जंतर मंतर...

**सलग ८ महिने... म्हणजेच तब्बल २४० दिवस! विचार करा, हे पुढील आठ महिने आपण कसे काढणार आहोत? आठ महिने म्हणजे काही लहान सहान काळ नाही. या वस्तुस्थितीचे भान ठेवून आपणाला उपाययोजना अमलात आणता येतील.**

**दु**ष्काळाची दाहकता आता अधिकच जाणवायला लागली आहे. त्यातल्यात्यात महानगरांमधील नागरिकांना अजूनही त्याची म्हणावी तेवढी झळ जाणवत नाही असे दिसून येते. एक सर्वात मोठा समज या नागरिकांत दिसून येतो तो म्हणजे, ‘दुष्काळ हा फक्त शेतकऱ्यांचा विषय आहे, आपला काय संबंध?’महाराष्ट्र सिंचन परिषदेचे डॉ. दि. मा. मोरे यांनी महाराष्ट्रातील शेतीच्या पाणीवापराच्या संदर्भात केलेले निरीक्षण आणि आग्रह इथे महत्त्वाचा ठरतो. त्यांनी मांडलेला जलन्यायाच्या कार्याशी संबंधित मोजून आणि कार्यक्षमतेने पाणी वापरण्याचा विचार महत्त्वाचा ठरतो. शेती असो किंवा शहर, पाण्याचा वापर किती होतो याचे मोजमाप नसेल, तर कार्यक्षमता सुधारण्याच्या संधीही स्पष्ट होत नाहीत. शहरांसाठी याच विचाराचा विस्तार करून प्रत्येक स्रोतापासून प्रत्येक वापरापर्यंत पाण्याचा हिशेब ठेवणे आवश्यक आहे. आता ऑक्टोबरअखेर आणि दिवाळीच्या प्रारंभाला आपल्या महाराष्ट्राच्या छाताडावर ७५ टक्के पाणीटंचाईचे भूत येऊन बसले आहे. सरसकट १० टक्के पाणी कपात मागील पंधरा ऑक्टोबरपासून लागू झाली आहे आणि ही पाणी कपात डिसेंबरअखेर अजून वाढू शकते, याचाही विचार करायला हवा. अजून उन्हाळा यायचा बाकी आहे. जरा शांतपणे बोटांवर मोजा आणि कॅलेंडरचा हा हिशेब बघा:

**वॉटर प्युरीफायर**

१) ऑक्टोबर (पावसाळा संपतानाच कोरड!), २) नोव्हेंबर (थंडीची सुरुवात; पण धरणात पाणी नाही), ३) डिसेंबर (गुलाबी थंडी; पण चिंतेचे ढग), ४) जानेवारी २०२७ (नवीन वर्षाची सुरुवात टंचाईने), ५) फेब्रुवारी (विहिरींची पातळी खाली), ६) मार्च (उन्हाचा चटका आणि पाण्याचा टंचाईचा झटका), ७) एप्रिल (रखरखते उन्हाळे आणि टँकरची वाट), ८) मे (पाण्याच्या



एका-एका थेंबासाठी जीवन-मरणाचा संघर्ष)

सलग ८ महिने... म्हणजेच तब्बल २४० दिवस! विचार करा, हे पुढील आठ महिने आपण कसे काढणार आहोत? आठ महिने म्हणजे काही लहानसहान काळ नाही.या वस्तुस्थितीचे भान ठेवून आज, आता या क्षणापासून पाणी वाचविण्याच्या उपाययोजना ज्या सर्वसामान्य शहरांतील आणि ग्रामीण भागातील नागरिकांना अंमलात आणता येतील त्या राबविणे आवश्यक आहे, तर मग आजपासूनच या कार्याला आपण सुरुवात करू या!

पाणी वाचवण्याचे छोटे छोटे उपाय, जे आपल्या आवाक्यात आहेत. त्यावर थोडा दृष्टिक्षेप टाकूयात. या व्यतिरिक्त जिथे जिथे पाणी वाचविता येईल तिथे तिथे आपण हे जल बचत व्रत सुफळ करूया!

**‘अर्धा ग्लास’ पाहुणचार**

आपल्याकडे घरी पाहुणा आला की, आपण आदरातिथ्य म्हणून तांब्या भरून किंवा मोठा फूल ग्लास पाणी देतो. पाहुणा त्यातले दोन घोट पितो आणि उरलेले पाऊण ग्लास पाणी सरळ बेसिनमध्ये ओतून दिले जाते. इथून पुढे घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुरुवातीला अर्धाच ग्लास पाणी देऊयात. नम्रपणे सांगूया, ‘पाणी मौल्यवान आहे, तुम्हाला अजून हवे असेल, तर नक्की सांगा.’ पाहुणाही खूश आणि उरलेले हजारो लिटर पाणी वाया जाण्यापासून वाचेल.हा प्रयोग सिरम एन्व्हायरमेंटल सास्टनाबिलिटी रिसर्च फाऊंडेशनने पुण्यात व्यावसायिक आस्थापनांमध्ये राबवला आणि एक कोटी लिटरपेक्षा अधिक पाण्याची बचत केली.

दुसरा उपाय म्हणजे, ‘एक बादली’ पाण्यात अंघोळ. नो शॉवर. शॉवरखाली उभे राहून मस्त गाणी गात आंघोळ करताना किती शेकडो लिटर पाणी वाहून जाते, याचा आपल्याला अंदाजच येत नाही. त्यामुळे पुढील आठ महिने शॉवर पूर्णपणे बंद! फक्त एक बादली आणि एक तांब्या. एका माणसाच्या आंघोळीमागे रोज किमान ३० ते ४० लिटर पाणी वाचते. घरात ४ माणसे असतील, तर रोज १५० लिटर पाण्याची बचत. नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित झाले आणि काही केले गेले. त्यामुळे आजकाल सर्वांच्या घरात, कार्यालयात वॉटर प्युरिफायर/वॉटर फिल्टर अथवा RO मशिन बसविण्यात येतात. आपल्या घरातील अथवा कार्यालयातील वॉटर प्युरिफायर एक लिटर पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी तब्बल ३ लिटर वेस्ट पाणी बाहेर टाकून देतो. आपण ते पाणी पाईपद्वारे थेट बेसिनमध्ये सोडून देतो. तो वेस्ट पाण्याचा पाईप एका मोठ्या कॅनमध्ये किंवा बादलीत सोडूया. ते पाणी अजिबात घाण नसते. ते पाणी फरशी (पोछा) पुसण्यासाठी, भांडी धुण्यास/घासण्यासाठी, कपडे धुण्यासाठी किंवा संडासच्या फ्लशसाठी वापरता येईल. त्यामुळे शेकडो लिटर पाण्याची बचत होईल.

मित्रांनो, निसर्गाने आपल्याला यंदा वेळेच्या आधीच कडक इशारा दिला आहे. अजूनही आपल्याकडे वेळ आहे. हे उरलेले पावसाचे दिवस आणि येणारे आठ महिने आपण संयमाने आणि युक्तीने पाणी वापरले, तरच आपण या संकटातून सहीसलामत बाहेर पडू शकू.‘आज जर पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला नाही, तर उद्या पश्चात्तापाचे अश्रू ढाळायलाही डोळ्यात पाणी उरणार नाही!’ पाणी वाचवा..! काय मग, करूया का.. जल बचतीचे जंतर मंतर आपल्याच घरापासून!

**डॉ. मंगेश कश्यप**

# अकोल्यात विदर्भातील पहिला ‘एज्यु एक्स्पो २०२६’

## १२० हून अधिक स्टॉल्समधून होणार शिक्षण, करिअर आणि कौशल्य विकासाच्या संधींची माहिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

दहावी-बारावीनंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा, उच्च शिक्षणाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, परदेशात शिक्षण कसे घेता येईल, शैक्षणिक कर्ज कसे मिळवावे आणि भविष्यातील करिअरसाठी कोणती कौशल्ये आत्मसात करावीत, अशा विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे आता एकाच व्यासपीठावर मिळणार आहेत.संपूर्ण विदर्भात प्रथमच अकोला महानगरात ‘एज्यु एक्स्पो २०२६’ या भव्य शैक्षणिक प्रदर्शनीचे आयोजन युवा सक्षम फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.



दि. १४, १५ व १६ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयाच्या मैदानावर, मूर्तिजापूर रोड, अकोला येथे हा तीन दिवसीय महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. दररोज सकाळी १०.३० ते रात्री ८.३० या वेळेत सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य राहणार आहे. आयोजन समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.एज्यु एक्स्पोमध्ये केजी ते पीजीपर्यंतचे शिक्षण, परदेशातील शिक्षणाच्या संधी, करिअर मार्गदर्शन, सायकोमेट्रिक मूल्यांकन, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक कर्ज, डिजिटल लर्निंग, कौशल्य विकास, स्टार्टअप्स आणि उदयोन्मुख करिअर क्षेत्रांशी संबंधित १२० हून अधिक स्टॉल्स असणार आहेत.अहमदाबाद, हैदराबाद, मुंबई, पुणे आणि नागपूर यांसारख्या प्रमुख शहरांतील नामांकित शैक्षणिक संस्था व कंपन्या या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. त्यामुळे महानगरांमध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक पर्यायांची आणि करिअरच्या संधींची माहिती विद्यार्थ्यांना अकोल्यातच मिळणार आहे. विविध संस्थांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया आणि करिअरच्या पर्यायांविषयी मार्गदर्शन घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.

या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे इस्रोची फिरती प्रयोगशाळा आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन. विज्ञान, संशोधन आणि अवकाश तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.याशिवाय क्रिएटर कॉन्क्लेव्ह, ‘करिअर अनकट’ लाइव्ह पॉडकास्ट स्टुडिओ, फ्युचर स्किल्स अरेना, विद्यार्थी स्पर्धा, कार्यशाळा, फूड झोन आणि गेम झोन यांचा समावेश असेल. करिअर तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी तसेच युवकांसाठी भजन जॅमिंगसारखे अभिनव उपक्रमही आयोजित करण्यात येणार आहेत. ज्ञान, मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि मनोरंजन यांचा संगम या महोत्सवातून अनुभवता येणार आहे.

प्रदर्शनादरम्यान दररोज शैक्षणिक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. संरक्षण सेवांमधील करिअर, कृत्रिम बुद्धिमत्ता (ंघ), व्यासंगातून उद्योजकतेकडे वाटचाल, अभियांत्रिकीपलीकडील करिअरच्या संधी, विधी क्षेत्रातील करिअर, खेळातून करिअर, स्पर्धा परीक्षांची तयारी, गृहविज्ञानातून कौशल्य विकास आणि करिअरच्या संधी, एमबीबीएस व बीडीएसनंतरचे पर्याय, डिजिटल युगातील सकारात्मक पालकत्व तसेच रोबोटिक्स आणि भविष्यातील तंत्रज्ञान अशा विविध विषयांचा यात समावेश असेल.

अकोला, अमरावती, बुलढाणा, हिंगोली, जळगाव, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या आठ जिल्ह्यांतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या महोत्सवाला भेट देणार आहेत. मोठ्या शहरांकडे न जाता आपल्या परिसरातच विविध शैक्षणिक पर्याय, करिअरच्या संधी आणि कौशल्य विकासाच्या उपक्रमांची माहिती मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.एज्यु एक्स्पो हे शैक्षणिक संस्था आणि संबंधित कंपन्यांना हजारो विद्यार्थी व पालकांपर्यंत थेट पोहोचण्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. उच्च शिक्षण संस्था, एड-टेक कंपन्या, बँका व वित्तीय संस्था, करिअर आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योग व प्रकाशक तसेच स्पर्धा परीक्षा व प्रवेश परीक्षा मार्गदर्शन संस्थांसाठी स्टॉल्स उपलब्ध आहेत.

# पाण्याचा अपव्यय भोवला; दोन बांधकामधारकांना १० हजारांचा दंड

## अकोला मनपाची पूर्व झोनमध्ये कारवाई; प्रत्येकी पाच हजारांचा दंड

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पाण्याचा अपव्यय केल्याप्रकरणी पूर्व झोनमधील दोन बांधकामधारकांवर मंगळवारी (२७ ऑक्टोबर) प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे एकूण १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहरात झोननिहाय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. प्राप्त तक्रारी आणि तपासणीदरम्यान पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. प्रभाग क्रमांक ३ मधील बिर्ला बी परिसरातील श्री. ढोरे यांच्या बांधकामस्थळी, तसेच प्रभाग क्रमांक ६ मधील तापडिया नगर, गल्ली क्रमांक १ येथील श्री. मेटांगे यांच्या बांधकामस्थळी पाण्याचा अपव्यय आढळला. त्यामुळे दोन्ही बांधकामधारकांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी पूर्व झोनचे कनिष्ठ अभियंता निवृत्ती दातकर, स्वच्छता निरीक्षक सुनील कंडेरा, गोविंद करिहार, विशाल पारोचे आणि दीपक मकोरिया यांचा सहभाग होता. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासह भूजलाचा वापरही गरजेनुसार आणि काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.



शहरात पाण्याची पाइपलाइन फुटलेली आढळल्यास, सार्वजनिक किंवा खासगी बांधकामासाठी महापालिकेच्या पाण्याचा अथवा बोअरवेल-विहिरीतील भूजलाचा वापर होत असल्यास, वाहन धुण्याची केंद्रे सुरू असल्यास किंवा आरओ प्लांटमध्ये महापालिकेचे पाणी वापरले जात असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी महापालिकेला माहिती द्यावी. यासाठी ०७२४-२४३४४१२ या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदविता येणार आहे. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अहिल्यादेवी इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये भोंडल्याचा उत्साह

## पारंपरिक गाणी आणि खेळांतून विद्यार्थिनींना लोकसंस्कृतीची ओळख

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील अहिल्यादेवी इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये भोंडला अर्थात भुलाबाईचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पारंपरिक गाणी, खेळ आणि सांस्कृतिक परंपरांच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी भोंडल्याचा आनंद घेतला.



महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत भोंडल्याला विशेष महत्त्व आहे. अश्विन महिन्यात साजरा होणारा हा उत्सव निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा जपतो. हत्तीची प्रतिकात्मक आकृती मांडून तिच्याभोवती फेर धरत पारंपरिक गाणी गायली जातात. या उत्सवातून सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित होते.

शाळेत आयोजित कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका नंदिनी माई यांच्या हस्ते भुलाबाईची पूजा करून झाली. त्यानंतर त्यांनी पारंपरिक गाण्यांना सुरुवात केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी भोंडल्याच्या गाण्यांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांची ओळख व्हावी आणि आपल्या सांस्कृतिक वारशाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. आनंदी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# माऊली मल्टीस्टेटच्या १७ जणांवर गुन्हे; ४.४१ कोटींच्या ठेवींचे काय?

## हिवरखेडच्या ७५० हून अधिक ठेवीदारांची फसवणूक केल्याचा आरोप

**हिवरखेड :** आकर्षक व्याजदराचे आमिष, कोट्यवधींच्या ठेवी आणि मुदत संपल्यानंतरही पैशांसाठी सुरू असलेली प्रतीक्षा! माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या हिवरखेड शाखेतील कथित आर्थिक गैरव्यवहाराला अखेर कायदेशीर वळण मिळाले आहे. ठेवीदारांची ४ कोटी ४१ लाख ५३ हजार १११ रुपयांपेक्षा अधिक रक्कम अडकल्याच्या प्रकरणात सोसायटीशी संबंधित १७ जणांविरुद्ध हिवरखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ७५० हून अधिक ठेवीदारांच्या तक्रारी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर झालेल्या या कारवाईमुळे तपासाला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रकरणाचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

या प्रकरणात बारगणपुरा, हिवरखेड येथील ६७ वर्षीय सेवानिवृत्त शिक्षक रमेश ज्ञानदेवराव उगले यांनी तक्रार दिली. त्यांच्या आणि त्यांच्या पत्नीच्या खात्यांमध्ये मिळून ४१ लाख १६ हजार ६८९ रुपये ठेवीच्या स्वरूपात जमा होते. आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून हिवरखेड शाखेमार्फत शेकडो ठेवीदारांकडून रक्कम स्वीकारण्यात आली. मात्र, मुदत पूर्ण झाल्यानंतरही मुद्दल आणि व्याज परत न करता टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तक्रारीवरून हिवरखेड पोलीसठाण्यात अप. क्र. ५१७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१६(५), ६१(२) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### ठेवीदारांचा संघर्ष; अखेर गुन्हा दाखल

ठेवींची रक्कम परत मिळावी आणि संबंधितांवर कारवाई व्हावी, यासाठी हिवरखेड विकास मंच, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, पत्रकार आणि जागरूक नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा केला. सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज, पत्रकार अर्जुन खिरोडकार, गणेश सुरजुसे, बाळासाहेब नेरकर, जमीर शेख आणि राजू खान यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निवेदने देत प्रकरणाचे गांभीर्य मांडले होते.

या पाठपुराव्यानंतर १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने ठेवीदारांच्या लढ्याला पहिले यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. मात्र, गुन्हा दाखल होणे म्हणजे ठेवींची रक्कम परत मिळणे नव्हे. त्यामुळे तपासातून आर्थिक व्यवहारांची साखळी उघड होणार का, अडकलेल्या ठेवींच्या वसुलीसाठी काय पावले उचलली जाणार आणि ठेवीदारांना दिलासा कधी मिळणार, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

### आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासाची सूत्रे

प्रकरणाची व्याप्ती आणि आर्थिक व्यवहारांची मोठी रक्कम लक्षात घेऊन तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जुमडे तपास करीत आहेत. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, ठाणेदार सचिन पाटील तसेच संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाल्याचे पाठपुरावा करणाऱ्यांनी नमूद केले.

### गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे

१. डॉ. सुनील मोहन सरोदे
२. निकेत राजू धोटे
३. मिलिंद अनिल सोनवणे
४. ऋषिकेश सुनील सरोदे
५. अनिल बलभीम साळुंखे
६. ओमप्रकाश चतुरकार
७. पूजा मनोज उगले
८. राजेश उर्फ मिलिंद निवृत्ती गावंडे
९. कृष्णा जगन्नाथ सित्रे
१०. डॉ. रामदास काशीराम धुळे
११. शिवाजी रामकृष्ण नराजे
१२. प्रवीण नामदेवराव येऊल
१३. आशिष दिलीप नाठे
१४. डॉ. अभिजीत रमेश उगले
१५. अनिल रामकृष्ण गावंडे
१६. अनुराग रमेशचंद्र गुप्ता
१७. शादिद खान शहागीर खान (राजू खान)

४.४१ कोटींच्या ठेवी, ७५० हून अधिक ठेवीदार आणि १७ आरोपी... या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास करून ठेवीदारांच्या पैशांचा मागोवा घेणे आणि कायद्यानुसार पुढील कारवाई करणे, हे तपास यंत्रणेसमोरील प्रमुख आव्हान आहे. आरोपींवरील आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे.

जाहीर नोटीस

**(स्थावर मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत हरकती मागविण्याकरिता)**

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या पक्षकार यांनी सौ. पुष्पलता राम राठोड यांच्या मालकीची खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत खरेदी करण्याचे ठरविले असून, सदर व्यवहारापोटी टोकन रक्कम अदा करून पावतीही घेतलेली आहे. मौजे उमरखेड, महानगरपालिका हद्द, अकोला, ता. अकोला, जि. अकोला येथील शेत सर्व्हे क्रमांक ३/१/ब मधील मिळकतीसंदर्भात उपविभागीय अधिकारी (एस डी ओ), अकोला यांनी रेकॉर्ड क्रमांक २०/०२/१९६५-६६, आदेश दिनांक ०२/१२/१९६६ अन्वये मंजूर केलेल्या लेआउट नकाशातील लेआउट प्लॉट क्रमांक ३ व ४, एकूण क्षेत्रफळ २,३१० चौ. फूट (२१४.६८ चौ. मी.) या जागेवर अकोला महानगरपालिकेची परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या जानकी अपार्टमेंट या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक ३०३, क्षेत्रफळ ५५.७६ चौ. मी. (६०० चौ. फूट), ज्यामध्ये एक बेडरूम, एक हॉल, किचन व टॉयलेट यांचा समावेश आहे.

सदर फ्लॅटच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे :- पूर्वेस - सर्व्हिस लाईन, पश्चिमेस – जिना (स्टेअरकेस), उत्तरेस - देविदास इंगळे यांचे घर, दक्षिणेस - राऊत यांचे घर.

इमारत ज्या जागेवर स्थित आहे त्या जागेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे :- पूर्वेस - सर्व्हिस लाईन, पश्चिमेस – सरकारी रस्ता, उत्तरेस - देविदास इंगळे यांचे घर, दक्षिणेस – राऊत यांचे घर.

वरील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा अथवा इतर कोणाचाही मालकी हक्क, सहमालकी हक्क, वारसा हक्क, गहाण, बोजा, तारण, भाडेपट्टा, करार, न्यायालयीन वाद किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास, त्यांनी या नोटिशीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आवश्यक त्या मूळ अथवा प्रमाणित कागदपत्रांच्या प्रतींसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीसंबंधी कोणताही हक्क किंवा हितसंबंध नाही, असे गृहीत धरून लागू कायद्याच्या अधीन राहून माझे अशील पुढील खरेदी व्यवहाराची कार्यवाही करतील. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकतींबाबत कायद्यानुसार निर्णय घेतला जाईल.

**ठिकाण :** अकोला
**दिनांक :** २३/१०/२०२६

**अधिवक्ता**
**योगेश पी. राठी**
अकोला, ता. व जि. अकोला
मो. क्र. : ८५३०६१२४६१

जाहीर सुचना

दि. २७.१०.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे दिलीप निरंजन गोयनका यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे खडकी बु, ता. जि. अकोला येथील शेत सर्व्हे क्र ४०/२, (७/१२ नोंदीनुसार ४०/२/अ/४५), पैकी मंजूर लेआऊट मधील, खुला लेआऊट प्लॉट क्र ४५, ज्याचे एकूण क्षेत्रफळ २०७.१५ चौ.मी. (७/१२ नुसार २०७ चौ.मी.) ज्यास चतुः सिमा पूर्वेस :- लेआऊट रोड, पश्चिमेस लेआऊट प्लॉट क्र ४४, उत्तरेस:- लेआऊट रोड, दक्षिणेस:- वेगळे लेआऊट. अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मोबाईल क्र ९८२३०९१३७७

# दुष्काळी परिस्थितीत रब्बी ज्वारी उत्पादन वाढीसाठी आत्मामार्फत प्रात्यक्षिक संचांचे वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात ज्वारीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासह जनावरांसाठी चारा उपलब्धता वाढविण्याच्या उद्देशाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अकोला कार्यालयामार्फत लोह व झिंकयुक्त जैवसमृद्ध ‘परभणी शक्ती’ रब्बी ज्वारीच्या प्रात्यक्षिक संचांचे वितरण करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील शेतकऱ्यांना ०.४० हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यासाठी प्रात्यक्षिक संच उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या प्रात्यक्षिक संचामध्ये महाबीजचे लोह व झिंकयुक्त जैवसमृद्ध ‘परभणी शक्ती’ ज्वारीचे चार किलो बियाणे, बियाणे प्रक्रियेसाठी लिक्विड कॉन्सॉर्शिया, माती नमुना तपासणीची सुविधा तसेच रब्बी ज्वारीविषयक माहिती पुस्तिकेचा समावेश आहे. या संचांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुधारित वाणाची माहिती मिळण्यासोबतच ज्वारीचे उत्पादन वाढविण्यास आणि चारा पिकांच्या उपलब्धतेत भर घालण्यास मदत होणार आहे.

या प्रात्यक्षिक संचांचे वितरण सर्व तालुक्यांतील कृषी अधिकारी कार्यालयांमार्फत करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संरक्षित सिंचनाची उपलब्धता असलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित नमुन्यातील विनंती अर्ज सादर करावा. अर्जासोबत सातबारा उतारा, आधार कार्ड, अ‍ॅग्रीस्टॅक फार्मर आयडी व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित तालुक्यातील सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी तसेच तालुका व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक डॉ. मुरली इंगळे, अकोला यांनी केले आहे.

# विश्व सिंधी सेवा संगमने साजरा केला ‘सिंधी मिठाई दिन’

■ प्रतिनिधी | अकोला ■

सिंधी समाजाच्या सेवेत सक्रिय विश्व सिंधी सेवा संगमच्या वतीने सिंधी मिठाई दिन साजरा करण्यात आला. यात शेकडो नागरिकांनी पारंपरिक मिठाईचा लाभ घेतला.सिंधी कॅम्प येथील संत गोदडीवाला धाम येथे संपन्न या उत्सवात शेकडो सिंधी समाजातील नागरिकांनी पारंपरिक सहभाग घेतला.

विश्व सिंधी सेवा संगमच्या वतीने जगभरातील सिंधी समाजाची संस्कृती, परंपरा आणि खाद्यसंस्कृती जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने समाजातील १२ प्रसिद्ध पारंपरिक खाद्यपदार्थांना समर्पित विशेष दिवस साजरे केले जातात. यात दाल पकवान डे, कढी-चावल डे, पकोडा डे, मिठाई डे, सेयल फुल्का डे, कोकी डे यांसह अन्य पारंपरिक खाद्यपदार्थांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत अकोल्यातही दर महिन्याला अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या मिठाई दिन मध्ये सिंधी समाजातील प्रसिद्ध पारंपरिक मिठाई, मोंगी मिठाई, मेसू, बुंदी आणि शेव हे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी उपस्थित मान्यवर कन्हैयालाल रंगवानी, भारूमल मुलानी, मनोहर पंजवानी, हरीश माखीजा, अशोक बोधानी, हरीश हेमनानी, दीपक मनवाणी, रामचंद जसवानी, राजकुमार सचदेव, हरीश ढींगरा, प्रकाश मनवाणी, मनोहर मनवाणी यांचे स्वागत करण्यात आले.उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले आणि आयोजकांना शुभेच्छा दिल्यात.

**अकोला :** द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया च्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल अंतर्गत अकोला शाखेतर्फे आयसीएआय भवनात ‘कोड ऑफ एथिक्स’ या विषयावर सीपीई सेमिनार संपन्न झाला.

**Change In Name**

(Old passport No K1739847) I Have Change My Wife Name In My Passport From **RUPALI SANGANI** -TO- **RUPALI HIREN SANGANEE** My Residential Address is 12, Hansraj Tower Opp. Amrut Wadi, Radhakishan Plot, akola, Maharashtra, 444001

# दिल्लीतील पत्रकारिता ही जीवनाची संधी - सुरेश भटेवरा

## बाबूजी देशमुख वाचनालयाच्या व्याख्यानमालेत आज

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्राचीन काळापासून दिल्ली प्रति सर्वांना एक वेगळे आकर्षक आहे.हजारो वर्षापासून दिल्ली ही राजे महाराजे, मंत्री, मुत्सद्दी वर्गाची मक्तेदारी राहीली आहे.राजकारण हा दिल्लीचा आत्मा आहे.अगदी हजारो वर्षापासून त्यात कट, कारस्थाने, खलबते होत आलेली आहेत.सर्व राजे मंत्री यांचे वास्तव्य दिल्लीत होत असे. रात्री बेरात्री चाललेली राजकीय गणिते हे दिल्लीचे वैशिष्ट्य होते.तेव्हापासून तो आजतागायत दिल्लीतील राजकीय घडामोडी चा प्रभाव प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे प्रभाव पडत असतो.अश्या या दिल्लीचा सरळपणे प्रभाव पत्रकारिता वर पडत असतो.तथापि दिल्लीतील पत्रकारिता ही पत्रकाराच्या जीवनाला वेगळे आकार देण्याची सुवर्णसंधी असल्याचे मत जेष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांनी व्यक्त केले.बाबूजी देशमुख वाचनालया च्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या नवरात्र व्याख्यान मालेत मंगळवारी नासिक येथील जेष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांनी दिल्लीतील पत्रकारिता, काल, आज, उद्या’ या विषयावर सहावे पुष्प



गुंफले.आपले अनुभव कथन करतांना ते म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्रोत्तर असे पत्रकारितेचे दोन भाग आजमितीस आहेत. पूर्वी तारेने बातमी पाठवण्याची पद्धत होती. जेव्हा या देशातून टेलिग्राम चे पर्व संपले, तेव्हा आपणास फार वाईट वाटले.कारण त्या काळात राजकारण व राजकिय व्यक्ती एवढी हायफाय नव्हती.अगदी सर्वसामान्य व्यक्ति ही पुढारी, मंत्री यांना भेटू शकत असे.पत्रकारांचे अगदी मधुर संबंध राजकीय व्यक्तीसोबत होते. राजकीय व्यक्तींना फाजिल सुरक्षा नव्हती त्यावेळी वर्तमानपत्रे ही स्वतंत्र विचार प्रणालीची होती. बातम्या खणून काढण्याची पद्धत होती. लोकांच्या समस्या सोडविण्याची किमया पत्रकारितेत होती. त्यामुळे शुद्ध पत्रकारिता त्याकाळी अस्तित्वात होती.आज पत्रकारितेत आधुनिक व अमुलाग्र बदल झाला आहे.पूर्वी कृष्णधवल स्वरूपात छापणारी वर्तमानपत्र आज रंगीन व गुळगुळीत पानात निघायला लागली आहेत.सर्वत्र वृत्तवाहिन्यांचे पेव फुटले आहे. वीस मिनिटांच्या क्लिपिंग मध्ये जर बातमी कळाली असती तर वर्तमानपत्रांचे अस्तित्वच मुळी समाप्त झाले असते. मात्र आजही क्लिपिंगच्या नंतर वृत्तपत्रांच्या माध्यमातून वृत्तपत्र द्वारा बातमी वाचण्याचा मोह सामान्य माणसाला आवरत नसल्याचे भटेवरा यांनी यावेळी सांगितले. हसत खेळत जीवन जगून पत्रकारिता करण्याचा तो काळ होता.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय



# वडाळयात सभा मंडपाचे काम अर्धवट; कंत्राटदार गायब, प्रशासन गप्प

## निकृष्ट बांधकामाचा आरोप; कामाचा फलकही नाही

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

विकासकामांच्या नावाखाली जनतेच्या पैशांचा विनियोग नेमका कसा होत आहे, असा संतप्त प्रश्न आष्टी तालुक्यातील वडाळा गावात उपस्थित झाला आहे. गावातील सार्वजनिक सभा मंडपाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत पडून असून, संबंधित कंत्राटदार गायब झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते रवींद्र वडास्कर यांनी केला आहे. बांधकामाचा निकृष्ट दर्जा, कामातील दिरंगाई आणि जबाबदार यंत्रणेच्या कथित दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करीत वडास्कर यांनी आता आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**बांधकाम सुरू झाले; मात्र पूर्णत्वाचा पत्ता नाही**

वडाळा गावात नागरिकांच्या सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सभा मंडप उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. सुरुवातीला बांधकामासाठी खड्डे खोदण्यात आले. त्यानंतर काम संथ गतीने पुढे सरकले. आता हे बांधकाम अर्धवट अवस्थेतच राहिल्याने सार्वजनिक निधीतून सुरू झालेल्या या कामाचे पुढे काय होणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

काम वेळेत पूर्ण करणे आणि बांधकामाचा दर्जा राखणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी असताना प्रत्यक्षात काम रखडल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी जोर धरत आहे.



**प्लास्टरपासून बांधकामाच्या दर्जापर्यंत प्रश्नचिन्ह**

सभा मंडपाच्या बांधकामात आवश्यक त्या प्रमाणात पाणी टाकण्यात आले नसल्याचा आरोप आहे. तसेच प्लास्टरचे काम व्यवस्थित आणि सरळ रेषेत झाले नसून, काही ठिकाणी ओबडधोबड काम दिसून येत असल्याचे वडास्कर यांनी म्हटले आहे. त्यामुळे बांधकामाच्या गुणवत्तेची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी पुढे आली आहे.

सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणाऱ्या वास्तूची गुणवत्ता तपासणे आणि काम नियमानुसार होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवणे आवश्यक असते. मात्र, या कामाच्या ठिकाणी बांधकामाची माहिती देणारा फलकच नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामाची किंमत किती, निधी किती मंजूर झाला, कंत्राटदार कोण आणि काम पूर्ण करण्याची मुदत काय, याबाबत स्पष्ट माहिती मिळावी, अशी मागणी होत आहे.

**कंत्राटदार कोण जबाबदारी झटकतोय कोण**

या बांधकामाच्या जबाबदारीबाबतही संभ्रम असल्याचा दावा करण्यात येत आहे. संबंधित कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित असतानाही काम आपले नसल्याचे सांगून दुसऱ्याच व्यक्तीचे नाव पुढे केले जात असल्याचा आरोप वडास्कर यांनी केला आहे. त्यामुळे या कामाचा अधिकृत कंत्राटदार कोण आणि बांधकामाची जबाबदारी नेमकी कुणाची, याचा उलगडा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही नाराजी**

गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने नियमितपणे उपलब्ध राहणे अपेक्षित आहे. मात्र, ग्रामपंचायत अधिकारी महिन्यातून एकदाच गावात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या समस्या मांडायच्या कुणाकडे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सभा मंडपाच्या बांधकामातील कथित अनियमिततेबाबत यापूर्वीही अनेकदा तक्रारी केल्याचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र वडास्कर यांनी सांगितले. मात्र, अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे आता संबंधित यंत्रणेने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

प्रशासनासमोर आता महत्त्वाचे प्रश्न आहेत. सभा मंडपाच्या बांधकामाची तांत्रिक तपासणी कधी होणार मंजूर निधी आणि प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सार्वजनिक केला जाणार का काम अर्धवट सोडण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होणार का आणि ग्रामस्थांना अपेक्षित असलेला सभा मंडप पूर्णत्वास जाणार तरी कधी या प्रश्नांची उत्तरे मिळण्याची वडाळा ग्रामस्थ प्रतीक्षा करीत आहेत. आता प्रशासन तक्रारींची दखल घेऊन चौकशी करते की हे बांधकाम असेच रखडून राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आजीच्या डोळयांत अश्रू, युवकांच्या माणुसकीने दिला आधार



**सेलू/जनमाध्यम**

आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या दहा वर्षांच्या दर्शन राऊतच्या उपचारांसाठी गर्जना गणेश मंडळाच्या युवकांनी माणुसकीचा हात पुढे केला आहे. गणेशोत्सवाचा खर्च कमी करून आणि नागरिकांकडून वर्गणी गोळा करत युवकांनी तब्बल ५३ हजार रुपयांची मदत उभी केली. नातवाच्या उपचारांसाठी मिळालेली मदत पाहून आजीच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

सेलू शहरातील वॉर्ड क्रमांक ४ मध्ये राहणारा दर्शन घराजवळ खेळत असताना मागून रिव्हर्समध्ये येणाऱ्या मालवाहू वाहनाचा भाग छातीला लागल्याने गंभीर जखमी झाला. त्याच्यावर सेवाग्राम येथे उपचार करण्यात आले. छातीवरील शस्त्रक्रियेसाठी त्याला नागपूर येथे हलविण्यात आले. आई-वडील नसल्याने मोलमजुरी करणाऱ्या आजीवरच त्याच्या संगोपनाची जबाबदारी आहे.

ही परिस्थिती पाहून गर्जना गणेश मंडळाच्या युवकांनी सुरुवातीला १० हजार रुपये दिले. त्यानंतर नागरिकांकडून वर्गणी गोळा केली. उत्साही बालगणेश मंडळ आणि भाईराज बालगणेश मंडळानेही सहकार्य केले. युवकांनी दर्शनच्या घरी जाऊन आजीकडे आणखी ४३ हजार रुपये सुपूर्द केले.दर्शनच्या पुढील उपचारांसाठी आर्थिक मदतीची गरज असून दानशूरांनी आशिष बुरांडे (मो. ८४०८०२७१४५) किंवा गर्जना गणेश मंडळाच्या सदस्यांशी संपर्क साधावा.

# कराटेत देवांश नरडची भरारी

## जिल्हास्तरीय स्पर्धेत पटकावला द्वितीय क्रमांक



**वर्धा/जनमाध्यम**

जिद्द, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर त्रिमूर्ती नगर येथील देवांश पंकज नरड याने जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. देवांश हा सोमलवार शाळेत इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असून, त्याच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कराटेसारख्या क्रीडा प्रकारात प्रावीण्य मिळविण्यासाठी नियमित सराव, शारीरिक क्षमता, एकाग्रता आणि प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक असते. या गुणांच्या बळावर देवांशने जिल्हास्तरीय स्पर्धेत आपल्या कौशल्याची छाप उमटवली. त्याने मिळविलेल्या यशामुळे शाळेतील अन्य विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

देवांशच्या या यशाबद्दल त्याची आई, वर्गशिक्षक, मुख्याध्यापक, आत्या आणि मामा यांनी त्याचे अभिनंदन केले. त्याच्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही त्याने क्रीडा क्षेत्रात अशीच यशस्वी वाटचाल करावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# दुष्काळाच्या झळा रोखण्यासाठी वडगाव खुर्दमध्ये वनराई बंधारा

## ग्रामस्थांचा पुढाकार; जलसंधारणातून भूजल पातळी वाढविण्याचा प्रयत्न

**सेलू/जनमाध्यम**

तालुका दुष्काळग्रस्त घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी काळातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी वडगाव (खुर्द) येथे ग्रामस्थांनी श्रमदानातून वनराई बंधारा साकारला. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत मुरविणे आणि भूजल पातळीत वाढ करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

गटविकास अधिकारी देवानंद पाणबुडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पंचायत समिती सेलूचे सहाय्यक गटविकास अधिकारी सुधाकर



हजारे, विस्तार अधिकारी आदिनाथ डमाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्रशासकीय अधिकारी प्रवीण चंदनखेडे आणि ग्रामपंचायत अधिकारी संदीप नागपुरकर यांच्या समन्वयातून बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान करीत जलसंधारणाच्या कामात सहभाग नोंदविला.

माजी सरपंच मालाताई नरताम, वैदेही किरमे, पोलीस पाटील कृष्णा लांजेवार, आरोग्य सेवक संतोष कदम आणि ग्रामपंचायत कर्मचारी शिवा ठाकरे यांनी श्रमदानातून या उपक्रमाला हातभार लावला.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा ठरत असून,पावसाचे पाणी अडवून त्याचा योग्य विनियोग करणे गरजेचे आहे. वनराई बंधाऱ्यामुळे वाहून जाणाऱ्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन ते जमिनीत मुरण्यास मदत होणार आहे. परिणामी, भूजल पातळी वाढविण्यास आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास हातभार लागू शकतो. लोकसहभागातून जलसंधारणाची कामे उभारल्यास गावाची पाणीसमस्या कमी करण्यासाठी मदत होऊ शकते.

वडगाव (खुर्द) येथील उपक्रमातून जलसंधारण आणि पाणी बचतीचा संदेश देण्यात आला.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजारांचे अग्रीम

## ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झालेल्यांना लाभ



**मुंबई/जनमाध्यम**

राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांमधील सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रीम देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हा लाभ मिळणार असून, रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना विकसित भारत-जी राम जी योजनेसह विविध योजनांच्या समन्वयातून सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतूनही या योजनेची कामे करता येणार आहेत. तसेच दिव्यांगांच्या कल्याण, पुनर्वसन आणि सक्षमीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील सर्वसाधारण निधीच्या एक टक्का निधीचा वापर करण्यास मंजुरी देण्यात आली.

**जलसंपदा विभागात ३९ हजार पदांचा आकृतीबंध**

जलसंपदा विभागाचा ३९ हजार ७२२ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला. सिंचन क्षेत्राच्या विस्तारासाठी नवीन पदनिर्मिती आणि कार्यालयांच्या पुनर्रचनेलाही मान्यता मिळाली. २०२५ अखेरपर्यंत राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र ५८ लाख हेक्टरपर्यंत पोहोचल्याची माहिती निर्णयात देण्यात आली.

**विकासकामांना चालना**

पुण्यातील लोहगाव येथे भारत मंडपमच्या धर्तीवर राष्ट्रीय प्रदर्शन केंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीसाठी बजाज ऑटोला ६६ कोटी ८२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले. चिपी विमानतळावरील विमानसेवा सुरू करण्यासाठी शंभर टक्के व्यवहार्यता तफावत निधी देण्यासही मान्यता देण्यात आली. याशिवाय प्रशासन अधिकारी संवर्गाचे एकत्रीकरण, औद्योगिक विस्तारासाठी जमीन उपलब्ध करून देणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्याचे निर्णय घेण्यात आले. लातूर जिल्ह्यातील मल्हारराव होळकर सहकारी सूतगिरणीलाही शासन अर्थसहाय्य मिळणार आहे.

## दुष्काळात कमी पाण्याच्या पिकांना प्राधान्य द्या

# हिंगणीत रब्बी पीक नियोजनासाठी कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन



**सेलू/जनमाध्यम**

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून शेती उत्पादन टिकविण्यासाठी शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. हिंगणी येथील ग्रामपंचायतीत मंगळवारी (२७ ऑक्टोबर) रब्बी हंगाम पीक नियोजनासाठी शेतकरी सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय कृषी अधिकारी वैष्णवी शिंदे यांनी 'खेत बचाओ अभियानांतर्गत' मार्गदर्शन करताना करडई, जवस, सूर्यफूल, मोहरी आणि ज्वारी या पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. तसेच रब्बी पिकांवरील रोग,त्यांची लक्षणे आणि नियंत्रणाच्या उपाययोजनांची माहिती दिली. मंडळ कृषी अधिकारी जाधव यांनी जी राम जी योजनेंतर्गत जलतारा व शोषखड्ड्यांचे महत्त्व विशद केले. उपकृषी अधिकारी चव्हाण यांनी सूक्ष्म सिंचन पद्धती,अनुदानित बियाणे आणि चारा पिकांच्या योजनांची माहिती दिली. एनआरएम समन्वयक प्रशांत काटकर यांनी विहीर पुनर्भरणातून भूजल पातळी वाढविण्याचे महत्त्व पटवून दिले. सभेला सहाय्यक कृषी अधिकारी केदारी, लोंढे, पोकले, समूह सहाय्यक गौतम मेश्राम यांच्यासह गावातील शेतकरी उपस्थित होते. कमी पाण्यातील पीक निवड, जलसंधारण आणि शासकीय योजनांचा लाभ घेऊन दुष्काळावर मात करण्याचा संदेश या सभेतून देण्यात आला.

# नाचनगावात आरोग्य यंत्रणा सज्ज; अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविकांना प्रशिक्षण

**नाचनगाव/जनमाध्यम**

बालकांचे आरोग्य जपण्यासाठी आणि कुपोषण व रक्तक्षयावर नियंत्रण मिळविण्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार आरोग्य विभागाने केला आहे. याच अनुषंगाने २६ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र नाचनगाव येथे अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.'जंतमुक्त बालक, सुदृढ बालक' हा संदेश घरोघरी पोहोचवा, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोनाली मामीलवार यांनी केले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले आणि जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर यांच्या मार्गदर्शनानुसार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद झाडे आणि डॉ. ऋतुजा साखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेचे नियोजन करण्यात आले.



जंतसंसर्गामुळे बालकांमध्ये रक्तक्षय, कुपोषण, अशक्तपणा तसेच शारीरिक व बौद्धिक विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे राष्ट्रीय मोहिमेंतर्गत एक ते १९ वर्षे वयोगटातील पात्र बालकांना व किशोरवयीन मुला-मुलींना वयानुसार अल्बेंडाझोलची गोळी देण्याबाबत प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.एकही पात्र बालक औषधापासून वंचित राहू नये, यासाठी पालकांमध्ये जनजागृती, शाळा-अंगणवाडी समन्वय आणि योग्य नोंदी ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

हात धुणे, स्वच्छ पाणी पिणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्वही पटवून देण्यात आले. बालकांचे आरोग्य हीच समाजाची खरी संपत्ती असून, जंतमुक्त बालपणासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले.

## निधन

### शांता कोपरकर



**सिंदी रेल्वे** - माजी नगराध्यक्ष शांताबाई मधुकर कोपरकर यांचे वृध्दापकाळी वयाच्या ९८ व्या वर्षी सोमवारी निधन झाले.स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडला.त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे आणि मोठा आप्तयरिवार आहे.

### भीमरावजी धुडे

**वर्धा**-स्थानिक स्नेहनगर येथील रहिवाशी भिमरावजी कृष्णराव धुडे ७९ यांचे मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर स्थानिक वैकुंठ धामात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी,जावाई व बराचमोठा आप्तपरिवार आहे.ते झाडशी येथील आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक दिलीप धुडे.यांचे वडील होत.



# दुष्काळग्रस्तांना मदत कर्मचाऱ्यांच्या खिशातूनच का?

## कुंभमेळयासाठी हजारो कोटींची तरतूद, मग सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच हात का

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात दुष्काळसदृश परिस्थितीने शेतकरी, शेतमजूर आणि पशुधन संकटात सापडले असताना दुष्काळ निवारणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याच्या निर्णयावरून नवा वाद निर्माण झाला आहे. वर्ध्यातील काही महिला पोलिसांनीही, 'दुष्काळ निवारणासाठी आमच्याच पगारातून पैसे का कापले जात आहेत असा प्रश्न उपस्थित केल्याची माहिती समोर आली आहे.

दुष्काळाचा फटका सर्वसामान्यांना बसत असताना मदतीचा आर्थिक भार कर्मचाऱ्यांवरच का टाकला जात आहे, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या निधीपैकी किमान एक टक्का, म्हणजेच ३४७ कोटी रुपये दुष्काळ निवारणासाठी वळवावेत, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे. एका बाजूला मोठ्या खर्चाच्या योजना आणि दुसऱ्या बाजूला कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात, या धोरणात्मक विसंगतीकडे काळे यांनी लक्ष वेधले आहे.

**कुंभमेळ्याच्या निधीतून दुष्काळग्रस्तांना दिलासा द्या**

संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, नाशिक कुंभमेळ्यासाठी सुरुवातीला २५ हजार ५५ कोटी रुपयांचा मास्टर प्लॅन मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर प्रस्तावित निधी ३४ हजार ७३२ कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचा संघटनेचा दावा आहे. या निधीतील किमान एक टक्का रक्कम दुष्काळ निवारणासाठी उपलब्ध करून दिल्यास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चारा छावण्या, पशुधनासाठी पाणी आणि दुर्बल घटकांना मदत करणे शक्य होईल, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

कुंभमेळा हा श्रद्धेचा विषय असला तरी दुष्काळाच्या संकटात अडकलेल्या शेतकरी आणि पशुधनाच्या गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे संघटनेचे म्हणणे आहे. सण-उत्सव साधेपणाने साजरे करण्याचे आवाहन करणाऱ्या शासनाने स्वतःच्या खर्चातही काटकसर दाखवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**महिला पोलिस कर्मचाऱ्यांत नाराजी**

शासकीय कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करून दुष्काळ निवारणासाठी निधी उभारण्याच्या निर्णयावर वर्ध्यातील काही महिला पोलिसांनी प्रश्न उपस्थित केल्याचे सांगण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांच्या संमतीबाबत आणि वेतनकपातीच्या निर्णयामागील कारणांबाबत स्पष्टता असावी, अशी अपेक्षा या प्रकरणातून पुढे येत आहे.

**पाच हजारांची मदत; शेतकऱ्यांच्या संकटाचे काय**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत अपुरी असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. बियाणे, खते, औषधे, पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा वाढता खर्च लक्षात घेता मदतीची रक्कम वाढवून ती तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांसंदर्भात जिल्हा प्रशासनापासून राज्य प्रशासनापर्यंत निवेदने देण्यात आल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे.

दुष्काळग्रस्तांना मदत मिळालीच पाहिजे मात्र त्यासाठी वेतनकपातीचा निर्णय कितपत योग्य आहे, याचे उत्तर शासनाने द्यावे, असा प्रश्न या प्रकरणातून उपस्थित झाला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा ५ नोव्हेंबर रोजी पुण्यात धडक मोर्चा

## अजय देशमुख यांच्या नेतृत्वात राज्यव्यापी आंदोलन; मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**
राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने येत्या ५ नोव्हेंबर २०२६ रोजी उच्च शिक्षण संचालनालय (पुणे) येथे भव्य धडक मोर्चा व एकदिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष अजय बळवंत देशमुख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन छेडले जाणार असल्याची माहिती कृती समितीच्या वतीने देण्यात आली आहे. या आंदोलनासंदर्भात कृती समितीच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना सविस्तर निवेदन दिले असून आंदोलनाच्या पुढील टप्प्यांची अधिकृत रूपरेषा जाहीर केली आहे.वारंवार आश्वासने, मात्र प्रत्यक्ष निर्णयाचा अभाव यापूर्वी शासनाने केलेल्या विनंतीचा आदर राखून तसेच



विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर शिक्षकेतर सेवकांचे आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले होते. मात्र, आचारसंहिता संपल्यानंतर व संचालक कार्यालयात समक्ष सकारात्मक चर्चा होऊनही शासनाकडून कोणताही ठोस शासन निर्णय निर्गमित झाला नाही. हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेशी आणि भविष्याशी निगडित प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही, अशी ठाम भूमिका समितीने घेतली आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या काही मागण्या - सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर अनुज्ञेय असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तात्काळ लागू करणे. तात्काळ मंजुरी देणे.पाच दिवसांचा आठवडा: अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना ५ दिवसांचा आठवडा लागू करणे. वेतनश्रेणी सुधारणा: महाविद्यालयीन प्रयोगशाळा परिचरांना कालबद्ध पदोन्नतीत ४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करणे.स्वतंत्र सहसंचालक कार्यालय: गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाची स्थापना करणे.

## महिलोन्नती अध्यायाचे सादरीकरण व आचार्य पदवी प्राप्त महिलांचा सत्कार

**श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम -** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवात श्रीगुरुदेव महिला विभागाने आयोजित केलेल्या महिला संमेलन झाले असून या संमेलनात ग्रामगितेतील महिलोन्नती अध्यायाचे पाठांतर व सादरीकरण करणाऱ्या २० महिलांचा सत्कार करून उपस्थित सर्व महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पा बोंडे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून नागपूर विद्यापीठाच्या अध्यासन विभाग प्रमुख डॉ.विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती. तसेच आरती वानखडे, गौरी देशमुख, छाया दंडाळे, पौर्णिमा सवाई, अंजु डोंगरे, उपसर्वाधिकारी



बाबाराव पाटील, सुधा जवंजाळ, प्रमिलाबाई बोथे, पुष्पा हांडे, द्वारका गोहत्रे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. नागपूर विद्यापीठातून राष्ट्रसंतांच्या साहित्यावर आचार्य पदवी प्राप्त केलेल्या डॉ. कुमारी चोरे, डॉ.योगीता पिंजरकर,डॉ. शुभांगी वडस्कर,डॉ.सुलभा गुंबळे इ. महिलांना या संमेलनात सन्मानित करण्यात आले. महिला संमेलनाची सुरुवात महिलोन्नती भजन महिला मंडळ यांच्या खंजेरी भजनाने करण्यात आली. तसेच गुरुकुंज आश्रमातील प्रार्थना मंदिरात असलेल्या ३७ संतांच्या प्रतिमेचे बालकलाकारांनी यावेळी सादरीकरण केले. कार्यक्रमापूर्वी राष्ट्रसंतांच्या ११ पुस्तकांचा समावेश असलेली दिंडी प्रार्थना मंदिर ते पुण्यतिथी महोत्सव व्यासपीठ मुक्तांगण महिला मंडळाच्यावतीने काढण्यात आली.महिला संमेलनाचे प्रास्ताविक श्रीगुरुदेव महिला विभागाच्या अध्यक्षा जयाताई सोनारे यांनी केले.तसेच विजयालक्ष्मी थोटे, पुष्पा बोंडे, पौर्णिमा सवाई, गौरी देशमुख यांनी महिला संमेलनाला संबोधित केले. मुख्य कार्यक्रमाचे संचालन शुभांगी ठाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनंदा ठाकरे यांनी केले. महिला संमेलनाला मालती गहुकर, वैशाली कांडलकर, राजश्री जयस्वाल, हर्षा गोरडे, अर्चना टप्पे, अर्चना भुसारी, शुभांगी बोराडकर यांचे सहकार्य लाभले.

## वर्षवास समारोपनिमित्त आरोग्य शिबीर

**चांदूर रेल्वे -** स्थानिक मिलिंद नगर लुम्बिनी बुध्द विहार येथे गेल्या अनेक वर्षापासून तीन महिन्यांचा वर्षावास कार्यक्रम होत असतो. वैशाख पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या काळात कार्यक्रम आयोजीत केला जातो.या वर्षावासाच्या ग्रंथपठनाच्या समारोपिय आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यामध्ये २५४ रुग्णांनी आपली तपासणी केली. त्यामध्ये ४० रुग्णांच्या डोळ्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. नगरसेवक सुमेध सरदार व प्रफुल मकेश्वर अध्यक्ष यांच्यातर्फे चष्म्यांचे वाटप या शिबिरामध्ये करण्यात आले. या शिबिरामध्ये डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज हॉस् अमरावती व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र,आपला दवाखाना हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मधून डॉक्टर त्रिवणी चंदने,डॉक्टर श्रुती मनहोरे, आकांक्षा नेमपाडे, उमेर शेख, राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजमधून डॉक्टर अरबी राठी,डॉक्टर तेजस कावरे, डॉक्टर अक्षय हटवार, डॉक्टर सरोदे,डॉक्टर अमोल आसरे, डॉक्टर आदर्श गांधी,डॉक्टर निलेश भोसले, डॉक्टर वैष्णवी गोरे,डॉक्टर कदम,डॉक्टर चंद्रकांत काळे, यांच्या हस्ते तपासणी झाले.या कार्यक्रमाकरिता मातोश्री रमाबाई महिला मंडळ मंगलाबाई वानखडे, तुळसा खवसे, आशा गवई,आशा वानखडे,बेबी वानखडे,रूपाली वानखडे, बनु वानखडे, इंद्रा गवई सुजाता आठवले,नगरसेवक प्रियंका वरठे नगरसेवक सुमेद सरदार, अध्यक्ष प्रफुल मकेश्वर, अंकित वानखडे,सविता फुलझले यांनी सर्वांनी प्रयत्न केले.

# ‘विकसित भारताचे स्वप्न वास्तवाच्या कसोटीवर तपासावे’

## तक्षशिला महाविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रा. सुरेश द्वादशीवार यांचे प्रतिपादन

**अमरावती/वार्ताहर**
भारताने स्वातंत्र्यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी वर्तमानातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वास्तवाचे परखड विश्लेषण आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी केले.

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टद्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालय, अमरावती आणि एमएसपी आर्ट्स, सायन्स अँड केपीटी कॉमर्स कॉलेज, मानोरा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘विकसित भारत २०४७ : आव्हाने व संधी’ या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बीजभाषण करत होते.स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक भारताचा पाया घातला गेला. हरितक्रांती, धरणे, इस्रो, आयआयटी आणि आयआयएमसारख्या संस्थांमुळे देशाच्या विकासाला गती मिळाली. मात्र, आज बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिलांचे प्रश्न आणि लोकशाहीसमोरील आव्हानांवर



गांभीर्याने विचार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू व अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक देशपांडे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. विकसित देशाचे मूल्यमापन करताना दरडोई उत्पन्न, सामान्य नागरिकांची आर्थिक स्थिती, शिक्षण, महिला व बालकांचे जीवनमान आणि सामाजिक परिस्थिती या निकषांचा विचार आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.परिषदेच्या अध्यक्षस्थानी दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कीर्ती अर्जुन होत्या. नव्या पिढीच्या आकांक्षा, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती आणि तरुणांच्या प्रश्नांकडे राज्यकर्त्यांनी लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकरी आणि स्मृतीशेष दादासाहेब गवई यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी संशोधन पत्रिकेचे विमोचन झाले. व्यासपीठावर प्रा. अरविंद इंगोले, प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, डॉ. माधुरी फुले, डॉ. सोपान इंगोले, डॉ. प्रितेश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे आभार डॉ. माधुरी फुले यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. आनंद देशमुख यांनी केले.परिषदेला प्राध्यापक, संशोधक, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांद्याचे दर कडाडले; सोयाबीन उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट!

## कांदा सोयाबीन दरवाढीनंतरही शेतकरी आर्थिक संकटात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
नवीन कांद्याची आवक लांबणीवर पडल्याने बाजारपेठेत कांद्याचा तुटवडा निर्माण झाला असून, दरात तिपटीने वाढ झाल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी २० रुपये प्रतिकिलो मिळणारा कांदा महागल्याने सर्वसामान्य ग्राहकांचे बजेट कोलमडले आहे. वाढत्या दरामुळे काही हॉटेलच्या थाळीतूनही कांदा गायब होत आहे. दुसरीकडे, यंदा पावसातील खंडामुळे सोयाबीन उत्पादनात काही भागांत ५० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे शेतकरी सांगत



आहेत. आवक कमी झाल्याने काही बाजारांत सोयाबीनचे दर क्विंटलमागे ७ हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त आहे. मात्र, उत्पादन घटल्याने वाढलेल्या दराचाही शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा मिळत नसल्याची परिस्थिती आहे.कांद्याच्या दरवाढीने ग्राहक हैराण, तर सोयाबीनच्या घटलेल्या उत्पादनामुळे शेतकरी चिंताग्रस्त! दरम्यान, सोयाबीनसह तूर आणि कपाशीला योग्य भाव मिळण्याची शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.

## पूर्णा नदी कोरडी; दुर्गा मूर्तींचे रुस्तमपुर तलावात विसर्जन!

# आसेगावच्या इतिहासात प्रथमच परंपरेत बदल

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
आसेगाव पूर्णा येथील दुर्गा व शारदा देवी उत्सवाची सांगता यंदा भावुक वातावरणात झाली. दरवर्षी पूर्णा नदीपात्रात होणारे मूर्ती विसर्जन यंदा नदी कोरडी पडल्याने भातकुली तालुक्यातील रुस्तमपुर येथील तलावात करावे लागले. गावाच्या इतिहासात प्रथमच विसर्जनासाठी दुसऱ्या तालुक्यात जावे लागल्याने भाविकांनी हळहळ व्यक्त केली.

पूर्णा नदी ही परिसरातील नागरिकांसाठी जीवनदायिनी मानली जाते. दरवर्षी विजयादशमी आणि त्यानंतरच्या एकादशीला सार्वजनिक मंडळांसह घरगुती दुर्गा मूर्तींचे विसर्जन पूर्णा नदीपात्रात केले जाते. मात्र, यंदा पावसाळ्यानंतर नदीपात्रात पाण्याऐवजी केवळ वाळू दिसत असल्याने विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला. अखेर स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार २६ ऑक्टोबर रोजी विसर्जनासाठी रुस्तमपुर येथील तलावाची निवड करण्यात आली.आसेगाव पूर्णा येथील एकता दुर्गा उत्सव मंडळ, शारदा देवी शारदोत्सव मंडळ आणि श्री शारदा माता सार्वजनिक महिला मंडळ या तीन मंडळांच्या मूर्तींची गावातून मिरवणूक काढण्यात आली. ‘जय भवानी, जय शिवाजी’ आणि ‘दुर्गामाता की जय’ अशा जयघोषात भाविकांनी देवीला निरोप दिला. मात्र, अनेक वर्षांची परंपरा खंडित झाल्याने जुन्या जाणत्या ग्रामस्थांसह भाविकांच्या मनात हुरहूर होती. दिवाळीपूर्वीच पूर्णा नदीचे पात्र कोरडे पडल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

नदीतील पाण्याची स्थिती पाहता भविष्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. नदीपात्रातील पाण्याची घटती पातळी ही परिसरासाठी चिंतेची बाब ठरत आहे.गेल्या ४५ वर्षांपासून आम्ही दुर्गामातेची स्थापना करीत आहोत.

# ‘पॅट’च्या वेळापत्रकातील बदलामुळे शैक्षणिक नियोजनावर प्रश्नचिन्ह

## शिक्षकांवरील अतिरिक्त ताण आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याकडे लक्ष देण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**
इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या नियतकालिक मूल्यमापन चाचणीच्या (पॅट) वेळापत्रकात बदल करण्यात आल्याने शिक्षण क्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. परीक्षा नियोजनातील अनिश्चिततेमुळे शिक्षकांचे अध्यापनाचे नियोजन, शाळांचे दैनंदिन कामकाज आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या लयीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे ‘पॅट’चे वेळापत्रक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच निश्चित करून ते वार्षिक शालेय दिनदर्शिकेशी जोडण्याची गरज शिक्षणतज्ज्ञ डॉ. माधव सूर्यवंशी यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून ‘पॅट’ चाचणी सुरू करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी ओळखून त्यानुसार उपचारात्मक अध्यापनाची दिशा



ठरविणे हा या चाचणीचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे केवळ परीक्षा घेणे महत्त्वाचे नसून, तिच्या निकालांचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्याचा उपयोग करणेही आवश्यक आहे. यंदा शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला घेतली जाणारी पायाभूत चाचणी झाली नसल्याचे, तर प्रथम सत्राच्या अखेरीस होणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी-१ चे वेळापत्रक बदलून परीक्षा नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेण्याचे नियोजन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संकलित मूल्यमापन चाचणी-२ एप्रिल २०२७ मध्ये होणार आहे. या बदलामागील नेमकी शैक्षणिक व प्रशासकीय कारणे स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दिवाळीच्या सुट्टीनंतर लगेच परीक्षा असल्यास विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा दबाव वाढू शकतो.‘पॅट’चे वेळापत्रक प्रथम सत्राच्या परीक्षा, सुट्ट्या, अभ्यासक्रम आणि उपचारात्मक अध्यापन यांचा समन्वय साधून निश्चित करावे. अपरिहार्य कारणांमुळे बदल करावा लागल्यास शाळांना पूर्वसूचना देऊन पुरेसा अवधी द्यावा. वेळेवर नियोजन, परीक्षा आणि शैक्षणिक मदत यांमुळेच ‘पॅट’चा मूळ उद्देश साध्य होऊ शकतो, असे डॉ. सूर्यवंशी यांनी अधोरेखित केले.

## संक्षिप्त



### अखेर हयापूर गावात एसटी बससेवा सुरु

**खल्लार-**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या अथक पाठपुराव्याला अखेर यश आले असून हयापूर गावात एसटी बस सेवा सुरू झाली आहे. या बससेवेमुळे गावातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह ग्रामस्थांची प्रवासाची मोठी अडचण दूर होण्यास मदत होणार आहे.हयापूर परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज प्रवास करावा लागत असल्याने नियमित एसटी बस सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात येत होती. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन अंकुश पाटील कावडकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. हयापूर ग्रामस्थांनी अंकुश पाटील कावडकर यांना गावात आमंत्रित करून त्यांचा सत्कार केला. यावेळी एसटी बसचे चालक व वाहक यांचाही ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. गावकरी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी बससेवा सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

### विद्यापीठातील रक्षिता मेश्रामची इंद्रधनुष्य स्पर्धेसाठी निवड

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागातील एम.एससी. ची विद्यार्थिनी रक्षिता देवेंद्र मेश्राम हिने बुलढाणा येथे नुकत्याच पार पडलेल्या युवा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी करत कलर कोट पटकावला. रक्षिताची राज्यस्तरीय इंद्रधनुष्य व एआययू मध्य विभाग युवा महोत्सवामध्ये पाश्चिमात्य समूहगायन प्रकारात निवड झाली आहे. युवा महोत्सवात रक्षिताने गायन, नृत्य आणि नाटय अशा विविध सांस्कृतिक प्रकारांमध्ये भाग घेऊन आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यापीठाच्या मुख्य संघात निवड झाली आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील,विभागातील सर्व प्राध्यापकवृंदांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.





### जखमी माकडाला पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखल

**टाकरखेडा शंभू-**माणुसकी केवळ माणसांपुरती मर्यादित नसते, तर ती मुक्या प्राण्यांवरील प्रेम आणि त्यांच्या काळजीतूनही दिसून येते. याचाच प्रत्यय जळका हिरापूर येथे आला. गावातील एका घराच्या अंगणात माकड पडलेले आढळून आले. या मुक्या जीवाची अवस्था पाहून तेथील नागरिकांनी माणुसकीचे दर्शन घडवत स्वतःच्या वाहनाने सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या टाकरखेडा शंभू येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात आणले.मुक्या प्राण्याला वेळीच मदत मिळावी, या भावनेतून नागरिकांनी दाखविलेली तत्परता कौतुकास्पद ठरली. पशुपक्ष्यांनाही वेदना होतात, त्यांनाही आधार आणि काळजीची गरज असते. त्यामुळे संकटात सापडलेल्या मुक्या जीवांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. माणुसकीचा खरा अर्थ केवळ शब्दांत नसून, अशा कृतीतूनच व्यक्त होतो.

### सेवानिवृत्त एसटी कर्मचारी प्रभाकर बांगरे यांचे मरणोत्तर देहदान

**अमरावती-**येथील विजयपथ नगर, सिपना कॉलेजजवळील बांगरे प्लॉट येथील रहिवासी तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी प्रभाकर केशवराव बांगरे (वय ७९) यांचे १७ ऑक्टोबर रोजी निधन झाले. मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडावे, या उदात्त भावनेतून त्यांनी मरणोत्तर देहदान करून मानवतेचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.



मूळचे बेलगाव, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर येथील असलेले बांगरे हे नोकरीनिमित्त अमरावती येथे स्थायिक झाले होते. एसटी महामंडळात कर्तव्यनिष्ठ सेवा बजावल्यानंतर ते २००५ मध्ये सेवानिवृत्त झाले होते.ंच्या पश्चात पत्नी जयश्री बांगरे, मुले प्रवीण, अजय व मनीष बांगरे, नातवंडे आणि आप्तस्वकीय असा परिवार आहे. यावेळी माजी नगरसेवक चंदू भाऊ बोमरे, अमरावती सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरराव कुर्वे, डॉ. शिवाजीराव देशमुख, राजेंद्र चौधरी, विजय कावळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. मृत्यूनंतरही वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनासाठी देह उपयोगी पडावा, ही भावना समाजासाठी प्रेरणादायी आहे. देहदानातून खऱ्या अर्थाने मानवसेवेचा संदेश दिला जातो. प्रभाकर बांगरे यांच्या देहदानातून समाजासमोर मानवता, सामाजिक बांधिलकी आणि अवयवदान-देहदानाचे महत्त्व अधोरेखित करणारा आदर्श उभा राहिला आहे.

# महायुतीचे किरण सरनाईक आघाडीवर

## श्रीकांत देशपांडे दुसऱ्या,तर पोहरे तिस-या क्रमांकावर





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी आज मंगळवार २७ ऑक्टोंबर रोजी सकाळी आठ वाजल्यापासून तपोवन मार्गावरील लोकशाही भावनात सुरू झाली. मतमोजणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार ॲड. किरण सरनाईक यांनी आघाडी घेतली आहे. त्याच्या पाठोपाठ शिवसेना शिंदे गटाचे





बंडखोर उमेदवार तथा माजी आमदार श्रीकांत देशपांडे दुसऱ्या

### -शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी

क्रमांकावर असून काँग्रेसच्या उमेदवार आदिती पोहरे चौथ्या स्थानी आहेत. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण विभागाचे लक्ष लागले आहे. निवडणुकीची पहिली फेरी पूर्ण झाली आहे.

पहिली फेरीच्या निकालानंतर महायुतीचे किरण सरनाईक यांना ७२३७ मते प्राप्त झाली आहे. दुसऱ्या फेरीत ते ३०४२ मतांनी आघाडीवर आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी बंडखोर श्रीकांत देशपांडे यांना ४१९५ मते मिळाली आहे. लोकशाही भवनात विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या मार्गदर्शनात



मतमोजणीची प्रक्रिया सुरू आहे. एकूण १४ टेबलवर मतमोजणी केली जात असून, सुरुवातीच्या टप्प्यात ☞(पान २ वर)

# ॲड. निलेश हेलोंडे जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर

**अमरावती/प्रतिनिधीः-** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे गुरूवार, २९ व शुक्रवार ३० ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.

दौऱ्यानुसार, गुरूवार २९ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता काटोल येथून मोर्शी कडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता मोर्शी तालुक्यातील खोलीकरण झालेल्या नाल्यालगत प्रस्तावित चारा लागवडीचे स्थळास भेट व पाहणी तसेच शिरखेड येथील दुग्ध उत्पादक सहकारी संस्था यांना भेट व पाहणी. दुपारी ३ वाजता चांदूर बाजार तालुक्यातील खोलीकरण झालेल्या नाल्यालगत प्रस्तावित चारा लागवडीचे स्थळास भेट व पाहणी. तसेच दुपारी ४.३० वाजता अचलपूर तालुक्यातील खोलीकरण झालेल्या नाल्यालगत प्रस्तावित चारा लागवडीचे स्थळास भेट व पाहणी. सांयकाळी ७ वाजता मोथा ता. चिखलदरा येथे दुध उत्पादक शेतकरी यांची भेट व चर्चा. रात्री ८ वाजता विश्रामगृह चिखलदरा ☞(पान २ वर)

# अमरावती बाजार समितीवर प्रशासक राज कायम राहणार

## संचालक मंडळाला हायकोर्टातून दिलासा नाहीच

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीवर आता देखील प्रशासक राज कायम राहणार आहे. संचालक मंडळाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून कोणताही दिलासा मिळालेला नाही. हायकोर्टाने संचालकांच्या याचिकेवर प्रशासकाच्या नियुक्तीला स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.



कृषी उत्पन्न बाजार समिती ही जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजार समिती आहे. गेल्या काही महिन्यांपासून या बाजार समितीमध्ये संचालकांमध्ये अंतर्गत सत्तासंघर्ष आणि आर्थिक गैर व्यवहाराच्या तक्रारी वाढल्या होत्या. शेतकऱ्यांकडून येणाऱ्या मालाची अडवणूक, लिलाव प्रक्रियेत अनियमितता आणि निधीच्या वापरावरून अनेक तक्रारी जिल्हा उपनिबंधक ☞(पान २ वर)

# ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक, दोघे जागीच ठार

## वरखेड फाट्याजवळ घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** नागपूरवरून अमरावतीकडे जाणाऱ्या भरधाव ट्रॅव्हल्सने दुचाकीला जबर धडक दिली.या अपघातात दोन जण जागीच ठार झाले आहेत. ही घटना आज मंगळवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी रात्री ७ वाजता दरम्यान तिवसा राष्ट्रीय महामार्गावर वरखेड फाट्यानजीक घडली.

निखिल राजेंद्र बोके (वय ३५),कैलास मनोहर कळंबे (वय ३३ ) दोघेही रा. उंबरखेड असे अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत.



मृतक निखिल बोके व कैलास कळंबे हे दोघेही तिवसा येथून आपल्या ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वेत जुगार अड्डयावर गुन्हे शाखेचा छापा

## एक्का बादशा खेळताना आठ जण ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील मारवाडी लाइन परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून आठ जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य यासह तीन दुचाकी वाहने असा एकूण २ लाख ३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई २६ ऑक्टोबर रोजी 'ऑपरेशन कवच' अंतर्गत करण्यात आली.



पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर अंकुश आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून कारवाई केली जात आहे. त्याच ☞(पान २ वर)

# परतवाड्यात ८० किलो गोमांस जप्त

## ; एकाला अटक

**परतवाडा/प्रतिनिधीः-** घराच्या मागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत विक्रीसाठी गोमांस ठेवल्याच्या माहितीवरून परतवाडा पोलिसांनी छापा टाकून एका व्यक्तीला अटक केली. या कारवाईत ८० किलो मांसासह वजनकाटा, वजनाचे गोटे, लोखंडी सुरी आणि लाकडी ठोकळा असा एकूण १७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई २६ ऑक्टोबर रोजी 'ऑपरेशन कवच'अंतर्गत करण्यात आली.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी



गोवंश तस्करी आणि अवैध गोमांस विक्रीसह अन्य अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, २६ ऑक्टोबर रोजी परतवाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सलीम शेख हे ☞(पान २ वर)

# अचलपूरात देवडी परिसरातील मुख्य रस्त्याची दुरावस्था



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरात देवडी परिसरातील मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्यावर जागोजागी असणारे खड्डे आणि उडणाऱ्या धुळीमुळे व्यापारी सह नागरिक त्रस्त झाले आहे .यामुळे या मुख्य रस्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करण्याची मागणी व्यापारी वर्गाकडून करण्यात आली आहे. या मागणीचे ☞(पान २ वर)

# अमरावतीत राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा उत्साहात शुभारंभ

## महानगरपालिका माध्यमिक शाळा, जेवड नगर येथे विद्यार्थ्यांना गोळ्यांचे वाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-** विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, बालकांमधील जंतसंसर्गाचे प्रमाण कमी व्हावे तसेच मुलांच्या शारीरिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा शुभारंभ आज मंगळवारी सकाळी ११ वाजता अमरावती महानगरपालिकेच्या उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा, जेवड (पवन नगर) येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना



जंतनाशक गोळ्या देऊन मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. महानगरपालिका प्रशासनाच्या आरोग्य व शिक्षण विभागाच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनाला महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे.

राष्ट्रीय जंतनाशक मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची असून, शालेय वयोगटातील मुलांना जंतसंसर्गापासून संरक्षण मिळावे, त्यांचे आरोग्य चांगले राहावे आणि त्यांची शारीरिक वाढ योग्य प्रकारे व्हावी, यासाठी या मोहिमेचे आयोजन करण्यात येते. बालकांच्या आरोग्याचा थेट संबंध त्यांच्या शिक्षणाशी, एकाग्रतेशी आणि सर्वांगीण विकासाशी असल्याने अशा आरोग्यविषयक उपक्रमांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगर पालिकेच्या☞(पान २ वर)

# युवासेनेचे जिल्हाप्रमुख उमेश शहाणे यांच्या आंदोलनाला यश

## -१७ ते १८ गावातील शेतकरी होणार सुजलाम सुफलाम!

## चक्काजाम आंदोलनाच्या दणक्याने नदीपात्रात पाणी सोडले!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** दि.१९ ऑक्टोबर रोजी ऊदखेड बस थांब्यावर युवासेनेचे जिल्हाध्यक्ष उमेश शहाणे यांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनाची दखल घेत दि.२५ ऑक्टोबर रोजी चारघड लघुसिंचन प्रकल्पातून चारघड नदीपात्रात पाणी सोडण्यास मंजुरी मिळाली आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी विशेष परवानगी देत नदीपात्रात ०.७५ दशलक्ष घनमीटर पाणी सोडण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आता ☞(पान २ वर)



# चांदूर बाजारात गांजा तस्कराला अटक

## पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ छापा

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार शहरात गांजाची अवैध विक्री होत असल्याच्या माहितीवरून चांदूर बाजार पोलिसांनी कारवाई करत एका संशयिताला ताब्यात घेतले. अजगर शहा उर्फ छोटू मोहम्मद शहा (वय ४३, रा. ताजनगर, चांदूर बाजार) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून २२० ग्रॅम गांजा आणि विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा एकूण ३ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जिल्ह्यात 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी चांदूर बाजार पोलिसांना दिल्या होत्या. त्यानुसार, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी चांदूर बाजार पोलीस ☞(पान २ वर)

# प्रतिबंधित ७२५ किलो प्लास्टिक जप्त

## -मसानगंज येथील गोडाऊनवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:-** 'स्वच्छ अमरावती – प्लास्टिकमुक्त अमरावती' या अभियानांतर्गत अमरावती महानगर पालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान मसानगंज येथील



एका गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात ☞(पान २ वर)

# डाक विभागाची आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा सुरू

## परदेशात दिवाळी फराळ पाठवण्यासाठी सुविधा

**अमरावती/प्रतिनिधीः-** दिवाळी सणानिमित्त परदेशात राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना आणि मित्रमंडळींना घरगुती फराळ पाठवण्यासाठी अमरावती जिल्ह्यात भारतीय डाक विभागाची आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग सेवा सुरू झाली आहे. अमरावती डाक विभागाचे प्रवर अधीक्षक पी. ए. गेडाम यांनी नागरिकांना या सुविधेचा जास्तीत-जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

भारतीय डाक विभागाच्या आंतरराष्ट्रीय नेटवर्कमुळे आता नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि अत्यंत किफायतशीर दरात पार्सल पाठवता येणार आहे. या सेवेद्वारे दिवाळीचे पारंपरिक फराळाचे खाद्यपदार्थ जगभरातील विविध देशांमध्ये पाठवता येणार आहे.

ग्राहकांनी फराळ किंवा भेटवस्तू योग्य पद्धतीने पॅक करून जवळच्या डाक कार्यालयात किंवा प्रधान टपाल कार्यालयात जमा करावे. अन्नपदार्थ ☞(पान २ वर)

# दहा वर्षांपासून फरार फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; राजुरा येथून अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** फसवणुकीच्या गुन्ह्यात तब्बल दहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. प्रवीण बबनराव देशमुख (वय ३६, रा. राजुरा, ता. चांदूर रेल्वे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. २०१६ मध्ये चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात तो पोलिसांना हवा होता.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्यासह विविध गुन्ह्यांतील फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व ☞(पान २ वर)